## संजय काळे



# शेवटचा साक्षीदार

# शेवटचा साक्षीदार

## संजय काळे

ई साहित्य प्रतिष्ठान

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

**प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान**

**संपर्क --- ९४२२२८४११६**

www. esahity.com

esahity@gmail. com

प्रकाशन ---२३ एप्रिल २०१७

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता

हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# शेवटचा साक्षीदार

(थ्रिलर )

लेखक : संजय काळे

(धारपवाडीतील खून या तूफ़ान गाजलेल्या कादंबरीचे लेखक)

3, कल्याणीपुष्प,

तुळजाभवानी हौसिंग सोसायटी

गारखेडा, औरंगाबाद- 431005.

मोबाईल नंबर: 09686233218; 07773923082

ई मेल : sanjaykale55@gmail. com

# शेवटचा साक्षीदार

वर्गात शिक्षिकेची, प्रिन्सिपलच्या मुलीची, नक्कल केल्याबद्दल भानू भारस्वाडकरला पंधरा दिवसांसाठी कॉलेजमधून रेस्टिकेट करण्यात आलं. अचानक समोर आलेल्या रिकाम्या दिवसांच काय करावं असा तिला प्रश्न पडला. त्याच वेळी नयनाचा बॉयफ्रेड, जटाशंकरच्या नादी लागून, तिला सोडून त्यांच्या आश्रमात निघुन गेला. त्याला परत आणण्याची नयनाने दिलेली जबाबदारी भानूने आनंदाने स्वीकारली. पण... .

आश्रमात गेल्यावर भलत्याच भानगडीत गुंतल्याने भानूचे साहस तिच्या जीवावर बेतले. तिथं घडलेल्या घटनांची ती शेवटची साक्षीदार होती. तिचं जीवंत राहणं जटाशंकरच्या अस्तित्वाकरता धोकादायक होतं. आपली शिकार अटळ आहे याची भानूला कल्पना होती. तिच्यासमोर दोन मार्ग होते- मुक्याने मृत्यु किंवा सर्वंकष संघर्ष...

कथा पराकोटीची रोमांचक आहे...



संजय काळे

या कथेतील सर्व नावे, व्यक्ति

आणि स्थळे काल्पनिक असून

त्यांचा कोणत्याही जिवंत

अथवा मृत व्यक्तिशी साम्य

आढळून आल्यास तो केवळ

योगायोग समजावा.

# अर्पण पत्रिका

माझी पत्नी सौ रेवती काळे

जिच्या सहकार्याने पुनःलेखनास सुरवात झाली.

१.

सकाळचे अकरा वाजून गेले तरी वीरभद्र अजून अंथरुणात लोळत पडला होता. विजयाने त्याला उठविण्याचा कितीदा प्रयत्न केला, पण प्रत्येकवेळी तो अंगावर पांघरून ओढून, कूस बदलूनपुन्हा झोपी जात होता. आज विजयाचा वीरभद्रच्या मावशीला भेटायला विक्रोळीला जाण्याचा बेत होता. ती सकाळ पासून तयार होऊन बसली. वीरभद्र मात्र तिच्याकडे लक्ष न देता चक्क घोरत होता.

'तुम्ही त्यांच्या अंगावर बादलीभर थंड पाणी का ओतत नाही?' तिची अस्वस्थता लक्षांत येऊन दिवाणखाण्यात तिने वाचून टाकलेल्या वर्तमानपत्रांची व्यवस्थित घडी घालण्यात गुंग असलेल्या भैरवने विचारले.

'तसे केल्याने बिछान्यावरील कपडे ओले होतील फक्त. वीरभद्रवर त्याचा काहीही परिणाम होणार नाही. ' वैतागून विजया म्हणाली.

'मी दाराशी जाऊन माझ्या भसड्या आवाजात गाणं ऐकवलं तर?' त्याने गंभीर सुरात विचारले. आपल्या मालकिणीला मदत करण्याची त्याची मनापासून इच्छा दिसत होती.

'मला पळून जावं लागेल. ' शहारुन ती म्हणाली. ' तो मात्र कानावर उशी घेऊन पुन्हा झोपी जाईल. त्यापेक्षा तू बेडरूमच्या दारात उभा राहून त्याला वर्तमानपत्रातील खुनाच्या बातम्या वाचून दाखव. खून, दरोडे, मारामारी म्हटलं की त्याची झोप खाड्कन उतरते. '

नवऱ्याच्या सवयी माहीत असल्याने विजया हसत म्हणाली. भैरवला विनोद कळण्याची शक्यता नव्हती. आता आपल्याला खरेंच वर्तमानपत्र वाचवे लागेल या भीतीने तो विजयाला म्हणाला,

'त्यापेक्षा, बाईसाहेब, मी बाहेर जाऊन कुणाचा तरी खून करून येऊ का?'

त्याने निरागस चेहऱ्याने विचारलेल्या प्रश्नाने विजयाला हसू फुटले. निसर्गाच्या कुशीत वाढलेल्या भैरवचा भाबडेपणा इतकी वर्ष वीरभद्रच्या सहवासात राहूनही कायम होता. तो वीरभद्र आणि विजयाची एकनिष्ठ सेवा करीत असे. तिने सांगितले तर तो खरेच बाहेर जाऊन कुणाचा तरी खून करुन आला असता याची विजयाला खात्री होती. त्याच्या बोलण्यावर ती मोठयाने हसली. भैरव तिच्याकडे गोंधळून पाहत राहीला. तो पुढे काही बोलणार एव्हढयात दारावरील बेल वाजली.

भैरव हातातले वर्तमानपत्र तेथेच टीपॉयवर ठेऊन दार उघडायला गेला. त्याने दरवाजा उघडला आणि त्याच्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडलेला विजयाने ऐकला. ती उठून दरवाजाकडे जाणार होती पण भैरवच घाबरलेल्या चेहऱ्याने आत आला.

'बाईसाहेब, मुंबई पोलिस खरोखरच कर्तव्यदक्ष आहेत. मी खून करण्याचा नुसता मनसुबा व्यक्त केला तोच दारात पोलीस हजर. तो मला अटक करायला आला आहे काय?'

विजया त्याला काही उत्तर देण्याआधीच सुप्रिटेन्ट विनोदराव दाणदाण पावले आपटीत आत आले. ते आत येण्याआधी विजयाला, नेहमीप्रमाणे, त्यांची ढेरी आत येताना दिसली.

विनोदराव चांगले उंच व शरीराने लठ्ठ होते. पुढे आलेली त्यांची ढेरी हा सगळयांकरीता चेष्टेचा विषय होता. असे असले तरी विनोदराव कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी म्हणून नावाजलेले होते. त्यांची ढेरी मोठी असली तरी हालचाली चपळ होत्या. सतत कामाच्या ओझ्याखाली वावरल्याने चिडकेपणा त्यांच्या चेहऱ्यावर मुखवटा लावावा तसा चिकटून राहीला होता. ते मनाने अतिशय चांगले आहेत याची विजयाला खात्री होती. वीरभद्रच्या उपद्व्यापामुळे त्यांना त्याचा राग येत असे. आताही ते आत आले तेव्हा त्याची मनस्थिती चांगली नव्हती.

'विनोदराव ! तुम्ही आहात होय. तुम्हाला पाहून भैरव केव्हढा घाबरला. अरे भैरव, हे आपले विनोदराव आहेत त्यांना घाबरण्याचे काही कारण नाही. हो ना विनोदराव?'

'कोणत्याही सभ्य नागरीकाने पोलीसांना घाबरण्याचे कारण नाही. ' तेथल्या एका सोफ्यावर धप्पकन बसत ते म्हणाले.

'पण मी दारावर वेगळाच शिपाई पाहीला. 'भैरव विनोदरावांकडे पहात म्हणाला. 'हे साहेब मला माहीत आहे. हे तर आपल्या मालकांचे चांगले मित्र आहे. '

'मित्र? मी त्या लबाड माणसांशी कधीच मैत्री करू शकणार नाही. हां, आता त्याने जर आपला स्वभाव बदलला तर गोष्ट वेगळी. पण मला तर या जन्मी ते शक्य वाटत नाही. '

'ते जाऊ दे. ' विषय बदलत विजया म्हणाली, 'तुम्ही बाहेर कुणाला उभे केले आहे? त्याला आत बोलवा ना. तुम्ही आत बसून चहापाणी घेणार आणि तो बिचारा बाहेर उभा राहणार?'

'बिचारा नाही, माझ्या सोबतचा हवालदार आहे तो. त्याला बाहेर पहाऱ्यासाठी उभा केला. '

'पहाऱ्यावर!' विजया आश्चर्याने म्हणाली, 'कमाल करता तुम्ही विनोदराव. इथे तुमच्या जीवाला कसला आला धोका?हे सभ्य माणसाचं घर आहे. '

'सभ्य माणसाचं? वीरभद्रबद्दल तू हे बोलत असशील तर माझी हरकत नाही. कारण तू त्याची बायको आहेस. मी मात्र तुझ्या मताशी मुळीच सहमत नाही. वीरभद्र इतका लबाड आणि बदमाश दुसरा माणूस या मुंबईत तरी मी पाहिला नाही. तुझ्याकडे पाहून मी त्याला अनेकदा सोडून दिले. नाहीतर एव्हाना तो तुरूंगात शिक्षा भोगताना दिसला असता. वीरभद्र आणि सभ्य!'

विनोदरावांच्या मोठया आवाजाने वीरभद्रच्या झोपेत व्यत्यय आला. विनोदराव कशासाठी आलेत याचा त्याला अंदाज आला होता. बेडरूममधून बाहेर येताना त्यानी विनोदरावांची आपल्याबद्दलची मत ऐकली होती. अर्थात वीरभद्रला ती काही नवीन नव्हती. त्यांना जर पुरावा मिळाला असता तर त्यांच्या सारख्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याने वीरभद्रला

कधीच अटक केली असती, पण चतूर वीरभद्रने आतापर्यंत त्यांचे स्वप्न पुर्ण होऊ दिले नव्हते. भविष्यात ते कधी पुर्ण होईल याची त्यांनाच खात्री नव्हती.

'छान विनोदराव, भल्या पहाटे एखाद्याच्या घरी जाऊन त्याच्या बायकोसमोर त्याची नालस्ती करता? यातच तुमचा सभ्यपणा दिसून येतो. ' जांभाई देत वीरभद्र म्हणाला.

'कोण वीरभद्र का? छान. आता सकाळचे साडे अकरा वाजत आले. याला तू भल्या पहाटे म्हणतोस? सभ्य नागरिकांचा दिवस कधीच सुरू झाला. फक्त रात्री जागणारे आणि नसते उपद्व्याप करणारे चोर बदमाशच इतका उशीरा पर्यंत झोपून राहतात. '

वीरभद्र, बेफिकीरीने ते बसले होते त्या सोफ्यावर दाणकन बसला. त्याच्या बसण्याने विनोदरावांना किंचित हादरा बसला. त्यांनी रागाने वीरभद्रकडे पाहीले. तो हसत होता.

'तुमच्या म्हणण्याप्रमाणे रात्रपाळी करणारे बदमाश. बिचारे रात्रपाळीचे कामगार, एटीएमच्या केबीनसमोर खुर्ची टाकून बसणारे वॉचमन, रात्री जागणारे आणि दिवसा झोपणारे गरीब बिचारे पोटार्थींना चोर बदमाश म्हणायचा तुम्हाला काही अधिकार नाही. '

वीरभद्रच्या बोलण्याने त्यांना राग आला. हातातली छडी त्याच्यासमोर नाचवत ते म्हणाले,

'वीरभद्र मी तुला जाब विचारण्या करता आलो आहे. बऱ्या बोलाने तू सहकार्य केले नाहीस तर नाईलाजाने मला तुला अटक करावी लागेल. '

जवळ उभा असलेल्या भैरवला आपल्या मालकाच्या अटकेची भाषा ऐकून राग आला. तावातावाने विजयाकडे पाहून तो म्हणाला,

'बाईसाहेब, त्यापेक्षा मी या पोलिसाचा खून करू काय?'

विनोदराव ताड्कन आपल्या जागेवरून उठले. ते रागाने थरथरत होते. वीरभद्रच्या नोकराने त्यांचा असा उघड अपमान करावा हे त्यांना अजिबात आवडले नाही. त्यांचा चेहरा लालबुंद झाला.

'एका पोलिस अधिकाऱ्याला कर्तव्य बजावत असताना ठार मारण्याची धमकी दिल्याबद्दल मी भैरवला अटक का करू नये?' त्यांनी क्रुध्द नजरेनं वीरभद्रकडे पाहत विचारले.

'हीच तर तुमची अडचण आहे. ' वीरभद्र शांतपणे म्हणाला, 'बिचाऱ्या भैरवने आपल्या बाईसाहेबांकडे काम करण्याची परवानगी मागितली. त्याने तुमच्याकडे पाहीले देखील नाही. '

विनोदरावांचा अविर्भाव पाहून भैरवला आपले काहीतरी चुकले, याची जाणिव झाली. आपल्या वागण्यामुळे आपले मालक संकटात पडतील की काय अशी भीती वाटून तो म्हणाला,

'माफ करा मालक, माझ्यामुळे तुम्ही संकटात तर पडला नाही ना? त्यांनी तुम्हाला अटक करतो म्हणाल्याने मला राग आला. तुम्ही म्हणत असाल तर मी त्यांची माफी मागतो. '

'त्यापेक्षा तू त्यांना एखादे थंड पेय दे म्हणजे त्यांचा राग शांत होईल. माझ्यासाठी चहा आण. खाली बसा विनोदराव. 'वीरभद्र शांतपणे म्हणाला, नकळत ते खाली बसले. आपण वीरभद्रच्या म्हणण्याप्रमाणे खाली बसलो हे लक्षात येताच ते पुन्हा उभे राहीले.

'वीरभद्र, काल रात्री तू कुठे होतास, हे मला कळालेच पाहीजे. ' त्याच्यासमोर तर्जनी नाचवत ते म्हणाले.

'काल? हां कालरात्री मी माझ्या मित्रां सोबत उंची हॉटेलमध्ये जेवायला गेलो होतो. तुम्ही माझे मित्र असता तर मी तुम्हालाही आमंत्रण दिले असते. आम्ही मित्र बऱ्याच दिवसांनी भेटत असल्याने गप्पात आम्हाला उशीर झाला. पण त्यानंतर मी एखद्या सभ्य माणसाप्रमाणे घरी येऊन झोपलो. हवे असल्यास या विजयाला विचारा. '

विजया वीरभद्र बरोबर राहून बरीच हुषार झाली होती. तिला आपल्या नवऱ्याच्या स्वभावाची चांगलीच माहीती होती. काल रात्री आपला नवरा काहीतरी उपद्व्याप करून आला याची तिला पक्की खात्री पटली, तरी अशा प्रसंगी काय बोलयचे हे तिला चांगलेच माहीत होते.

'होय, होय. काल वीरभद्र एखाद्या शहाण्या मुलाप्रमाणे घरी येऊन शांत झोपला. ' विजयाने त्याच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

'अरे देवा! विजू तु सुध्दा या बदमाश वीरभद्रच्या नादाला लागून बिघडली आहेस. तुझ्या नवऱ्याने काल रात्री काय भानगड करून ठेवली आहे ते तुला ऐकायचे काय?'

'तुम्ही एक म्हणून ऐकून घेते. अन्यथा इतर कुणी असता तर... . पण तुम्हाला जे काय सांगायचे ते तुम्ही खाली बसून का सांगत नाही?'

विजयाचे बोलणे ऐकुन ते वीरभद्र बसला होता त्या सोफ्यावर न बसता बाजूच्या खुर्चीवर बसले.

'विजयाताई, काल रात्री तुझ्या नवऱ्याने हॉटेल नीलकमलच्यासमोर धिंगाणा घातला. काल रात्री एक मनोरूग्ण तरूणी नातेवाईकांचा हात सोडून रस्त्यावरून सैरावैरा धावत असताना चुकून वीरभद्रच्या अंगावर आदळली. तिच्यामागे तिचे नातलग होते. तिला त्यांच्या ताब्यात देण्याऐवजी तुझ्या नवऱ्याने त्यांना चांगलीच मारहाण केली. एव्हढेच नव्हे तर त्याने त्या मुलीचे अपहरण केले. '

त्यांनी रागाने वीरभद्रकडे पाहीले. तो हसऱ्या मुद्रेने त्यांच्याकडे पाहत होता. त्यांना पुढे बोलू न देता तो मध्येच म्हणाला,

'मला तुमचे म्हणणे अजिबात मान्य नाही. ती तरूणी मनोरूग्ण नव्हती आणि ते बदमाश तिचे नातेवाईक नव्हते. ते तिचे अपहरण करण्याचा प्रयत्न करीत होते. मी मधे पडलो नसतो तर बिचारीवर काय प्रसंग ओढवला असता?' वीरभद्रने चेहऱ्यावर गंभीर भाव आणले.

त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करुन विनोदराव पुढे म्हणाले,

'त्यातले दोघे हॉस्पिटलमध्ये असून त्यांच्या जबडयाचे हाड मोडल्याने ते तोंडाची कुठलीही हालचाल करू शकत नाही. म्हणून त्यांचा जबाब नोंदवला गेला नाही. नाहीतर आज मी तुला सबळ कारणाने अटक करू शकलो असतो. '

आपण वीरभद्रला अटक करू शकत नाही याचे दुःख त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. एव्हढयात भैरव ट्रेमध्ये चहाचे कप घेऊन आला. त्याने विनोदरावसमोर ट्रे धरताच त्यांनी, नकळत विचाराच्या तंद्रीत, चहाचा कप उचलला.

'पण विनोदराव, ती तरूणी मुळीच मनोरुग्ण नव्हती. ती बिचारी शिकारी मागे लागलेल्या हरिणीप्रमाणे घाबरली होती. पळून तिची इतकी दमछाक झाली होती की मी जर त्या वेळी तिथे नसतो तर ती रस्त्यावरच कोसळली असती. त्याही अवस्थेत ती, तुम्ही म्हणता त्या, नातेवाईकां सोबत जाण्यास नकार देत होती. '

'तू पोलिसांची मदत घेऊ शकला असता. त्यांच्याशी मारामारी करण्याचे कारणच काय?'

'आता मात्र अती होतयं. या जगात खऱ्या माणसाची किंमत कशी ती नाहीच. अहो, विनोदराव, ते गुंड तिच्याशी, एका स्त्रीशी, हिसका हिसकी करीत होते. माझ्यासमोर तिच्याशी दंडेली करत असतानाही मी मनावर संयम ठेऊन त्यांना विनम्रपणे दोन्ही हात जोडून तिला सोडून देण्याची विनंती केली. '

'तू खोटं बोलतोस. तू त्यांना बेदम मारलेस. ' विनोदराव चहा पितांना ओरडले तसा त्यांना जोरदार ठसका लागला.

'यात मी जराही खोटे बोलत नाही. त्यांना बोलता आले असते तर त्यांनीही हेच सांगितले असते. माझी नम्र विनंती ऐकून त्यांच्या कोमल हृदयाला पाझर फुटला व तिला सोडून ते निघून गेले. पुढे त्यांचे काय झाले याबद्दल मला अजिबात कल्पना नाही. '

आपण त्यांना इतके मारले होते की ते पुन्हा आयुष्यात कधी आपले नाव घेणार नाही. याची वीरभद्रला पुरती खात्री होती. म्हणून तो विनोदरावशी एव्हढया आत्मविश्वासाने बोलत होता.

'ते जाऊ दे. ते हॉस्पिटलमधून आल्यावर त्यांच्या जबानीतून ह्या गोष्टी समोर येतीलच. पण मला सांग, आता ती तरूणी कुठं आहे?' त्यांनी सवाल केला.

'कोणती तरूणी ?'वीरभद्रने निरागसपणे विचारले.

'अरे देवा! माझ्या केसशी नेमका तुझाच संबंध कसा येतो देवजाणे. तुझ्यामुळे मला' वेड लागले नाही म्हणजे मिळवली. ' हताश होऊन विनोदराव म्हणाले,

'वीरभद्र, त्या गुंडाना पिटाळून लावल्यावर तू त्या तरुणीला आपल्या मोटारीत बसवलेले अनेकानी पाहीले. ती तुझ्यासोबत मोटारीत नव्हतीच असे तुला म्हणायचे आहे काय?' रागावर संयम ठेऊन त्यांनी विचारले.

'अजिबात नाही. तिला त्या अवस्थेत रस्त्यावर सोडून जायला मी काय इतका पाषाण हृदयी वाटलो काय? मी तिला माझ्या सोबत कारमध्ये बसवून घेतले. तिला तिच्या घरी पोहचविणार होतो, पण ती सभ्य आणि सुशील असल्याने एव्हढया रात्री तिने परपुरुषा सोबत एकटीने घरी जाण्यास नकार दिला. मी तिला टॅक्सी करून दिली. ती तिच्या घरी निघून गेली. '

'तुझ्या या बोलण्यावर माझा अजिबात विश्वास बसत नाही. ब-या बोलाने तू सांगितले नाहीस तर मला झडती घ्यावी लागेल. '

'झडती घ्यायला माझी काहीही हरकत नाही. मी निर्दोष असताना घाबरण्याचे कारणच काय? पण विनोदराव, ' आवाजात सहजता आणून तो म्हणाला, 'तुम्ही झडती घेण्याचा हुकूम तर सोबत आणला असेलच ना?'

'हूकुम?' त्यांनी दुःखाने निश्वास टाकला, 'वीरभद्र, तू कसे वागू नये, काय करू नये याबद्दल मी तुला अनेकदा उपदेश दिला. पण तुझ्या नाठाळ डोक्यात प्रकाश पडेल तेव्हा ना. दुर्दैवाने तसा हुकूम माझ्याकडे सध्या तरी नाही. 'पण तू चांगल्या नागरिकाप्रमाणे पोलिसांना सहकार्यच करशील. '

त्यांनी रिकामा कप टीपॉय वरील ट्रेमध्ये ठेवला. आता ते बरेच शांत झाले होते. वीरभद्रशी आरडाओरडा करून काही उपयोग नाही हे त्यांना अनुभवाने कळले होते. कधीतरी त्यांच्या मनाचा तोल जात असे.

‘नक्कीच. मी तुम्हाला सहकार्यच करीत आहे. पण तुमचा माझ्याबद्दलचा दृष्टीकोन दूषित आहे. आता हेच पहाना? मी एव्हढे तळमळीने सांगतो तरी तुम्हाला माझे म्हणणे खरे वाटत नाही. त्या बदमाशांचे म्हणणे खरे वाटतं ?’

‘ठीक आहे. सध्या पुराव्या अभावी मी तुला अटक करू शकत नाही. ’ हे बोलताना विनोदरावच्या चेहऱ्यावर दुःख झळकत होते पण वीरभद्रला त्यांची दया येण्या ऐवजी तो अधिकच आनंदी दिसत होता. ‘पण मी तुला सांगुन ठेवतो, तू त्या भानू भारस्वाडकरच्या भानगडी पासून दूर रहा. ती भार्गव भद्रेची नातलग असून त्यांनी केलेल्या तक्रारीनुसार मी तुझी चौकशी करण्यास आलो होतो. ’ ते जाण्यासाठी उठले.

‘कोण हा भार्गव भद्रे? कोण ही भानू भारस्वाडकर?’ उठून उभे रहात वीरभद्रने विचारले.

विनोदरावने त्याच्या कडे रोखून पाहीले. त्यांच्या चेहऱ्यावर असाह्यता स्पष्ट दिसत होती. हा माणूस कधी सुधारणार नाही आणि आपण रिटायर होईपर्यंत याच्याशी संबंध येत राहणार या विचाराने त्यांनी विषादाने मान हालवली.

‘भानूमति भारस्वाडकर, म्हणजे काल तू जिचे अपहरण केलेस ती तरूणी. आणि भार्गव भद्रेला तू ओळखत नाहीस हे तू मला सांगू नकोस. मी तुला सावध करतो. जर या प्रकरणात तुझा हात असेल तर तू आपले अंग काढून घे. भार्गव भद्रे महाभयंकर माणूस आहे. ’

विनोदराव निघून गेले. त्यांना दाराशी निरोप दिल्यावर वीरभद्र खो खो हसत परत आला.

भार्गव भद्रे महाभयंकर माणूस आहे म्हणे!

हे ऐकून भीती वाटण्या ऐवजी वीरभद्रला मनातून आनंद झाला. कारण जितका शत्रू बलवान तेव्हढी प्रकरणात जास्त रंगत येणार!

२.

ज्या घटनेबद्दल विनोदराव सकाळी एव्हढा आरडा-ओरडा करुन गेले ती घटना काल रात्रीची होती.

खूप दिवसांनी वीरभद्र व त्यांच्या जुन्या मित्रांनी एकत्र येऊन मजा करायची ठरवले होते. ते सर्व त्याच्या उमेदवारीच्या काळातले मित्र होते. कित्येक वर्षात त्यांच्या गाठीभेटी झालेल्या नव्हत्या. गेल्या  काही दिवसांपासून वीरभद्रला काम नसल्याने तो अतिशय कंटाळला होता. तश्यातच त्याला जेंव्हा त्याच्या जुन्या मित्राचा फोन आला आणि त्याने एकत्र जमून उंची हॉटेलमध्ये भोजनाची कल्पना दिली तेव्हा, कुठलेही आढेवेढे न घेता, वीरभद्रने  आनंदाने ते आमंत्रण स्वीकारले.

तो समारंभ त्यांच्या विवाहपुर्वीच्या मित्रांचाच असल्याने कुणीही आपल्या पत्नीला सोबत आणलेले नव्हते. सहाजिकच वीरभद्र विजयाला एकटीला घरी सोडून आला होता. विजयाला सोडून तो सहसा कुठे जात नसे पण काल त्याला इलाज नव्हता. विजयाने त्याला हसत परवानगी दिली. तिच्या मते कधी तरी नवरा बायकोने स्वतंत्र काळ घालवायला हवा.

विजया काल रात्री सिनेमाला गेली होती. ती घरी परतली तेव्हा वीरभद्र परतला नव्हता. ते दोघे नसल्याने त्यांचा इमानदार नोकर, भैरव, लवकर झोपायला गेला. ‘वीरभद्रची पार्टी बरीच रंगलेली दिसते’ झोपण्यापुर्वी तिच्या मनांत विचार आला. त्याची फार वेळ वाट न पहाता ती झोपी गेली होती.

तिच्या मनात आलेला विचार बरोबर होता. बऱ्याच वर्षांनी भेटलेल्या मित्रांच्या गप्पा संपत नव्हत्या. जुन्या आठवणीना उजाळा मिळत होता. सध्या कोण काय करते याची माहीती पुरवली जात होती. वीरभद्रने आपण कमीशन एजंट असल्याचे त्रोटक सांगून गोष्ट संपवली होती. तो स्वतःबद्दल फारसे कुणाशी बोलत नसे. तरी सुध्दा वीरभद्रची किर्ती मुंबईच्या ठराविक वर्तुळात पसरली होती.

ठराविक काही मित्रांना तो काय करतो याची पुर्ण कल्पना होती. त्याच्या कामगिरीबद्दल त्यांना पुर्ण आदर होता. कारण त्यानेंच त्यांची कधीतरी संकटातून सुटका केलेली

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

होती. वीरभद्रच्या विनम्र स्वभावामुळे तो केलेल्या उपकाराचे कुणाला स्मरण करून देत नसे. पण त्याने केलेले उपकार सगळयांच्या लक्षात रहात.

जेवणं आटोपल्यावरही ते बराच वेळ गप्पा मारत होते. त्या हॉटेलमध्ये वीरभद्र विजया सोबत अनेकदा गेला होता. तेथील सर्वजण त्याला चांगले ओळखत होते. ते रात्रभर गप्पा मारत बसले असते तरी त्यांना कुणी जायला सांगितले नसते. तरीही हॉटेल बंद होण्यापुर्वी त्यांनी आपल्या गप्पा आवरत्या घेतल्या व पुन्हा लवकरच भेटायचे ठरवून एकमेकांचा निरोप घेतला.

त्याचें सगळे मित्र आपापल्या घरी गेले तसा वीरभद्रही घरी जाऊन झोपला असता तर... . ?

पण वीरभद्र सर्वसामान्याप्रमाणे आयुष्य जगणाऱ्यातला नव्हता. संकटं त्याच्यासमोर आव्हान देऊन उभे ठाकत व तो त्या आव्हानाचा हसतमुखाने स्वीकर करी.

सगळे मित्र आपापल्या रस्त्याने निघुन गेले. वीरभद्रही आपली कार चालवत घराकडे निघाला. वाटेत त्याला सिगारेट ओढण्याची तलफ आली, म्हणून त्याने आपली मोटार रस्त्याच्या कडेला उभी केली. खिशातून सिगारेटचे पाकिट बाहेर काढले, तेव्हा आपल्या सिगारेट संपल्याचे त्याच्या लक्षात आले. जवळच एक पानटपरी उघडी होती. तेथून सिगारेट घेऊन वीरभद्र मजेत झुरके घेत आपल्या मोटारी जवळ परतत होता.

तेव्हढयात, अचानक, शेजारच्या गल्लीतून एक तरूणी धावत आली. ती सरळ वीरभद्रच्या अंगावर आदळली. वीरभद्रने तिला सावरली नसती तर ती रस्त्यावर कोसळली असती. तिचा श्वास इतका फुलला होता की तिला नीटसे बोलायला येत नव्हते.

‘ते... ते... ’ तिने हात उचलून पाठीमागे बोट दाखवले.

वीरभद्रने तिकडे पाहीले. तिच्या मागे चार गुंड लागले होते. त्यांच्यापासून वाचण्यासाठी ती जीवाच्या आकांताने पळत होती. तिचे नशिब चांगले म्हणून ती येऊन नेमकी वीरभद्रच्या अंगावर आदळली. संकटात सापडलेल्या तरूणीने वीरभद्रकडे मदतीची याचना केली आणि वीरभद्रने ती नाकारली असं आतापर्यंत घडलं नव्हतं.

'ओहो! ही मांजरांची पिलं तुझ्या मागे लागली म्हणून तू घाबरलीस होय? अजिबात घाबरु नकोस. जो पर्यंत हा वीरभद्र तुझ्या पाठीशी आहे तो पर्यंत तुला हात लावण्याची कुणाची हिम्मत होणार नाही. ' तिच्या पाठीवर आश्वासक थोपटत वीरभद्र म्हणाला.

'वीरभद्र!  तुम्ही वीरभद्र आहात?' तिच्या चेहऱ्यावर समाधानाची झाक दिसली.

'अर्थातच. गुन्हेगारांचा कर्दनकाळ म्हणून सगळ्या मुंबईत प्रसिध्द असलेला वीरभद्र तो मीच. तू आता इथं उभी रहा. मी त्यांना पिटाळून हा आलोच परत. '

एव्हढे बोलून वीरभद्र गुंडांकडे वळला. त्या आधीच दोन धिप्पाड गुंड त्याच्यावर चालून आले. वीरभद्र सावध होता. त्याने एका गुंडाच्या हनुवटीवर सणसणीत ठोसा लगावला. तो धडपडत दूर जाऊन पडला. दुसऱ्या गुंडाने वीरभद्रला मागून पकडण्याचा प्रयत्न केला. वीरभद्रने त्याच्या हाताला धरून समोर ओढले व त्याच्या गालावर एक खास ठोसा मारला. आपल्या साथीदारा सोबत तोही रस्त्यावर पडला. ते दोघे वेदनेनी कळवळत होते.

त्यांचे दोन साथीदार अजुन गल्लीतच होते. त्यांचा समाचार घ्यायला आपण तिकडे जावे की त्याना बाहेर येऊ द्यावे याचा वीरभद्रने विचार करण्या आधीच ते आपल्या साथीदाराच्या मदतीला धावले. त्यांच्यातील एकजण त्वेषाने वीरभद्रच्या अंगावर धावून आला. त्याला अडविण्यासाठी वीरभद्र पवित्रा घेऊन उभा होता. अचानक तो अंगावर धावून येणारा गुंड थांबला. रस्त्यावरील दिव्याच्या प्रकाशात त्याने वीरभद्रला नीट पाहीले आणि अवसान गेल्याप्रमाणे तो जागीच थांबला. दुसऱ्या क्षणी त्याने मागे वळून पळायला सुरवात केली. पळताना तो ओरडला,

'पळा. . पळा. . अरे, हा तर वीरभद्र आहे. !'

त्याला पळताना पाहून त्याच्यामागून येणारा गुंड मागच्या मागेच पळून गेला. रस्त्यावर कळवळत पडलेले गुंड कसेबसे उठून आपल्या गालावर हात ठेऊन पळून त्यांच्यामागे गल्लीत दिसेनासे झाले.

त्यांना पळून जाताना पाहून वीरभद्रला मजा वाटली. हसतच तो त्या तरुणीकडे वळला. पण ती आता उभं राहण्याच्या परिस्थितीत नव्हती. वीरभद्रने धांवत जाऊन तिला


©ई साहित्य प्रतिष्ठान

धरले नसते तर ती शुध्द हरपुन रस्त्यावर पडली असती. तिला अलगद उचलून त्याने खांद्यावर घेतले व आपल्या मोटारी कडे चालू लागला.

'माझ्या मैत्रीणी, 'वीरभद्र तिला उद्देशून स्वतःशी बोलला, 'तू बेशुध्द पडलीस याचे मला वाईट वाटते. आता तुला माझ्या घरी घेऊन गेल्याशिवाय गत्यंतर नाही. पण त्याहीपेक्षा मला माझी सिगारेट आरामात ओढता आली नाही याचे वाईट वाटते. '

वीरभद्र तिला आपल्या घरी 'वीरभद्र महाल' वर घेऊन आला. एव्हढया रात्री विजयाची झोपमोड करण्याची त्याची इच्छा नव्हती. त्याने त्या तरुणीला आपल्या बंगल्यात तयार केलेल्या खास गुप्त खोलीतील बिछान्यावर नेऊन झोपविले. तिला झोपेचे इंजेक्शन दिले. ती रात्रभर आरामात झोपेल याची खात्री झाल्यावर तो झोपायला गेला तेव्हा रात्रीचा दीड वाजून गेला होता. रात्रीच्या साहसाने तो मोठा खुशीत होता.

वीरभद्र विनोदरावाना निरोप देऊन हॉलमध्ये परतला तेव्हा तो खो खो करून हसत होता. विनोदरावाच्या चडफडण्याने त्याला नेहमीच गुदगुल्या होत असत. तो दिवाणखान्यात आला तेव्हा विजया गंभीर मुद्रेने त्याच्याकडे पहात होती. तिचा गंभीर चेहरा पाहून त्याचे हसणे थांबले. चेहऱ्यावर गंभीर भाव आणून तो म्हणाला,

'तू एव्हढे गंभीर होण्याचे कारण नाही विजू. तुझा त्या विनोदरावाच्या बोलण्यावर भलताच विश्वास बसलेला दिसतो. '

'माझा, माझ्या नवऱ्यावर पुर्ण विश्वास असला तरी मी त्याला चांगले ओळखून आहे. ' जाब विचारणाऱ्या तिच्या आवाजात संशय होता. 'मला सांगा, तुम्ही कालरात्री कुठल्या तरुणीचे अपहरण केले? तिला कुठे लपवून ठेवले? विनोदराव तुमचा कितीही राग करीत असले तरी ते तुमच्यावर खोटे आरोप करणार नाहीत याची मला पूर्ण खात्री आहे. '

'ते खोटे बोलत नव्हते हे मला मान्य आहे. 'वीरभद्र तिच्याकडे पहात म्हणाला.


©ई साहित्य प्रतिष्ठान

‘म्हणजे? काल रात्री तुम्ही खरंच कुणा तरुणीचे अपहरण केले की काय? वीरभद्र तुमचा साहसाचा हा नाद विपरित वळणावर चालला बरं. ’ तिने बजावले.

‘विजू... विजू... आपल्या एकनिष्ठ पतीवर आरोप करण्यापुर्वी तुला जरा सुध्दा विचार करावासा वाटत नाही ना? लाडके, मी तुला सोडून इतर कुणाचा विचार सुध्दा करू शकेल असं तुझ्या मनात आलं तरी कसं?’

‘तुम्ही तर आता म्हणालात ना, विनोदराव म्हणाले ते खरं आहे. ते म्हणाले, तुम्ही काल रात्री कुणा तरुणीच्या नातेवाईकांना बेदम मारहाण करून तिला त्यांच्यापासून पळवून आणलं. ’

‘काल मी एका तरुणीला घरी घेऊन आलो हे खरं आहे. पण ते तिने मला मदत मागितली म्हणून. विनोदराव ज्यांना तिचे नातलग म्हणाले, ते तिचे नातलग नसून मुंबईचे नामांकित गुंड आहे. ते तिचा पाठलाग करीत होते. ती बिचारी एखाद्या घाबरलेल्या हरिणीसारखी त्यांच्यापासून पळत होती. मी नसतो तर त्या गुंडांनी तिची काय अवस्था केली असती देव जाणे. ’

‘मी तुम्हाला चांगली ओळखून आहे. संकटात सापडलेली तरुणी हा तुमच्या जिव्हाळयाचा विषय आहे. मला खरं सांगा वीरभद्र ती तरुण असून सुंदरही आहे ना?

‘होय विजू, ती तरूण आहे पण तुझ्यापेक्षा सुंदर नाही. किंबहूना तिला सुंदर म्हणू शकणार नाही. पण म्हणून कुणीही गुंडांनी माझ्यासमोर तिला त्रास द्यावा हे मी कसं सहन करणार? मी तुला शपथपुर्वक सांगतो, की मी तिला घरी घेऊन आलो ते ती तरुण आहे म्हणून नव्हे, तर ती खरंच संकटात सांपडली होती. ’

‘हे तुम्ही मला आधीच का नाही सांगितले?’ तक्रारीच्या सुरात ती म्हणाली.


©ई साहित्य प्रतिष्ठान

'कधी सांगणार होतो विजू? रात्री मी परतलो तेव्हा तू झोपलेली होतीस. सकाळी मी उठलो तो विनोदरावच्या ओरडयाने. '

विजयाने क्षणभर विचार केला. तिला त्याचे म्हणणे पटले. त्याच्या बोलण्यात तथ्य होते. किंचित् ओशाळून ती म्हणाली,

'वीरभद्र मी तुमच्यावर संशय घेतला याबद्दल तुम्ही मला क्षमा करणार ना? तुम्ही माझा राग धरू नका. पण मला सांगा ती तरुणी कोण आहे? ती नेमकी तुम्हालाच कशी भेटली? सध्या ती  कुठे आहे?

'विजू, मी तुझा राग धरील असे तुला वाटले तरी कसे? तुझ्या मनात शंका येणं सहाजिक आहे. विनोदराव येण्याआधी मी उठलो असतो तर सर्व शंकांचा खुलासा झाला असता. पण ते जाऊ दे. तू आधी बस कशी. मी तुला घडलेली हकीकत इत्थंभूत सांगतो.  ठीक?'

ती विसावून बसल्यावर वीरभद्रने तिला काल रात्री घडलेली सगळी घटना विषद् केली. शेवटी तो म्हणाला,

'ती बेशुध्द पडल्याने तिला कुठे सोडावे हा प्रश्न पडला. शेवटी मी तिला आपल्या घरी घेऊन येण्याचे ठरविले. '

'पण मग तुम्ही तिला पोलिसात का नाही पोहचविले?' विजयाने विचारले. पण तिला माहीत होते, आपला प्रश्न निरर्थक आहे.

'विजू, तू आपल्या नवऱ्याला ओळखत नाहीस काय? मी तिला पोलिसात दिले असते तर त्यांनी माझ्या हकिकतीवर विश्वास ठेवला असता काय? पोलीस, त्यातून विनोदराव, कधी माझ्या विश्वास ठेवतील असे तुला वाटले तरी कसे? शिवाय विजू, सध्या आपण रिकामेच आहोत. एकादे नवे साहस समोर आले तर आपल्याला नको आहे काय?'

‘अर्थातच आपल्याला ते हवे आहे. पण वीरभद्र त्यात तुम्ही एकटे भाग न घेता आम्हालाही सामिल करून घ्यायला हवं. ’ तिने बजावले.

‘अर्थातच! तुमच्या दोघांशिवाय हे साहस अपूर्ण राहील. ’ त्यांचे बोलणे ऐकत बसलेल्या भैरवकडे नजर टाकून वीरभद्र म्हणाला. ‘मला या प्रकरणात तुझे आणि भैरवचे सहकार्य लागणारच आहे. मी आपले नवे साहस जाहीर करीत आहे. ’

वीरभद्र हात वर करून म्हणाला. ते ऐकून जवळ बसलेला भैरव एव्हढा खुश झाला की आनंदाने त्याने फक्त नाचायचे बाकी ठेवले.

‘चला, मजा येईल. मालक तुम्ही कालच मला तुमच्या सोबत ठेवायला हवे होते. ’

‘वीरभद्र, ही भानू भारस्वाडकर आहे तरी कोण? तिचा भार्गव भद्रेशी काय संबंध?’ विजयाची उत्सुकता वाढली. नव्या साहसाच्या कल्पनेनं ती उत्तेजीत झाली.

‘मलाही त्या संबंधी काही माहीती नाही. खरे तर मला तिचे नावही माहीत नव्हते. विनोदरावांनी सांगितल्यावरून तिचे नाव भानू भारस्वाडकर आहे. ती बेशुध्द पडल्याने मला तिची माहीती घेता आली नाही. ’

हातातल्या घडयाळाकडे नजर टाकून तो म्हणाला,

‘मी दिलेल्या इंजेक्शनचा प्रभाव उतरून एव्हाना ती जागी झाली असेल. तिला भूकही लागली असणार. चल, भैरव तू आपल्या सगळयांच्या जेवणाची व्यवस्था कर. तोवर आम्ही तिला घेऊन येतो. विजया तूही माझ्या सोबत चल म्हणजे तिला बरें वाटेल. आपण तिच्याच तोंडून तिची हकीकत ऐकू या. ’

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

३.

।

भानूला जाग आली तेव्हा आपण कुठे आहोत ते क्षणभर लक्षात आले नाही. अनोळखी जागा पाहून ती ताडकन उठून बसली. हळू-हळू तिला काल रात्रीचा प्रसंग आठवला. चार मवाली तिच्यामागे लागले होते. त्यांच्यापासून दूर जाण्यासाठी ती जिवाच्या आकांताने धावत होती. त्याचवेळी समोरून येण्याऱ्या बलदंड व्यक्तिशी तिची टक्कर झाली. त्याने तिला सावरले नसते तर ती रस्त्यावर कोसळली असती.

त्याने तिला नुसते सावरलेच नाही तर तिच्यासाठी तो त्या गुंडाशी मारामारी करायला तयार झाला. तिला आठवले, त्याने आपले नाव वीरभद्र सांगितले होते. वीरभद्र नाव तिला चांगलेच परिचयाचे होते. त्याचे कारनामे तिने वर्तमानपत्रातून वाचले होते. त्याला भेटण्याची तिला मनापासून इच्छा होती. ती अशा रितीने पुर्ण झाली याची तिला गम्मत वाटली.

त्याला ओळखून ते मवाली पळून गेले. अतीश्रमाने आणि  तणावाखाली वावरल्याने आपल्याला पुन्हा घेरी आली तेव्हा त्याने पुढे होऊन आपल्याला सहारा दिल्याचे तिला आठवले. पण आता जाग आल्यावर या अनोळखी जागेत बंदीस्त झाल्याचे तिच्या निदर्शनास आले.

बाहेर पडण्यासाठी दरवाजा शोधण्याचा तिने प्रयत्न केला, पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या खोलीला दरवाजाच नव्हता की, कुठली खिडकी नव्हती. असे असून सुध्दा खोलीत जराही गुदमरल्यागत होत नव्हते. खोलीतच अद्ययावत बाथरुमची  सोय होती.

भानू काही भित्र्या स्वभावाची मुलगी नव्हती. किंबहूना तिच्या धाडसी स्वभावामुळेच ती संकटात सापडली होती.

भानू भारस्वाडकरचं पुर्ण नाव भानुमति सूर्यकांत भारस्वाडकर. तशी ती इतर सामान्य मुलींपेक्षा काही वेगळी नव्हती. तिचे वडील शिक्षक होते. मध्यम वर्गातल्या मुलीप्रमाणेच तिच्यावर संस्कार झाले. ती जेंव्हा कॉलेजला गेली तेव्हाही तिच्या आयुष्यात आतापर्यंत फार काही नाटयमय घडले नाही.

दिसायला तिला सुंदर म्हणू नये असं काही नव्हतं. पण तिच्यासाठी मुलांमध्ये भांडण व्हावं किंवा तिच्याशी मैत्री करण्यासाठी कुणी जीव टाकावा असंही तिच्यात काही नव्हतं.

तिच्यात इतरांपेक्षा दोन गुण वेगळे होते. एक म्हणजे ती अतिशय धाडसी होती. तिच्या स्वभावात बेदरकारपणा तिच्या व्यायामाच्या छंदामुळे आला होता. तिला पाहून वाटत नसलं तरी ती एक उत्कृष्ट बॉक्सरपटू होती. ज्या गोष्टी करायला मुलींना संकोच वाटायचा किंवा भीती वाटायची त्या गोष्टी ती बिनधास्त करीत असे. त्या एका गुणामुळे ती कॉलजमध्ये सगळयांना माहीत होती. कोणत्याही कामासाठी मुली तिला सोबत घेऊन जात असत. ती सोबत असली म्हणजे बोलण्याचे मुख्य काम तिच करत असे.

दुसरा  गुण म्हणजे, ती अतिशय सुंदर नकलाकार होती. एखाद्याचे जरावेळ निरिक्षण करून ती हूबेहूब त्याची नक्कल करीत असे. तिच्या या दैवी देणगीमुळे ती मित्र मैत्रीणीत हवीशी झाली असली तरी, ज्यांच्यात तिची नक्कल स्वीकारण्याची खिलाडूवृत्ती नसे ते तिचा राग करीत. कधी रागाचे रुपांतर भांडणात होई. पण त्याचे रूपांतर वैरात होणार नाही याची भानू काळजी घेई. कुणी रागावले तर ती सरळ त्याची क्षमा मागे. जरी तिने क्षमा मागितली, आणि समोरच्याने  तिला क्षमा केली तरी, पुढच्या वेळी ती त्याची नक्कल करणार नाही, याची खात्री ती स्वतः देऊ शकत नसे.

'मी काय करू?' भाबड्या सुरात ती कबुल करी, 'एखाद्याकडे पाहता-पाहता मला त्याची नक्कल करून बघण्याची इतकी प्रबळ उर्मी येते की, मी स्थळ-काळ विसरून आपसूक नक्कल करु लागते. '

तिच्या स्वभावातला गोडवा समोरच्याच्या मनात झिरपत जातो. ते तिच्याशी कायमचे वैर ठेऊ शकत नाही. पण असे सर्वांच्या बाबतीत खरे असते असे नाही. ज्यांचा अहंकार पराकोटीला गेलेला असतो ते क्षमाशिल नसतात.

मिसेस नंदीता सुरीला आपल्या शिक्षणाचा, आपल्या रुपाचा, आपल्या बुद्धीचा आणि एकंदरीत आपला स्वतःबद्दलचा इतका स्वाभिमान होता की त्याचे रूपांतर गर्वात झालेले तिच्याही लक्षांत आले नाही. ती स्वतःला इतके परिपूर्ण समजत की, तिच्या कृतीत कुणी उणिव काढलेली तिला खपत नसे. असे कुणी चुकून जरी केले तरी ती मनांत डूख धरुन त्याला चांगला धडा शिकवी.

त्याला कारणही तसेच होते. त्या कॉलेजमध्ये तिचे डॅडी प्रिंसीपल होते. तिची मम्मी इंग्रजीची हेड ऑफ डिपार्टमेंट होती. नंदीता  इंग्लडाला जाऊन जॉर्ज बर्नाड शॉ वर डॉक्टरेट घेऊन आली होती. इंग्लडला जाण्यापूर्वी ती एक साधी सरळ भारतीय मुलगी होती. पण इंग्लडहून परतली तेव्हापासून तिच्यात फरक पडला होता. आपण केवळ मम्मी डॅडीच्या आग्रहाखातर ह्या कॉलेजमध्ये नोकरी करतो, असे ती सांगत असे. तिच्या ज्ञानाची कदर व्हावी असे कॉलेज भारतात नाही. सगळया कॉलेजेसमधून रेसकोर्सचे घोडे तयार केले जातात, हे तिचे लाडके मत होते.

लिटरेचर समजायला, त्यातून इंग्रजी लिटरेचर, अँड पर्टीक्युलरली बर्नाड शॉ, फार उच्च बुध्दीचा आणि अभिरूचीचा माणूस लागतो. अशी माणसं इंग्लंडमध्ये सुध्दा दुर्मिळ आहेत. त्यांना उठसूठ त्या शेक्सपियरचं कौतुक.

भारतीय पार्श्वभूमिवर तिचे वागणं विदूषीप्रमाणे न वाटता विदुषकी वाटे. अश्या आगळया वेगळया पात्राची नक्कल करण्याची उर्मी भानूला होणे अगदी स्वाभाविक होतं. पण त्यासाठी तिने निवडलेले स्थळ आणि वेळ पुर्णतः चुकीची होती. स्थळ होते आपला वर्ग. आणि वेळ होती, नंदीताचा पिरियड सुरू होण्यापूर्वीचा.


©ई साहित्य प्रतिष्ठान

भानूचा चेहरा रबरापासून बनविला असला पाहीजे. नाहीतर तिचा चेहरा हूबेहूब ती ज्याची नक्कल करी त्याच्या सारखा कसा दिसतो? आता सुध्दा तिने ओठ खालच्या बाजूला वळवून हनुवटी पुढे केली. कपाळावर आढयांच जाळं पसरलं. डोळे किंचित् आक्रसले गेले. नंदीता सुरीच्या पध्दतीने बोलत ती फळयाकडे वळाली. सगळा वर्ग नुसता खिदळत होता.

अचानक वर्ग शांत झाला. तिने वळून पाहिले. दारात रागाने नखशितांत थरथरत नंदीता सुरी उभी होती. तिला समोर पाहून भानूच्या हातापायातून वारं गेल्यागत झालं. सगळा वर्ग श्वास रोखून घडणार नाटय पहात होता. भानू लगेच भानावर आली. पुढे झुकून ती म्हणाली,

‘आय अँम सॉरी मॅडम. इट वॉज नथिंग बट फन्... मॅडम... . सॉरी मॅडम... मॅडम... ’

नंदीता दाणदाण पावलं वाजवित, निघून गेली.

ती गेल्यावर मुलांची आपसात कुजबुज सुरु झाली, तिकडे भानूचे लक्ष नव्हते. ती तंद्रीतच आपल्या जागेवर जाऊन बसली आणि वह्या पुस्तकें गोळा करू लागली.

‘चूक झाली आहे’, ती मनात विचार करू लागली, ‘वर्ग ही काही  नक्कल करण्याची जागा नव्हे. तरी मी नेहमी मनाशी निश्चय करते, वेळ काळ पाहून कुणाची नक्कल करायची. नक्कल खाजगीतच करायची. पण भान कसे ते रहातच नाही. आपले नुसते नावच भानू आहे. चुक आपलीच आहे. भोगा आता समोर येईल ते. सगळा वर्ग हसत होता. नंदीता मॅडमच्या जागी आपण असतो तर आपल्यालाही वाईट वाटले असते. आता पुढे काय परिणाम होईल त्याला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी लागेल. क्षमा तर मागूच त्याने काय लहानपण येत नाही. ’

अपेक्षेप्रमाणे प्रिन्सिपल साहेबांच्या ऑफिसमध्ये पाचारण करण्यात आले. ती खाली मान घालून निघाली. पाठीमागून मुलांच्या कॉमेंटस् ऐकायला आल्या. तिकडे दुर्लक्ष करून ती वर्गाबाहेर पडली.

प्रिन्सिपल सुरींच्या ऑफिसमध्ये वातवरण भलतच गंभीर झालं होतं. नंदीता मॅडम नाकातून फुसफुस आवाज करीत प्रिन्सिपलसमोर खुर्चीवर बसलेल्या होत्या. त्या मुठीतल्या

रुमालाने  वारंवार डोळे पुसत होत्या. टेबलावर, भानूने अंदाज केला, तिचे कॉलेजचे  रेकार्ड पडलेले होते.  ती दारात येऊन खालीमान घालून उभी राहीली.

‘सर... . ?’

त्यांनी वर पाहीले. तिला  मान हालवून आत बोलावले. हळू चालत ती त्यांच्या टेबला जवळ येऊन उभी राहिली. त्यांनी तिला बसायला सांगितले नाही.

तिच्याकडे रोखून पाहत त्यांनी विचारले,

‘ती तूच आहेस ना, प्रभातला डावलून, कुणाच न ऐकता, इंटरकॉलेजला बॉक्सिंगसाठी गेली होतीस?’ त्यांच्या सुरात उपरोध होता. भानूने त्यांचेही ऐकले नव्हते. तो राग अजून सर विसरले नव्हते तर.

‘प्रभातला डावलून नव्हे, त्याला हारवून. ’ ती ठसक्यात म्हणाली.

ती असे बोलेल अशी त्यांना अपेक्षा नव्हती. चष्म्यातूनही त्यांच्या नजरेतली रागाची थिनगी दिसली.

‘मिस् भानूमति सूर्यकांत भारस्वाडकर. तुम्ही कॉलेजात कशाला येता? शिकायला की नकला करायला?’ त्यांनी कडक शब्दात विचारले.

‘सॉरी सर. माझी चुक झाली. त्याबद्दल मी मॅडमची वर्गात माफी मागितली. पुन्हा तुमच्यासमोरही माफी मागायला तयार आहे. ’

‘त्यांना तुमच्याकडून लेखी माफी हवीय. पुन्हा अशी चुक करणार नाही याची खात्री तुम्ही द्यायला हवी. ’

‘सर, मी वर्गातच सगळयांसमोर त्यांची जाहीर माफी मागितली. ’

'नाही. त्यांना लेखीच हवी. ' ठाम सुरात ते म्हणाले, 'शिवाय बेशिस्त वर्तणुकीबद्दल तुम्हाला दंडही भोगावा लागेल. तुम्हाला पंधरा दिवसांसाठी कॉलेजमधून रेस्टीकेट करण्यात येते आहे. '

'पंधरा दिवस! छान! मज्जा नाही. ' तिने मनात विचार केला. 'चला हे तरी एक बरं झालं, सरांनी पैशात फाईन नाही सांगितला. नाही तर डॅडीशी खोटं बोलवं लागलं असतं. चला, दंड स्वीकारुन मोकळं व्हावं. नाहीतरी चुक आपलीच आहे. किती केलं तरी ती प्रिन्सिपलसरांची मुलगी आहे. तिची भर वर्गात नक्कल केल्यावर शिक्षा तर होणारच.

'ठीक आहे सर, मी शिक्षा भोगायला तयार आहे. 'मनातली खुशी लपवत, मान खाली घालून ती म्हणाली.

'आणि लेखी माफी?' नंदीता भानूला उद्देशून सरांशी बोलली.

'लेखी काय करायची सर? त्या काय फ्रेम करून लावणार आहे घरात?' तिला राग आला. उगाच एखाद्या गोष्टींबद्दल अडून बसायचं म्हणजे काय?

'सी हर ॲरोगंस्. आय विल नॉट अलौ हर टू अटेंड माय पिरियडस् एनी मोर. '

ती फणकाऱ्याने उभी राहीली आणि पावलांचा टापटाप आवाज करीत निघुन गेली.

प्रिंसिपलच्या चेहऱ्यावर अपराधी झलक येऊन गेलेली दिसली. लगेच स्वताः सावरून घसा साफकरून ते म्हणाले,

'तिच्याकडे लक्ष देऊ नका. ती लहानपणापासून अशीच हट्टी आहे. घरी गेल्यावर मी तिची समजूत काढील. पण पंधरा दिवसांकरता तुम्हाला कॉलेज बंद आहे, लक्षात ठेवा. तिच्या पिरियडला बसण्याची तुला परवानगी मिळविण्याचा मी प्रयत्न करीन. '

'तशी गरज नाही सर. त्यांना बर्नाड शॉ शिवाय काही येत नाही. बर्नाड शॉ आहे किती? वीस मार्काचा. '

सरांच्या डोळयात राग तरळला.

‘या आता. ’तुसडया सुरात ते म्हणाले.

‘यस सर. ’ ती निघाली.

आता तिला जराही गिल्टी वाटत नव्हतं. तिला शिक्षा झाली, कारण तिची चुक होती. पण नंदीता मॅडमने ही गोष्ट जास्त ताणली. तिने मॅडमची वर्गात माफी मागितली होती. सरांची मुलगी नसती तर त्यांनी असंच हाताळलं असतं का प्रकरण? दुसऱ्या मॅडम त्यांच्या समोरून अशाच फणकाऱ्याने उठून जाऊ शकतात का? ती मान उंचावून जाऊ लागली.

‘जाताना, स्टाफरूममध्ये प्रा. केवाडकर असतील तर मी बोलवलं म्हणून सांगा. ’ दाराशी जाणाऱ्या भानूला उद्देशून सर म्हणाले.

त्यांची आज्ञा ऐकून तिला राग आला. त्यांची मुलगी गेली ना आत्ता तिला का नाही सांगितलं? मी नाही सांगणार.

‘सॉरी सर, मला पंधरा दिवस मला पिरयडला बसण्याची परवानगी नाही. मी वर जाणार नाही. मी होस्टेलला चालले. ’ फणकाऱ्याने ती म्हणाली.

केबीनचा दरवाजा आपटून ती घुश्शात बाहेर पडली.

II

केबीनमधूनबाहेर पडल्यावर तिने मान झटकली. बोटं केसातून फिरवून घडलेला प्रसंग डोक्यातून काढून टाकला. मरो ती नंदीता. उडत गेला प्रिंसिपल आणि तो ... ती अडखळली. त्यांच्या सोबत बर्नाड शॉ ला पाठविण्यास तिचे मन धजावले नाही.

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

अचानक समोर आलेल्या रिकाम्या दिवसांचे काय करावे तिला कळेना. आजचा दिवस ठीक आहे, पण पंधरा दिवस कॉलेज नाही म्हणजे अवघडच आहे. दिवसभर मैत्रीणी कॉलेजमध्ये जाणार आणि आपण काय करणार? पंधरा दिवस घराकडे जाऊन यावे तर बाबा चौकशी करणार? आई लेक्चर देणार. नकोच ते. त्यापेक्षा पंधरा दिवस औटींगला जाऊन यावं काय? तिला हा विचार चांगला वाटला, पण दुसऱ्या क्षणी आपल्या शिलकीची आठवण येऊन तो विचार बदलावा लागला. तिच्या जवळ जेमतेम महीनाभर पुरतील एव्हढेच पैसे शिल्लक होते.

कुणी आपल्याला स्पॉन्सर मिळाला तर? आपल्या विचाराचे तिला हसू आले. आपल्या सारख्याच सर्व मैत्रीणी आहेत. शे पाचशे उधार देणे घेणे ठीक पण स्पॉन्सर. . ? काय करावे पंधरा दिवस? वाचनालयातून पुस्तके आणावी? त्यापेक्षा विद्यापिठात जाऊन जर्नालिझमच्या कोर्सची चौकशी करावी. नाहीतरी पुढच्या वर्षी ग्रॅज्युएशन झाल्यावर काहीतरी करावे लागणार. डोळयासमोर असलो की आई रोज लग्नासाठी कटकट घालणार. त्यापेक्षा जर्नालिझम बरा. दोन वर्ष चांगली जातील.

विचार करीत ती कॉलेजच्या बागेत आली. पिरियड बुडवून कॉलेजच्या बागेत फिरणे हा तर तिचा आवडता छंद होता. बागेत फिरल्याने कॉलेज मधल्या अफेअर्स बद्दल ताजी माहिती मिळते हा तिचा अनुभव होता.

हे काय? त्या झाडाखाली, बाकावर एक मुलगी एकटीच अंगाचे गाठोडे करून बसली. कोण आहे बरं ती? तिला त्या अवस्थेत पाहून भानूला मजा वाटली. आधी तिला वाटले कुणीतरी पिरीयडा दांडी मारून आपल्या बॉयफ्रेंडची वाट बघणारी असावी. तिने तिच्या जवळ जाण्याचा विचार बदलला. पण वळण्यापुर्वी तिने पाहीले, त्या मुलीची पाठ गदगदून हालत होती. ती रडत होती. तोंडातून आवाज येऊ नये म्हणून तिने ओढणीचा बोळा तोंडात खुपसला होता.

भानूने तिच्या पाठीवर हात ठेवला तशी ती दचकली. घाबरून अंग चोरून ती ताडकन उभी राहीली.

'कोण नयना? काय झाले?' भानूने आश्चर्याने विचारले. काहीतरी मसालेदार मनोरंजन मिळाले म्हणून तिला आनंद झाला.

नयना त्यांच्या कॉलेज मधली मुलगी होती. दिसायला सुंदर नसली तरी तिला नटायला, मुरडायला आवडत असे. कॉलेजमध्ये ती अतिशय फॅशन करुन येत असे. अभ्यासापेक्षा तिचा ओढा गेट टू गेदर, सिनेमा, वाढदिवसांच्या पार्टया इत्यादीत जास्त होता. परिक्षेत ती नापास होत नव्हती इतकंच. आपल्याला किती फ्रेंडस् आहेत. आपण कसे कुणाला भाव देत नाही याची चर्चा करण्यात तिला आनंद वाटे.

अलिकडेच तिला नवा बॉयफ्रेंड भेटला होता. सुमीत. मेडिकलच्या शेवटच्या वर्षाला शिकत होता. त्यांची भेट तिच्या  एका मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीत झाली होती. सुमीत दिसायला सुंदर होता. मुली त्याच्याकडे लगेच आकर्षित होत असत. पुढच्या दोन तीन भेटीत ते एकमेकाच्या जवळ आले. त्यांना एकमेकांच्या आवडी निवडीबद्दल माहीती मिळाली. विषेशतः तिला. कारण तिला त्याच्यात रस वाटू लागला होता.

तो तिला भेटल्या पासून तिच्यात खुपच बदल झाला. तिचे इतर मित्रांना भेटणे कमी झाले. अभ्यासातली तिची रुची वाढली. कारण आयुष्य सीरियसली घडवायचं असतं असं सुमीतच मत होतं. तिला अध्यात्माची आवड निर्माण झाली होती. कारण अध्यात्माची बैठक असेल तर जीवनाचा संघर्ष सुलभ होतो. (हे शब्द सुमीतचे. इतके अवघड शब्द नयना कधी वापरत नाही. ) ती कुणा अनंतकोटी ब्रम्हाण्डनायक श्री जटाशंकर महाराजांचे पुस्तके आणून वाचू लागली. चार मैत्रिणी जमल्यावर ती थातूरमातूर विषयावर न बोलता श्रीजटाशंकर महाराजांच्या दिव्य गोष्टींबद्दल माहीती देई. (त्यामुळे तिच्या मैत्रिणी कमी झाल्या याची तिला जाणिव झाली पण सुमीत करता ती काहीही त्यागण्यास तयार होती. )

'सुमीतला नवी गर्लफ्रेंड मिळाली काय? तरी मी तुला सांगत होते बाई, त्याच्या नादाला लागू नकोस. तुम्हा मुलींना बॉयफ्रेंड नसला तर प्रतिष्ठा गेल्यासारख वाटतं. बरं झालं गेला. असा फ्रेंड असल्यापेक्षा नसलेला बरा. ' भानूने तिच्या पाठीवरून हात फिरवला तशी ती जास्त आवेगाने रडू लागली. तिने बोलण्याचा प्रयत्न केला पण तिच्या तोंडून नीटसे शब्द बाहेर पडेना.

'तू शांत हो आधी, मग बोल बाई. तुझा बॉयफ्रेंड रश्मीने पळवला का?' नयना आणि रश्मीत अंतस्थ स्पर्धा आहे याची भानूला कल्पना होती. रश्मीने जर तिचा बॉयफ्रेंड पळवला

असेल तर यापेक्षा लाजिरवाणी गोष्ट कोणती? तिच्या दुःखाची खोली तीनपट जास्त असणं सहाजिक होतं.

'नाही. माझा सुमीत अशा कुण्या ऐऱ्यागैऱ्या मुलीच्या प्रेमात पडणार नाही. ' हे बोलताना तिला किती समाधान वाटत होते व किती अभिमान वाटत होता हे तिच्या चेहऱ्यावरून भानूला जाणवले.

'मग का रडते आहेस?' भानूने आश्चर्याने विचारले. नयनाला रडण्यासाठी दुसरा कोणता विषय असू शकतो?

'अगं हा सुमीत... . ' तिने पुन्हा रुमाल डोळ्याला लावला.

'तू शांत हो बघू आधी. कुणी रडलं ना की मला कसंतरी होतं बाई. काही सुचत नाही. तू मला नीट सांगितलं तर मला काही मार्ग सुचेल'

सिनेमाचा अभिनिवेश सोडून ती  सामान्य मुलीसारखी बोलू लागली.

'आत्ताच सुमीत भेटून गेला. तो म्हणतो त्याचा डॉक्टर होण्यातला रस संपला. जीवन मिथ्या आहे. तो आपले आयुष्य जटाशंकरांच्या चरणी अर्पण करणार. सारे आयुष्य गरिबांच्या सेवेसाठी वाहून देणार आहे. आज रात्रीच्या गाडीने त्यांच्या आश्रमाकडे रवाना होणार आहे. '

'बाई... . ! डॉक्टरकी शिकतो ना तो? असल्या गोष्टींवर विश्वास ठेवतो? बावळट, तू आडवायचं नाहीस का त्याला?'

'अडवलं. पण मला तुसड्यासारखं म्हणाला, 'तुझ्या मोहात पडून मी लाखो जीवांची वंचना नाही करू शकत. मला... . मला असं म्हणाला. '

त्याच्या जाण्यापेक्षा तिला तो लाखोंकरता आपली वंचना करतो, याचं दुःख होतं. तिने पुन्हा दुपट्याचा बोळा तोंडात खुपसला.

‘मला एक सांग. तू खरंच त्याच्यावर प्रेम करते?’

तिने होकारार्थी मान हालवली.

‘लग्न करणार त्याच्याशी की नुसती फिरणार आहेस भिंगरी सारखी?’

तिने नकारार्थी मान हालवली.

‘मग इथं रडत का बसलीस? जा त्याच्या मागे. धावत जा. त्याच्या हाताला धरून परत आण. मुळात तू त्याला जाऊ द्यायलाच नको होतं. ’

‘कुठे जाऊ? एव्हाना त्यांच्या बसेस निघाल्या असणार. ’

‘कुठे?’

‘आश्रमात. ’

‘तू आश्रमात जा. तेथून घेऊन ये. ’

‘कशी जाणार? आठवडाभर महत्वाची प्रॅक्टीकल्स आहेत. ’

‘प्रॅक्टीकल्स काय घेऊन बसलीस? सुमीत महत्वाचा आहे ना?’

‘तो आहे गं. पण तो परत नाही आला तर सुमीतही जायचा आणि प्रॅक्टीकल्स पण जायचे. ’ वर्ष वाया जायचं.

‘तुला नसेल जमत तर कुणाला तरी तुझा निरोप घेऊन पाठव. ’

‘कुणाला पाठवू? माझ गुपीत सांभाळेल असं जीवलग कोण आहे?’तिचा चेहरा म्लान झाला. काहीतरी सुचून तिने अचानक विचारले, ‘तू जातेस?’

‘मी?’ तिच्या अचानक विचारण्याने भानू गडबडली.

‘हो. काय हरकत आहे? दुसऱ्या कुणाला पाठवल्यापेक्षा तूच जा. तू गेलीस तर मी बिनधास्त होईल. तसाही तुला मुलात फारसा इंटरेस्ट नाही. ’ ती सहज म्हणाली तरी तिच्या बोलण्यात स्वतःच्या रुपाचा अहंकार डोकवून गेला. भानू आपल्याच विचारात गर्क असल्याने तिच्या ध्यानात ते आले नाही.

‘नाहीतरी आपल्याला पंधरा दिवस कॉलेज नाही. ’ ती विचार करु लागली. ‘जर हीच्या पैश्याने फुकटची ट्रीप करायला मिळाली तर काय हरकत आहे? तो कोण बाबा आहे, त्याच्या आश्रमात चांगली राहण्याची वगैरे सोय आहे म्हणे. आपल्याला काय अध्यात्म करायला थोडंच जायचं? सुमीत भेटला तर त्याला तिचा निरोप द्यायचा.

तिला हा सुमीतचा मुर्खपणा वाटत होता. चांगला डॉक्टरीच्या शेवटच्या वर्षाला शिकतो. तिला वाटले डॉक्टर्स म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोन असलेले असतात. पण हा वेगळाच आहे. दिसायला तर एखाद्या सिनेमा नटा सारखा दिसतो. त्याच्या पुढे ही नयना म्हणजे… … असो. बिचाऱ्याचे नशिब त्याला आपण काय करणार?’

‘तुझा सगळा खर्च मी करते. त्याची तू काळजी करू नकोस. ’ तिला विचारात पडलेले पाहून नयना म्हणाली.

‘तो तर तुला करावाच लागेल. माझ्याकडे कुठले आलेत पैसे?’

‘एखादा दिवस रहावं लागलं तर रहा गं. पण त्याला सोबतच घेऊन परत ये बाई. मला तर फार… . . ’ तिने पुन्हा दुपटयाचा बोळा तोंडाकडे नेला. तो तोंडात खुपसण्याआधी भानूने ओढून घेतला.

‘रडू नको बाई सारखी, सारखी. मला सुसंगत विचार करता येत नाही. तो मला कुठे सांपडेल? तो कोणत्या विभागात काम करण्यासाठी गेला. काही सांगितलं का?’

‘कुणास ठाऊक बाई, तो जातो म्हणाल्यावर मी इतकी हळवी झाले की काय बोलावं ते सुचेना. मी विचारायला हवं होत ना?’

‘छे छे विचारण्याची काय गरज? तू रडत बसलीस तेच चांगलं केलं. आता त्याला नेमकं शोधणार तरी कुठे मी?’

‘त्यांच्या आश्रमात जातो म्हणाला. ’ तिने पुन्हा आपले तेच म्हणणे मांडले.

‘तो काय तुला कण्वऋषींचा आश्रम वाटला काय? अनंत कोटी ब्रम्हाण्ड नायक बाबा जटाशंकरांचा आश्रम आहे तो. तुला माहीत आहे? मी वाचलं त्यांच्याबद्दल. साडेतिनशे एकरमध्ये पसरलेला आहे, त्यांचा आश्रम. खूप लोक येतात. वेगवेगळे विभाग आहेत. त्याला शोधणं काय सोप काम नाही. ’ भानूचे बोलणे ऐकून नयना पुन्हा व्याकुळ झाली.

‘आता लगेच रडू नको. मी पहाते काय करायचं. तू मला प्रवासासाठी पैसे देणार हे नक्की ना?’ नयनाने मान हालवली.

‘ठीक. चल तर मग. तू पैसे घेऊन माझ्या रुमवर ये. मी प्रवासाची तयारी करते. मला वाटते मला सकाळीच ट्रेन आहे. ’ भानू खुशीत येऊन म्हणाली.

हे धाडस आपल्या जीववर बेतणार आहे याची तिला जराही कल्पना नव्हती.

कसल्यातरी सर्कन आवाजाने तिची तंद्री भंग पावली.

दचकून, कॉटवरुन उडी मारून, स्वरक्षणाच्या पवित्र्यात उभी राहून आवाजाच्या दिशेने रोखून पाहू लागली.

भिंत सरकून बाहेर जाण्याची वाट तयार झाली. दारात एक सुंदर तरूणी हसतमुखाने उभी होती.


©ई साहित्य प्रतिष्ठान

४.

I

मुठी वळवून आत्मसंरक्षणासाठी पवित्रा घेऊन उभी राहीलेली भानू, एखाद्या झेप घेण्याच्या तयारीत असलेल्या वाघिणी सारखी दिसत होती. तिला त्या अवस्थेत पाहून दाराबाहेर उभी असलेली तरूणी आत आली आणि हसत म्हणाली,

‘भानू, तुझा हा युध्दाचा अभिनिवेश सोड. आम्ही काही तुझ्याशी मारामारी करण्यासाठी आलो नाही. माझे नाव विजया. मी वीरभद्रची बायको. वीरभद्रला तू ओळखतेसच.’

विजयाच्या मागे आलेल्या वीरभद्रकडे लक्ष जाताच अंग सैल सोडून ती म्हणाली,

‘वीरभद्र, तुम्हाला भेटण्याची मला मनापासून इच्छा होती. ती अशारितीने पुर्ण होईल याची मात्र मला कल्पना नव्हती. त्या गुंडांना तुम्ही चांगला चोप देऊन पळवून लावले ते बरे केले. पण मला सांगा मी कुठे आहे. मला येथे येऊन किती वेळ झाला? आता किती वाजलेत?’

‘मला वाटते तू एकाच वेळी इतके प्रश्न विचारू नयेस. ’ वीरभद्र म्हणाला, तुला घाबरण्याची अजिबात गरज नाही. तू सध्या वीरभद्र महालात असून माझ्या संरक्षणात आहेस. येथे तुझा अंगाला धक्का लावण्याची कुणाची हिम्मत नाही. ’

‘मी इथं कधीपासून आहे?’

‘आता दिवसाचा एक वाजून गेला. तुला भूकही लागली असेल. मला वाटते आपण जेवण झाल्यावर निवांत बोलू या. ’ विजया तिचा हातधरुन म्हणाली.

‘हो. तू अजिबात काळजी करू नको. जेवणानंतर तू आम्हाला तुझी कहाणी सांग. कोण होते ते गुंड? तुझ्या मागे कशासाठी लागले होते? आम्हाला सगळी हकिकत सांग. तुला मदत करण्यात आम्हाला आनंदच होईल. हो की नाही विजू?’

‘अर्थातच. संकटात सापडलेल्या तरूणींना मदत करणारा म्हणून वीरभद्रची ख्याती सर्वश्रूत आहे. ते कदाचित् तुलाही माहीत असावे. ’ विजया हसून म्हणाली. तिच्या बोलण्यात वीरभद्रची तारिफ होती की त्याला टोमणा तिने मारला हे भानूच्या लक्षात आले नाही. वीरभद्रच्या हसऱ्या चेहऱ्यावर मात्र कसलाही परिणाम झाला नाही.

‘मला वाटते आपण आधी जेवायला जाऊ या. आपली वाट पाहून कंटाळून भैरवने जेवायला सुरवात केली तर आपल्याला बाहेर जेवायला जावे लागेल. ’ वीरभद्र म्हणाला.

‘मी केव्हाची जागी झाले. मी तयार आहे. पण मला बदलायला कपडे नसल्याने... . ’ भानू अडखळली.

‘त्याची व्यवस्था नंतर करु या. मला वाटते, आता आपण निघावं.’ विजया वळाली.

ते तिघे बाहेर पडले. भानूने विजयाच्या मागे जाण्यास सुरवात केली. त्यांची पाठ वळताच वीरभद्रने कुठली तरी कळ दाबताच क्षणी ते दार सरकन आवाज करुन बंद झाले. तो आवाज ऐकून भानूने वळून पाहीले. तेंव्हा तिथे पूर्वीसारखी भींत  तयार झाली होती. तिथे दरवाजा असल्याचे कुठलेही चिन्ह दिसत नव्हते. तो दरवाजा रिमोटने ऑपरेट होत असावा.

जेवताना कुणीच त्या विषयावर बोलले नाही. भानू भुकेली दिसत होती. ती संकोच न करता जेवत होती. वीरभद्र आणि विजयाच्या प्रेमळ वागण्याने तिचा परकेपणा दूर झाला होता.

जेवणानंतर ते दिवाणखान्यात निवांत येऊन बसले. कुणीच बोलत नव्हते. वीरभद्रने दिवसाची पहिली सिगारेट पेटविली. आता त्याच्या चेहरा गंभीर दिसत होता. सर्व सूत्र

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

वीरभद्रच्या हातात देऊन  विजया आरामखुर्चीवर स्वस्थ बसून होती. भानू जवळच गुबगुबीत सोफ्याच्या खुर्चीवर बसली. ती बोटांनी कपड्याच्या टोकाशी चाळा करीत होती. वीरभद्र आपल्याला काही प्रश्न  विचारील याची ती वाट पहात असावी. कदाचित ती आपली हकिकत सांगण्यासाठी शब्दांची जुळवा जुळव करीत असावी.

त्यांनी स्वतः होऊन तिला काहीही  विचारलं नसलं तरी काल रात्रीच्या प्रसंगाचं स्पष्टीकरण मागण्याचा ह्या जोडप्याचा अधिकार आहे. हे तिला मान्य होतं. त्यांना या प्रकरणाची किती माहीती द्यावी याचा ती विचार करीत होती.

‘तुला अवघड वाटत असेल तर तू आम्हाला काहीही नाही सांगितलं तरी चालेल. पण आज सकाळी तुझी चौकशी करण्यासाठी सुप्रिटेन्ट विनोदराव येऊन गेले. त्यावरून हे प्रकरण काही साधं आहे, असं मला वाटत नाही. ’ तिची अस्वस्थता लक्षात घेऊन विजया म्हणाली.

‘नाही तसं काही नाही. ’  भानू म्हणाली. पुन्हा शांत बसली.

‘हे बघ भानू, ’वीरभद्र गंभीर आवाजात बोलला.  ‘तुझं नाव भानू भारस्वाडकर असल्याचं आम्हाला विनोदरावां कडून कळलं. ह्या प्रकारबद्दल  काही सांगण्याची  इच्छा नसेल तर, तुझ्यावर  कुठलीही बळजबरी नाही. तुझ्या घराचा पत्ता सांग, भैरव तुला घरी सोडून येईल. ’

तरीही  काही न बोलता, कपडयांशी चाळा चालू ठेऊन, नजर गालिच्यात खुपसून बसून राहीली.

‘तू अजिबात विचार करण्यात वेळ घालवू नकोस. ’ विजया तिची व्दिधा मनस्थिती लक्षात घेऊन तिला उत्तेजन देण्याकरता म्हणाली. ‘तू कुठल्या संकटात सापडली असलीस तर निःसंकोच माझ्या नवऱ्याला सांग. तुला संकटातून बाहेर काढण्यासाठी त्याच्या इतका लायक दुसरा कुणी या मुंबईत तरी सांपडणार नाही. ’


©ई साहित्य प्रतिष्ठान

‘विजयाताई, ’ तिने विजयाकडे बघून बोलायला सुरवात केली, ‘मी संकटात सांपडले आहे हे तर नक्कीच. पण तुम्ही जर मला मदत करण्याचा प्रयत्न केला तर तुम्हीही संकटात सांपडणार नाही का? माझ्यामुळे तुमच्यासारखं सभ्य कुटूंब अडचणीत यावं हे माझ्या मनाला काही पटत नाही. वीरभद्र, तुम्ही मला क्षमा करा. काल माझ्याकरता तुम्हाला त्या मवाल्यांशी मारामारी करावी लागली. ’ बोलताना तिचे डोळे भरून आले.

वीरभद्र विनोद ऐकल्यासारखा मोठयाने हसला. विजयाच्या नजरेत मिस्किल चमक तरळून गेली.

‘भानू... तू वेडी आहेस. तू माझ्या नवऱ्याला पुरते ओळखले नाहीस. आजवर त्यांनी अनेक गुन्हेगारांना तुरूंगात पाठवले आहे. जे काम पोलिसांना कित्येक वर्ष जमलं नाही ते काम वीरभद्र लिलया करतात. ’ अभिमानाने  विजया म्हणाली.

‘तू बिनधास्त आम्हाला तुझी अडचण सांग. तुला आम्ही त्यातून बाहेर काढू. हा माझा तुला शब्द आहे. ’ वीरभद्र आत्मविश्वासाने म्हणाला.

‘ठीक आहे. मी तुम्हाला माझी हकिकत सांगते. या प्रकरणात गुंतायचं की नाही ते तुम्ही नंतर ठरवा. ’ ती जरा वेळ शांत बसली. बोटानी कपड्याशी चाललेला चाळा आता थांबला होता. तिने एकदा घसा साफ केला आणि गंभीर आवाजात तिने बोलायला सुरवात केली:

‘जटाशंकरच्या आश्रमात मी खून होताना पाहीला!’

॥

एकतिस तारखेला मी  जटाशंकरच्या आश्रमात जाण्यासाठी रेल्वेतून उतरले. पाऊस पडत नव्हता, पण केव्हाही सुरू होण्याची शक्यता होती. आश्रमात जाणाऱ्या भक्तासाठी रेल्वेस्टेशनपासून बसेसची मोफत सोय करण्यात आलेली आहे.

मी बसमधल्या प्रवाश्यांवरून नजर फिरवली. भारतातल्या विविध प्रांतातले लोक दिसत होतेच पण काही फॉरेनर्सही होते. बसमधले लोक रस्ताभर महाराजांच्या नावाचा जयघोष करीत होते. बस जेंव्हा आश्रमाच्या परिसरात येऊन थांबली तेव्हाभक्तांनी एकवार महाराजांचा जयजयकार करून उतरायला सुरवात केली.

उतरताच नजरेत भरली ती दूरवर उभी असलेली उंच इमारत. संपूर्ण परिसरात तेव्हढी प्रशस्त आणि उंच दुसरी इमारत नसल्याने ती परिसराच्या कुठल्याही भागातून दिसत होती. खाली उतरल्यावर काही भक्तांनी त्या इमारतीकडे पाहून  भक्तिभावाने हात जोडले. आपसात बोलताना कुणीतरी पहील्यांदा आलेल्या भक्तांना माहीती पुरवलेली माझ्या कानावर आली,

‘तो पंचकमळमहाल आहे. तेथे बाबा सगळयात वरच्या दलात राहतात. ’ ऐकणाऱ्यांनी तिकडे पाहून हात जोडले.

स्वागतहॉलमध्ये अनेक काउंटर्स उभारलेली होती. कॉम्प्युटर समोर ठेऊन अनेक तरुण तरूणी बसलेल्या होत्या. त्यांनी गुलाबी रंगाचे कपडे घातले होते. तो आश्रमातील कर्मचाऱ्यांचा पोशाख होता. ते हलक्या आवाजात बोलून भक्तांना मार्गदर्शन करीत होते. कॉम्प्युटरवरील कर्मचारी आश्रमातील उपलब्ध जागेप्रमाणे मुक्कामी राहणाऱ्या भक्तांच्या राहण्याची सोय करीत होते.

माझा नबंर यायला उशीर होता. बसल्या-बसल्या मी हॉलचे निरीक्षण केले. भिंतींवर जटाशंकराचा हात उचलून अशिर्वाद देतानाचा लाईफसाईज फोटो होता. फोटोसमोर समई तेवत होती. फुलांचा ताजा हार घातलेला होता. खांबावर आणि भिंतीवर त्याचे सद्विचार लिहीलेले होते. मला त्यात फार काही रस नसल्याने मी ते वाचले नाही. एका ठिकाणी परिसराचा नकाशा काढलेला होता. बाहेर पडण्या आधी तो नजरे खालून घालायचे ठरवून माझा नंबर येण्याची वाट पहात बसले.

माझा नंबर आला तेव्हा मी गोंधळले. तिथे किती दिवस रहावे लागणार याची मला अजिबात कल्पना नव्हती. सुमीत भेटला, त्याला निरोप दिला की माझे काम संपणार होते.

‘मॅडम, मला एक चौकशी करायची होती. ’ इतरांप्रमाणे हळू बोलण्याचा प्रयत्न करुनही माझा आवाज मोठा आला. (कारण अनेकांनी माझ्याकडे वळून पाहीले.)

‘इथं भगिनी म्हणायचं. ’ ती माझ्याकडे न पहाता म्हणाली.

‘ठीक. भगिनी, मला एक चौकशी करायची होती. माझा मित्र आलेला आहे इथं... ’

‘इथं तुम्हाला मित्रांसोबत रहाता येणार नाही. ’ तिचे एकसुरी आवाजात उत्तर आले.

‘आम्ही सोबत रहाणार नाही. त्याची भेट झाली तर मी एक दिवसात परतणार आहे. ’

‘तुम्हाला रूम कशी हवी? किती दिवसां करता हवी?’तिचा एकसुरी प्रश्न

‘तो आला की नाही ते सांगू शकता का?’मी जिद्द सोडली नाही.

‘स्वतंत्र रुम घेतली तर पांचशे रूपये रोज पडेल. सार्वजनिक रुममध्ये राहयला दिडशे रुपये पडतील. ’

‘तो नसेल आला तर मला इथं थांबण्याची गरज नाही. ’


©ई साहित्य प्रतिष्ठान

'तुम्हाला रूम लागत नसेल तर पुढच्याला येऊ द्या. तुमच्यामुळे इतरांचा खोळंबा होतो आहे. ' ती तुसडया सुरात म्हणाली.

आपण काही बोललो तरी ती तेच ते एकासुरात बोलत राहणार अशी भीती वाटून मी तीन दिवसांकरता स्वतंत्र खोली घेतली.

'भगिनी, ' माझ्या रुमची चावी घेतल्यावर मी चौकशी काऊंटरला जाऊन तिथे बसलेल्या मुलीला विचारले. 'कृपया तू मला मदत करशील काय?' तिची भुवई उंचावली. 'माझा एक मित्र कालच येथे आला आहे. त्याचं नाव सुमीत. तुझ्या कॉम्प्युटरमध्ये पाहून तो कुठे उतरला ते  सांगू शकतेस का?'

'आश्रमाचा परिसर साडेतिनशे एकरमध्ये पसरला आहे. भक्तांची रहाण्याची सोय़ भक्तनिवासात केलेली आहे. रुम बुकींगसाठी समोरच्या काऊंटरला जावं लागेल. भक्त निवासापर्यंत जाण्यासाठी बाहेर मोफतवाहन उपलब्ध आहे. आपला मुक्काम आध्यात्मिक उन्नतीचा ठरो. धन्यवाद. '

बोलणे बंद झाल्यावर ती सरळ नजर लाऊन बसली.

'कमाल आहे. एक साधी माहीती कुणी देऊ शकत नाही. तुम्हाला माहीती नसेल तर कोण सांगू   शकेल ते सांगा. ' माझा आवाज वाढला. हॉलमधले सगळे माझ्याकडे पहात होते. बाहेर उभा असलेला सिक्युरीटीचा माणूस धावत आला. चौकशी काऊंटरची मुलगी भेदरून उभी राहीली.

'शांतता राखा. ' ती म्हणाली. एव्हढयात सिक्युरिटीचा माणूस जवळ येऊन म्हणाला.

'भगिनी, रुम मिळाली असेल तर आपण जाऊ शकता. ' त्याने माझी बॅग उचलली व काही न बोलता झपाट्याने दरवाजाकडे निघाला. त्याच्यामागे जाण्यावाचून गत्यंतर नव्हतं.


©ई साहित्य प्रतिष्ठान

मला एका गाडीत बसवून देऊन तो गार्ड पुन्हा ड्युटीवर परतला. गाडी सुरू झाली. माझ्या मनात एकच प्रश्न होता, या सुमीतला शोधावं तरी कुठं ?

रुममध्ये वर्णन करून सांगावं असं काही नव्हतं. दोन दार होती. एक बाहेरून यायला, दुसरं बाल्कनीत उघडत होतं. बाल्कनीकडील भिंतीला मोठी खिडकी. एक सिंगल बेड. सोई नसलेली अटॅच्ड  बाथरूम. एक अलमारी. भिंतीवर महाराजांची प्रतिमा रंगवलेली होती. पलंगावर गादी, उशी, पांघरायला चादर. बस्स. इतकी साधी, ओकीबोकी खोली मी कधी पाहिली नव्हती. येथे आल्याबद्दल मला पश्चाताप वाटला. मुर्ख सुमीत येथे कशासाठी आला असेल?

माझे  आटोपून, रुमला कुलुप लाऊन, मी बाहेर पडले तेव्हा सकाळचे नऊ वाजले होते.

'आधी चहा हवा. मी स्वतःशी म्हणाले. 'त्या शिवाय मी विचारही करु शकणार नाही. '

डावीकडून बॅटरीवर चालणारं एक वाहन येत होतं. त्यात रिकामी जागा नव्हती. पण मला पाहून चालकाने वाहन माझ्या जवळ उभं करून म्हणाला, 'जय जटाशंकर?' आतल्या लोकांनी सरकून मला जेमतेम टेकायला जागा करून दिली.

एव्हढयाश्या जागेत खुपसून बसल्यावर मी म्हणाले, ' भोजनालय. '

मी  सहप्रवाश्यांवरुन नजर फिरवली. चार परदेशी माणसं होती. दोन स्त्रिया दोन पुरूष. त्यांनी भारतीय पेहराव केलेला होता. पुरूषांनी सुध्दा कपाळाला कुंकवाचे टिळे लावले होते. गळयात रूद्राक्षांची माळ व जटाशंकरच्या फोटोचे पेंडल. यांना यांच्या देशात, यांच्या धर्मात शांती मिळाली नाही म्हणून हे इथं आले असतील? माझ्या मनांत विचार आला.

भोजनालय म्हणजे एक मोठा हॉल होता. एका बाजूला सेल्फ सर्विस लिहीलेलं काऊंटर होतं. गुलाबी रंगाच्या पोशाखात कार्यकर्ते मुक्याने येणाऱ्याला हवं ते देत होते. लोक गटागटाने टेबलावर बसुन शांतपणे खात पीत होते. आपली प्लेट घेऊन मी रिकामी जागा शोधण्यासाठी हॉलभर नजर फिरवली.

प्रभातला तिथे बघुन माझे डोळे आश्चर्याने मोठे झाले. अरे! हा इथं कसा? चेहराभर हसू घेऊन मी त्याच्या दिशेने वळाले. त्याच वेळी त्याची नजर माझ्यावर गेली. माझ्या दोन्ही हातात प्लेटस् असल्याने मला अभिवादन करता येत नसले तरी तो हात उंचावून आपल्याला बोलवेल असं मला वाटलं. पण त्याने ओळखही न दाखवता नजर काढली. टेबलावर ठेवलेला मोबाइल उचलून त्यात नजर गाडून बसला. मला अपमानित झाल्या सारखं वाटलं.

'गेला उडत!'दिशा बदलून मी वेगळ्या टेबलावर जाऊन, मुद्दाम त्याच्याकडे पाठ करून बसले.

प्रभात? हा इथं काय करतो? माझ्या मनांत विचार आला. त्याला पाहून काय प्रतिक्रिया द्यावी तिला क्षणभर कळाले नाही. त्याची शेवटची भेट होऊन दोन वर्ष तरी उलटली असतील. कॉलेजमध्ये घडलेला प्रसंग तो विसरूनही गेला असेल असे वाटत होते. पण त्याच्या प्रतिसादावरुन तो विसरलेला दिसत नव्हतं. दुखावलेल्या मनानं मी रिकाम्या जागी जाऊन बसले. माझी पाठ त्याच्याकडे आहे तेच बरें. त्याची नजरानजर सुध्दा व्हायला नको.

खरं तर तो चांगला स्पोर्टमन होता. त्याने तो प्रसंग खिलाडू वृत्तिने स्वीकारायला हवा होता. पण त्याचा अहंकार दुखावला गेला. पराभव आणि तोही एका मुलीकडून? त्याच्या जिव्हारी घाव लागला.

माझं खाण्याकडे लक्ष नव्हतं. यांत्रिकपणे समोरचे पदार्थ चिवडत होते. मन मात्र कॉलेजच्या आठवणीत गुंतले होते.

मी फर्स्ट इयरला होते तेव्हा प्रभात तीसऱ्या वर्षाला होता. प्रभात. कॉलेजचा बॉक्सर चॅम्पियन. प्रत्येक वर्षी कॉलेजला आंतरकॉलेज स्पर्धेत पहील्या नंबरची ट्रॉफी मिळवून द्यायचा. याही वर्षी आपला नंबर लागेल याची त्याला पुर्ण खात्री होती. त्याची रोजची प्रॅक्टिस चालू असली तरी सतत दोन वर्षे ट्राफी मिळविल्याने त्याचा आत्मविश्वास जरुरीपेक्षा जास्त वाढला होता. त्याला खतपाणी देण्याचे काम करणाऱ्या फॅन्सची कमी नव्हती. प्रभात कधी हारणार नाही. तो ट्रॉफी खिशात घेऊन फिरतो. अशी त्याची ख्याती होती.

त्याच्या रुबाबदार, यशस्वी व्यक्तिमत्वावर कॉलेज मधल्या कितीतरी मुली मोहीत झाल्या होत्या. अनेकजणी त्याच्याशी ओळख करून घेण्याचे निमित्त शोधत तर आपली त्याच्याशी किती जवळची मैत्री आहे हे दाखवण्याची मुलींत स्पर्धा दिसून येई.

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

मी स्वतः बॉक्सर असल्याने त्याच्याकडे आकर्षीत झाले होते. त्याच्या स्पर्धा मी पाहील्या होत्या. त्याची खेळातली चपळाई, ठोसा मारण्याची पध्दत आणि स्पर्धकाला हुलकावणी देऊन जिंकण्याची अदा मला आवडली होती. खरंतर इतर मुलींप्रमाणे मी सुध्दा त्याची फॅन होते. पण माझ्या सौदर्याची मला वास्तव जाणिव होती. मी दिसायला कुरूप नसले तरी सुंदरही  नाही. रंग सावळा, नाजुकपणा अजिबात नाही. खेळसुध्दा बॉक्सिंगसारखा पुरुषी आवडतो. त्या खेळात प्रगती चांगली. बाकी सगळा आनंद. वडिलांच्या पुण्याईनेच नवरा मिळाला तर, बाकी माझ्याकडून सगळी बोंब आहे, असं मला स्वतःबद्दल मैत्रिणीला सांगण्यात कसलीही खंत वाटत नसे. माझ्या प्रेमात कुणी पडेल असं मला स्वप्नातही वाटत नव्हतं. म्हणूनच मी इतर मुलींपेक्षा आनंदी आहे. माझ्याकडे भरपूर वेळ असतो. ब्रेकअप वगैरे सारख्या भानगडीत वेळ वाया जात नाही.

आम्ही आमने सामने आलो ते त्यावर्षीच्या बॉक्सिंगला आंतरकॉलेजला कुणाला पाठवावे हा वाद उद्भवला तेव्हा. मी बॉक्सिंगमध्ये नाव दिलं तेव्हा शिक्षक हसले. पण उघड काही न बोलता त्यांनी माझं नाव लिहून घेतले. मी पहील्या काही फेरीतच बाद होईल अशी त्यांची कल्पना होती.

प्रभात आपल्या स्पर्धकांना हरवून अंतिमपुर्व फेरीत गेला. तशी मीही अंतिमपुर्व फेरीत पोहचले. शिक्षकांनी मात्र अंतिम फेरी न घेता त्याची आंतरकॉलेजसाठी निवड केली. त्याचे नाव नोटीस बोर्डावर लागले तेव्हा मला अपमानस्पद वाटले. मी सरळ जाऊन प्रिंसिपलकडे तक्रार केली.

त्यांनी माझी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. प्रभातने आतापर्यंत सातत्याने ट्रॉफी मिळवली. ती फिरती ट्रॉफी आहे. सतत तीन वर्ष ज्यांनी जिंकली त्याच्याकडे ती कायमची राहणार आहे. दोन वर्ष तो जिंकला याही वर्षी त्याला संधी द्यायची कॉलेजने ठरविले आहे. तेव्हा तुम्ही त्याला हरकत घेऊ नये.

मी जिद्दीला पेटले. तसं होतं तर मग स्पर्धा का ठेवल्या? त्याची निवड जाहीर करुन टाकायची होती आधीच. आम्हाला का आशेला लावून ठेवले?

प्रिन्सीपलने संबंधीत प्राध्यापकांना बोलावलं. त्यांनीही माझी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. प्रभातचे हे अंतिमवर्ष आहे, पुढच्या वर्षी तुलाच संधी देऊ असं वचनही दिलं. पण मला ते मान्य नव्हतं.

शेवटी त्यांनी प्रभातला बोलावलं. माझं म्हणणं ऐकून प्रभात हसला. तुला सरांनी स्पर्धेत भाग घेऊ दिला हा त्यांचा मोठेपणा आहे. मुलगी आहेस म्हणून कौतुकाचा भाग होता. ही बॉक्सिंग आहे मॅडम. हातात कडं घातलं म्हणजे बॉक्सर होत नसतं.

घाव जिव्हारी लागला.

‘तसं असेल तर मग मला हरवून पुढे जा नं. ’ मी त्याच्याकडे आव्हानात्मक नजरेनं पाहत म्हणाले. ‘तू का घाबरतोस?’

‘मी घाबरत नाही चिंटी, ’ तो माझा उपहास करीत म्हणाला, ‘माझ्या ठोश्यानं तुझा चेहरा अधिकच विद्रुप होईल अशी मला भीती आहे. ’

धगधगत्या आगीत तेल पडले. आता गोष्ट जिद्दीवर आली. कुणीच माघार घ्यायला तयार नव्हतं. मी जिंकले तरी त्याला स्पर्धेला पाठवा, पण आमचा सामना झाला पाहीजे. मी अडून बसले.

शेवटी आमची बॉक्सिंग ठरली.

ही बातमी कॉलेजमध्ये पसरली तेव्हा अनेकांनी माझी टर उडवली. मुलींमध्ये मात्र मी नायिका ठरले. विशेषतः प्रभातने ज्यांची मन दुखवली होती त्या मुलींचा मला सपोर्ट होता. तू हरलीस तरी हरकत नाही पण पुरुषी अहंकाराला आव्हान दिले याचाच आम्हाला अभिमान आहे. ’

‘ते मला माहीत नाही. ’ मी  म्हणे, ‘मला फक्त खेळ समजतो. बाकी गोष्टींशी मला कर्तव्य नाही. ’

या स्पर्धेची उत्सुकता वाढत गेली. प्रभातवर त्याचे दडपण आले असण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. भानू हरली तरी काय गमावणार होती? त्याच्यामागे त्याचा लौकिक होता.  ही स्पर्धा आपण जिंकलीच पाहीजे अशी जिद्द त्याला लागली.

मेहनत, अथक तयारी, प्रोफेनल अँप्रोच हे सगळं असलं तरी दुखावलेल्या अहंकाराची शक्ति भारी पडते. एका निर्णायक क्षणी त्याच्या चुकीचा फायदा घेऊन मी कॅल्कुलेटेड ठोसा त्याच्या तोंडावर मारला आणि आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

त्या दिवशी मी कॉलेजची नायिका झाले.

दुसऱ्या दिवशी मी प्रिंसिपलला जाऊन सांगितले.

'अंतिमफेरीसाठी प्रभातला पाठवले तरी माझी काही हरकत असणार नाही. हा खेळ आहे. मला गृहीत धरून निर्णय घेतल्याने मला राग आला होता. माझ्या मनांत प्रभातबद्दल कसलाही आकस नाही. '

तर प्रभात मोठया खिलाडूपणे म्हणाला,

'झाले ते छान झाले. या पुढे मी स्वताः विषयी फाजिल आत्मविश्वास बाळगणार नाही. अंतिमफेरीत जाण्याचा तिचा हक्क आहे. मी त्यावर अतिक्रमण करणार नाही. तिने कॉलेजला ट्रॉफी मिळवून द्यावी ही शुभेच्छा. '

हा त्याला दिलदारपणा होता की मला दिलेले आव्हान होते याचा निर्णय मी करु शकले नाही. पण त्याच्या शब्दाचा मान राखल्याप्रमाणे मी कॉलेजला ट्रॉफी मिळवून दिली. माझ्याभोवती पडलेल्या गर्दीच्या गराडयातून वाट काढून माझ्याशी हात मिळवून त्याने माझे अभिनंदन केले. तेव्हढेच. '

त्यानंतर पुन्हा तो कॉलेजमध्ये दिसला नाही.

टॅंन टूॅंग...

व्हाटस् अपवर मॅसेज आला होता. मॅसेज अनोळखी मोबाईल वरुन आला होता. मी दुर्लक्ष केले. पुन्हा एकदा आवाज आला तेव्हा मी मॅसेज उघडून पाहीलाः

'Meza kade valun bhagu nako. Aapan whats up vr bolu. '

'Ok Prabhat tu Ithe kasa?'



©ई साहित्य प्रतिष्ठान

‘ Te mi tula nantar sangen. Tu kashi?’

‘Majhya maitrinicha mitra yethe aahe tyala shodhayala aale. ’

‘?’

‘Sumit. ’

‘Mala mahit nahi. Kadhi aala?’

‘Kal kiva parva. ’

‘Kuthe aasto?’

‘Ahmedabad’

‘ yethe kuthe?’

‘Mahit nahi. Tech Shodhatey. Tu madat karshil?’

‘Tychi choukashi kuna kade karu nako. Tu kashala Aalis. ’

‘?’

‘Te ja u de. Utrlis kuthe?’

‘Hemant quarter IInd floor Room 13’

‘Khane Zale ki Aashramatun nighun ja. ’

‘!’

‘Mi yethech aahe. Bhet zalavr sangen tyla. Tycha Mobile?’

‘Tyne aanla nahi. Aashramat chalat nahi mhane. ’

‘To follower honar asel tr chalet nahi. ’

‘Tuzy kade kasa’

‘mi follower nahi. Velghalau nko. Choukashi karu nako Nighun ja. ’

‘Parisar pahun udhya jail. Tu kasa bhetnar?’

‘Mi bhetnar nahi. Kalji ghe. Thambu nko. Bye’

माझे उत्तर जाण्याआधी त्याचा मोबाईल स्वीचऑफ झाला.

मला नवल वाटले. मी वळून पाहीले नाही. माझे तोंड दरवाजाकडे असल्याने प्रभातला मी जाताना पाठमोरा पाहीला.

प्रभात विनाकारण सनसनाटी निर्माण करणाऱ्यातला नव्हता. हे काहीतरी वेगळंच प्रकरण दिसत होतं. स्वागतकक्षात मी सुमीतची चौकशी केली तेव्हा कुणी प्रतिसाद दिला नव्हता. काहीतरी अघटीत घडत होतं. सूर्य ढगात अडकल्यामुळे वातावरणावर पडलेली काळसर सावली मनात नैराश्य आणत होती. कुठल्या तरी अनोळखी बेटावर आल्यासारखे वाटले. मनात आलेली निराशा दूर सारून मी समोरचे थंड पदार्थ चिवडायला सुरवात केली.

प्रभातने सांगितल्याप्रमाणे परत जावे काय? तो काही विनाकारण घाबरविणाऱ्या पैकी नव्हता. त्याच्या सांगण्यात काहीतरी तथ्य असणारच. पण नयनाला काय उत्तर देणार? ट्रिपचा पूर्ण खर्च तिने उचलला होता. काय करावं?

विचार करुन शेवटी ठरवलं, दिवसभर परिसर फिरताना योगायोगाने सुमीतची भेट झाली तर फार चांगले. (आपले नशिब इतके थोर कधीच नव्हते हे मला अनुभवाने माहीत होते.) नाहीतर निघून जाऊ.

इथं आल्या पासुन मी नयनाला फोन केला नव्हता. फोन करुन तिला नकार सांगणे योग्य वाटलं नाही. ती स्वतः होऊन फोन करण्याची शक्यता नव्हती. कारण आता ती माझी एम्लॉयर होती. मी तिला फोन करुन रिपोर्ट करावा अशी तिची अपेक्षा असणार. नयना हा शिष्टपणा कटाक्षाने पाळणाऱ्यांपैकी होती.

दिवसभर मी एका ग्रुपसोबत परिसर पहात फिरत होते. आमच्या सोबत आश्रमातला एक कार्यकर्ता होता. तो माहिती देत होता. त्यानी सांगितलेली माहीती ऐकायची

फक्त. त्याला कुणी प्रश्न विचारला तर तो मनात असेल तर उत्तर द्यायचा. नाहीतर न ऐकल्या सारखे करून शेजारच्या व्यक्तिशी वेगळया गोष्टींवर बोलयचा. माझे लक्ष परिसरापेक्षा आजूबाजूच्या लोकांकडे होते. दिवसभरच्या पायपिटी नंतरही सुमीत कुठे ओझरताही  दिसला नाही.

दिवसभराच्या चालण्याने मी  इतकी थकुन गेले की, कधी एकदा झोपते असं झालं होतं.  परिसर फार मोठा होता. जिथे वाहन जायला वाट नव्हती तेथे पायपिट करावी लागली होती. बराचसा भाग उंच सखल होता. कुठे दाट झाडी होती. आश्रमाची डेव्हलपमेंट फार चांगली केली होती. जुनी पर्णकुटी मात्र मुद्दाम तशीच ठेवली होती.

पर्णकुटी!

आता मला गुंगी लागत होती. पर्णकुटी, जटाशंकरची पुर्वीची जागा. तिथे राहून त्यांनी तप केले. तिथंच त्यांना ब्रम्ह साक्षात्कार झाला. ती पर्णकुटी तशीच ठेवण्यात आली. त्याच्या भोवती भरगच्च जंगल उभे राहिले होते. तिथे वीज पण पोहचविण्यात आली नव्हती. महाराज ती पर्णकुटी सोडायला तयारच नव्हते. पण भक्तांच्या प्रेमापोटी ते पंचकमळमहालाच्या पांचव्या दलात रहायला आले. देहाने जरी ते तिथे रहात असले तरी सुक्ष्मरुपाने पर्णकुटीत वास करतात. योगध्यानासाठी ते पर्णकुटीतच येतात. महाराज पंचकमळमहालात वास्तव्याला असताना ते अनेकांना इथं वावरताना दिसतात अशी वदंता होती. त्यांच्यासाठी एक समई तेथे कायम तेवत ठेवलेली असते. त्यांच्या समाधीत व्यत्यय येऊ नये म्हणून तेव्हढया परिसरात जाण्यास प्रतिबंध आहे. त्याला तारेचे कुंपण घातलेले आहे. ती पर्णकुटी दूरुनच दाखवली जाते.

पर्णकुटीची माहीती ऐकताना सोबतच्या भक्तांनी हात जोडून पर्णकुटीला नमस्कार केला. पंचकमळमहालाला केला होता तसा.

पंचकमळमहाल.........

पंचकमळमहाला संबंधीच्या कुठल्यातरी अर्धवट विचाराच्या काठावर झोप लागली.


©ई साहित्य प्रतिष्ठान

५

अचानक कसल्यातरी आवाजाने जाग आली.

कुणीतरी जीवाच्याआकांतानं दार ठोठावत होतं. आधी वाटलं, स्वप्नातलाच भाग आहे. पण जाग आल्यावरही ठोठावणं ऐकू येत होतं. कुणीतरी खरंच जीवाच्या आकांताने दार बडवत होते. मी तेथे नवीन होते. अवेळी माझा दरवाजा वाजविण्याचे कारण काय? दिवा लाऊन मी दरवाज्या जवळ गेले.

‘कोण?’ मी सावधपणे प्रश्न केला.

‘मी प्रभात. दार उघड. ’ उतावळ्या सुरात तो म्हणाला. त्याच्या आवाजातली भीती मला जाणवली. मी भीतभीतच दार उघडले. दार पुरते उघडण्या आधीच तो दरवाजा ढकलून आत आला. दरवाजा बोल्टलाऊन बंद केला. दिवा मालवला.

‘प्रभात! काय झाले?’त्याच्या वागण्याने मी गोंधळून गेले.

‘शू SS काही बोलू नकोस. ते माझ्यामागेच आहेत. मला लपवून ठेव. ’

त्याला कुठे लपवणार होते? रुममध्ये जागा तरी कुठे होती?एक बाथरूम, एक अलमारी, पलंगाच्या खाली नाहीतर बाल्कनीत. कुठेही लपला तरी सांपडणार होता. मी काय करू? मी काही बोलणार तोच् पुन्हा दरवाजा जोराने ठोठावला गेला.

‘दार उघडा. ’ कुणीतरी जरबेच्या आवाजात म्हणाले. (दाराला बुटांची लाथही मारली असावी.) त्याला बाल्कनीत ढकलून मी बोल्ट लाऊन घेतला. दिवा न लावता अर्धवट दरवाजा उघडून झोपाळू आवाजात विचारले,

‘काय आहे?’

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

येणारी माणस सभ्य नव्हती. अर्धवट उघडलेला दरवाजा ढकलून ते आत घुसले. त्या धक्क्याने मी मागे धडपडले. ते दोघे होते. आत येताच एकाने दिवा लावला तेंव्हा प्रकाशात मी त्यांना पाहिले. त्यांचे चेहरे अत्यंत क्रुर होते. एकाने मला दंडाने धरून उठवले. त्याची बोटे माझ्या दंडात रुतली. दुसऱ्याने रुमची झडती सुरु केली. त्याची हालचाल चपळ होती. बाथरूम उघडून पाहिले, कॉटखाली नजर टाकली. कपाट उघडून पाहीले गॅलरीचा बोल्ट उघडला. तसा दोन्ही हात वर करून प्रभात आत आला.

'तिला सोडून द्या तिचा याच्याशी काही संबंध नाही. ती आजच आली. ' भीतीवर नियंत्रण ठेवण्यात त्याला कष्ट पडत होते. त्याच्यासारख्या बॉक्सरला घाबरलेलं पाहून मला आश्चर्य वाटलं.

उत्तरादाखल त्याने प्रभातचा हात पिरगाळून पाठीशी धरला 'आवाज न करता चालायचं. ' त्याच्या आवाजात धमकी होती. खिशातून पिस्तूल काढून त्याने प्रभातसमोर नाचवलं. पुन्हा खिशात ठेऊन दिलं.

'हीचं काय करु?' मला धरुन उभं असलेल्या गुंडाने विचारले. तो मठ्ठ, सांगकाम्या दिसत होता.

'सोबत घेऊन चल. याने तिला काय-काय सांगितले, देव जाणे. '

'तिला सोडा. तिला यातले काही माहीत नाही. मी नुकताच येथे आलो. '

उत्तरादाखल त्या गुंडाने त्याला एक जोरदार फटका मारला.

काही बोलायची संधी न देता ते आम्हाला ढकलत बाहेर उभ्या असलेल्या मोटारी जवळ घेऊन आले. ड्रायव्हींग सीटवर एक दणकट माणूस बसला होता. तोही मवालीच दिसत होता. आम्हाला मोटारीत मध्ये खुपसून त्यांनी कार चालवण्यास सांगितले.

बऱ्याच दूर गेल्यावर एका ठिकाणी मोटार थांबली. आम्हाला दंडाला धरून बाहेर ओढण्यात आले. सकाळीच मी त्या जागेला दूरून भेट दिली होती. तो जटाशंकराचा जुना आश्रम होता. दिवे नसल्याने सर्वत्र अंधार होता. आकाशात ढगांमुळे चंद्र, चांदण्याचा प्रकाश नव्हता.

एकाने पुढे होऊन आश्रमाचा दरवाजा वाजवला. त्या वाजवण्यात सांकेतिक खुण असावी कारण चौकशी न करता दरवाजा उघडला गेला. ते आम्हाला आत घेऊन गेले.

आत एका बाजूला जटाशंकराचा हार घातलेला मोठा फोटो लावलेला होता. शेजारी एक पितळेची मोठी समई जळत होती. खाली लालरंगाचा जाजम अंथरलेला होता. सिंहासना सारख्या मोठया खुर्चीवर प्रत्यक्ष जटाशंकर बसलेले होते . दिव्याच्या पिवळया प्रकाशात त्यांचा गौरवर्ण उठून दिसत होता. वाढलेल्या पांढऱ्या दाढी मिशा, डोक्याला कानटोपी, पांढऱ्यारंगाचे धोतर, अंगावर पांढरी शाल. शांत मुद्रेने तो बसला होता, तरी मनातली अस्वस्थता त्यांच्या बोटाच्या हालचाली वरून जाणवत होती.

दोन माणसं त्यांच्या दोन्ही बाजूला निर्विकार चेहऱ्याने उभी होती. समईच्या प्रकाशात त्याचे क्रुर आणि निर्ढावलेले चेहरे भेसूर दिसत होते. त्यांच्या डाव्या बाजूला तीन तरूण व एक तरूणी असहाय्य अवस्थेत उभी होती. भीतीने ते इतके गलितगात्र झाले होते की, ते उभे कसे राहीले याचंच मला आश्चर्य वाटलं.

आम्हाला जटाशंकरसमोर उभं करून ते त्याच्या आज्ञेची वाट पहात उभे राहीले. माझ्याकडे निर्देश करून जटाशंकरने विचारले,

‘ही कोण?’ प्रवचनात बोलावे त्याच शांत, गंभीर आवाजात तो बोलत होता.

‘माहीत नाही. हा हीच्या खोलीत सापडला. ही ह्यांना सामिल आहे की नाही ते माहीत नाही. पण तो तिच्याशी काही बोलला असणार म्हणून तिलाही आणले. तिचं काय करायचं ते तुम्ही ठरवा. ’

माझ्या खोलीत प्रभात कशाला घाबरत होता ते माझ्या आता लक्षांत आले. त्याच्यामुळे मी प्राणसंकटात सापडेल याची त्याला भीती वाटत होती. शेवटी त्याची भीती खरी ठरली.

‘ओऽम नमःशिवाय. ’ त्यांनी आकाशाकडे पाहून आपली असमर्थता व्यक्त केली.

प्रभातकडे वळून ते म्हणाले, ‘दुष्ट, तू माझ्या हातून पापकर्म का करवतोस? कशासाठी माझ्यामागे लागलास? काय डाव आहे तुझा? कुणी पाठवलंय तुला?’

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

प्रभात काहीच बोलला नाही, मात्र बाजूला उभ्या असलेल्या तरूणीचा हुंदका ऐकू आला. तो ऐकुन प्रभात व्याकुळ झाला.

‘जटाशंकर, ’ प्रभातच्या आवाजात भीतीचा लवलेशही नव्हता. महाराजाची भुवई वर गेली. त्यांचा एकेरी उल्लेख कुणी करत नसत. ‘हे सगळं माझं कारस्थान आहे. यात कुणाचा काही संबंध नाही. यांना सोड. मग आपण बोलू. ’

‘सिनेमा जास्त बघता तुम्ही मुलं. यांना पकडून आणलं कारण त्यांना सगळं माहीत आहे. यांना सोडून कसं चालेल? कशासाठी तुम्ही हा उपद्व्याप केला? जीव धोक्यात टाकला?’ एकेकाकडे हात दाखवत ते बोलले.

‘माझ्यामुळे... ’ ती मुलगी रडत बोलू लागली, ‘मीच कारणीभूत आहे या सगळयाला. ’

पहील्यांदाच पहावे तसे जटाशंकर तिच्याकडे पाहू लागले.

‘तुझ्यामुळे? तुझी माझी काय दुष्मनी आहे, पोरी?’

त्याच्या प्रश्न ऐकून तिचा राग अनावर झाला. ती ओरडत त्याच्या अंगावर धावली,

‘तू... तू... मला भ्रष्ट केलीस हलकटा. तुझ्या कैदेत मी सहा महीने घालवले, कुत्र्या..’ ती त्याच्या तोंडावर थुंकली.

जटाशंकरने तिच्या तोंडात भडकावली तशी ती घडपडत मागे जाऊन पडली. तिच्या तोंडातून रक्त ओघळू लागले.

‘अच्छा! तर ही खरच फिल्मी कहाणी आहे. नायिकेवर अत्याचार... नायक खलनायकाच्या अड्डयावर जाऊन त्याचा सुड उगवतो... . . ’ तो मोठा विनोद केल्याप्रमाणे कितीवेळ हसत होता.

'नादान बच्चे!' त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या गार्डच्या कमरेचे पिस्तुल काढून त्यांनी प्रभातवर रोखले. त्याचा चेहरा क्रुर झाला. 'माझ्या शेपटीवर पाय देणाऱ्याला मी सोडत नाही. '

त्याने प्रभातवर गोळी झाडली. ती मुलगी किंचाळली. ते तीन तरूण पायातले त्राण गेल्याप्रमाणे मटकन् खाली बसले. प्रभात जमिनीवर कोसळून तडफडू लागला. मी धावत जाऊन त्याचे डोके उचलून घेतले. जटाशंकरने आमच्याकडे लक्ष दिले नाही. आम्हाला पकडून आणणाऱ्या गुंडाना उद्देशून तो म्हणाला,

'यांच्या पैकी कुणी जिवंत सुटता कामा नये. चला. ' गार्डला आज्ञा देऊन तो वळाला.

सगळया प्रकाराने मी सुन्न झाले. पण माझी विचारशक्ती कायम होती. हीच वेळ आहे, एकदा जटाशंकर निघून गेला तर हे बिनडोक हुकुमाचे ताबेदार माझं काही ऐकणार नाही. प्रभातचे डोके हलकेच जमिनीवर ठेऊन मी उठले आणि जटाशंकरच्या पुढयात उभी राहीले.

'महाराज,' खोट्या नम्रतेने मी त्याच्या पायाशी झुकले, 'प्रभात जीव वाचविण्यासाठी माझ्या रुममध्ये लपायला आला. यात माझी काय चूक? मी आजच सकाळी येथे आले. वाटल्यास तुम्ही चौकशी करुन बघा. या लोकांशीही माझा  काही संबंध नाही. प्रभात शिवाय मी कुणाला ओळखत सुध्दा नाही. '

त्याने मला दंडाला धरून उठवले. माझ्या केसांवरून हात फिरवत प्रेमळ शब्दात तो म्हणाला,

'बेटा, विधीके लिखीत को कौन टाल सकता हैं? जिसने ब्रह्मको देखा वह ब्रह्ममय हो जाता है. ब्रह्मके बारेमे किसीको बता नही सकता. आप इनके साथ नहीं हैं, लेकीन आप इस खूनकी साक्षी तो अवश्य हो. तुम्हारे मोक्षके लिए मैं ईश्वरसे प्रार्थना अवश्य करूँगा. '

गार्डला घेऊन तो झपाट्याने निघुन गेला. मी उघडया दारातून बाहेरच्या अंधाराकडे निराशेने पहात राहीले.


©ई साहित्य प्रतिष्ठान

मी जीवनाची आशा सोडून दिली. गळफटलेले  तीन तरूण आणि रडणारी एक तरूणी यांच्या जीवावर त्या शस्त्रधारी बदमाशाशी मी कशी झुंज देऊ शकणार? त्यांच्यावर अचानक  झेप घेऊन पिस्तुल हस्तगत करण्याचा वेडा फिल्मी विचार मी दूर सारला. सुटकेच्या आशेने हॉलभर नजर फिरवली. माझे डोळे चकाकले. धोकादायक असला तरी एक मार्ग मला दिसला. जीव वाचविण्यासाठी तो धोका मला पत्करावाच लागणार होता. मी तिरप्या नजरेनं अंदाज घेतला. आत्मविश्वासाने विकृत हसत ते दोघे गुंड बेसावध उभे होते. हाच क्षण होता त्यांना हूलकावणी देण्याचा.

एका झेपेत मी जळणारी समई उचलली आणि जळत्या वातीसह गालिच्यावर उपडी केली. माझं नशिब चांगलं, दिवा विझला नाही. तेलपसरून गालिच्याने पेट घेतला. मी असे काही करील याची त्यांना कल्पना नव्हती. हतबुध्द होऊन ते आगीकडे पाहू लागले. काय करावे त्यांना सुचेना. तो क्षण माझा होता. ते भानावर येण्यापुर्वी  हातातली पितळेची जड समई एका गुंडाच्या डोक्यात मारली. तो वेदनेने कळवळला. त्याच्या डोक्यातून रक्ताची धार  वाहू लागली.

‘पकडा त्याला. . !’

दुसऱ्या गुंडावर झेप घेत मी ओरडले. तसे ते तीन तरूण माझ्या मदतीला धावले. गडबडीत पिस्तुलातून गोळी उडाली. आम्ही त्यांना भारी पडलो. त्याच्या हातातले पिस्तुल आता माझ्या हातात आले होते.

‘पळा’ मी ओरडले. ’

चौघे दरवाज्याकडे पळाले. मी गुंडाना रोखून धरत मी त्यांना सुचना दिली, ‘दरवाजा बंद करा’

नुकतेच बाहेर गेलेले गुंड पिस्तुलाच्या आवाजाने परतण्याची शक्यता होती. पण जीव वाचवून पळण्याच्या गडबडीत माझे कुणी ऐकले नाही. दोघेजण उघडया दारातून बाहेर अंधारात गेले.


©ई साहित्य प्रतिष्ठान

ते बाहेर जाताच गोळीबाराचा आवाज आला. कुणीतरी वेदनेनं कळवळून विव्हळले. बहुदा त्याला गोळी लागली असावी. त्यांच्यामागून पळणाऱ्या दोघांची पावलं थबकली. ते असहाय़्य होऊन माझ्या कडे पाहू लागले.

मी गालिच्याला लागलेली आग विझवली. आतले दोघे गुंडवेदनेने तडफडत होते. मी त्यांना  गालिच्यात गुंढाळले. आता हॉलमध्ये अंधार झाला होता. मी घावत त्या दोघांकडे गेले.

दरवाज्याच्या दोन्ही बाजूला आम्ही श्वास रोखुन उभे राहीलो. त्या मुलीचा हात मी गच्च धरून ठेवला होता. तिच्या हृदयाची धडधड मला स्पष्ट ऐकू येत होती. (की ती माझ्या हृदयाची होती, देव जाणे. ) बाहेर उभे असलेले गुंड आमची बाहेर पडण्याची वाट पहात होते. आमच्यावरचा ताण असह्य होत होता. पलिकडे उभा राहीलेला पोरगा संयम सुटून बाहेर जाऊ नये एव्हढीच मी प्रार्थना करीत होते.

बाहेर, पावलांचा आवाज दरवाजा जवळ येऊन थांबला.

'तुम्ही आत आहात. आम्हाला कल्पना आहे. मुकाटयाने बाहेर या. तुम्ही जिवंत सुटणार नाही.'

त्याने धमकी दिली. पण तिच्यात जोर नव्हता. सरळ आत येण्याची त्यांची हिम्मत नाही याची मला खात्री वाटत होती. आम्ही काही न बोलता गप्प उभे होतो. आत अंधार असल्याने त्यांना काही दिसत नसावे उलट आमचे डोळे अंधाराला सरावले होते.

हातात पिस्तुल घेऊन बोलत एकजण सावधपणे आत आला. दुसरा मागोमाग त्याला कव्हर करीत आत आला. त्यांनी आत असलेल्यां साथीदारांच्या नावाने आवाज दिला. उत्तरादाखल त्यांचे विव्हळणे कानावर आले. हळूहळू पाऊलें टाकत ते बरेंच पुढे गेले. सोबतच्या मुलीचा हात दाबून मी तिला सावध केले.  एक  दीर्घ श्वास घेतला आणि पळ! म्हणत उघड्या दारातून बाहेर पडलो.

पलिकडे दबा धरुन उभा असलेला मुलगा इशाऱ्याचीच वाट बघत होता. माझा आवाज ऐकताच तो दरवाजातून बाहेर पळू लागला. तिघे एकाच वेळी आल्याने आम्ही दरवाजातच अडकलो. मी तिरपी होऊन त्यांचा बाहेर पडू दिले. बाहेर येताच घाईने वळून दाराला बाहेरून कडी घातली.

'माझ्या मागे या. ' मी जटाशंकरच्या मोटारीकडे धावत म्हणाले. त्या दोघांना आता बळ आले होते. ते माझ्या सांगण्याप्रमाणे वागत होतेच पण त्यांची लढा देण्याची तयारीही होती.

कारचा  मागचा दरवाजा धरून जटाशंकर उभा आश्रमाकडे पहात उभा होता. अंधारात काय चालले ते त्याला कळत नव्हते. काळोखातून धावत येणाऱ्या तीन आकृतीआपली माणसं नाही हे लक्षात येताच तो गडबडीने मोटारीत शिरण्याचा प्रयत्न करु लागला. त्याआधी झेप घेऊन मी त्याची बकोट पकडली. त्याला मोटारीत कोंबला. पलिकडून ती मुलगी येऊन बसली. तो मुलगातर ड्रायव्हरच्या बाजूला केव्हाच जाऊन बसला होता.

'म्हाताऱ्या, ड्रायव्हरला गाडी सुरू करायला सांग, नाहीतर तुला इथंच गोळी घालते. ' दांत आवळून मी इतक्या खुनशी आवाजात बोलले की, मी बोलल्याप्रमाणे करील याची त्याला भीती वाटली.

परिस्थिती लक्षात घेऊन ड्रायव्हरने जटाशंकर काही बोलण्या आधी मोटार सुरू केली.

'आम्हाला आश्रमाच्या बाहेर नेऊन सोड. रेल्वेस्टेशनला किंवा बसस्टॅण्डला. गडबड केलीस तर आधी या म्हाताऱ्याला गोळी मारील. आमचे काय व्हायचे ते नंतर'मी ड्रायव्हरला उद्देशून बोलले. परिस्थिती नियंत्रणात असल्याने माझा आत्मविश्वास वाढला.

'आपलं सामान?' त्या पोराने प्रश्न केला.

'चंपट आहेस का तू?' मी रागावले. त्याही परिस्थितीत ड्रायव्हर फिस्कन हसला.

'चलो' मी ड्रायव्हरला दरडावले.

ड्रायव्हरला जटाशंकरच्या जीवाची काळजी होती. त्याने गाडी सरळ रेल्वेस्टेशनकडे वळवली. जटाशंकरची गाडी अशा अवेळी बाहेर पडताना पाहून गेटवरील सेक्युरीटीला आश्चर्य वाटलं असेल, पण आम्हाला कुणी आडवलं नाही.

रेल्वेस्टेशन जवळ येताच ड्रायव्हरने गाडी थांबवली. आम्ही गडबडीने बाहेर पडलो. माझ्या हातात पिस्तुल तसेच होते.

धप्प! धप्प!! धप्प!!!

दार बंद केल्याचे तीन आवाज आले.  ड्रायव्हरने गाडी रिव्हर्समध्ये घेतली. आम्ही लगबगीने स्टेशनकडे निघालो. गर्दीत गेलो की आम्ही सुरक्षीत झालो. लहानमुलीने आईचा हात धरावा तसा त्या मुलीने पळत येऊन माझा हात हातात घेतला. दोघी पळताना मी तो मुलगा येतो की नाही हे पहाण्यासाठी मागे वळून पाहीले.

‘बाजूला हो... !’मी आकांताने ओरडले.

ड्रायव्हर वेगाने त्याच्या दिशेने गाडी आणत होता. सुटकेच्या आनंदात तो बेसावध होता. माझ्या ओरडण्याने तो गोंधळला. मी काय सांगते ते ऐकण्यासाठी थांबला. तेव्हढा एक क्षण पुरेसा होता. कारच्या धडकेने तो उंच फेकला गेला आणि टणक सडकेवर आदळून त्याचे डोके फुटले. त्या मुलीच्या तोंडातून किंकाळी बाहेर पडली. ती मटकन खाली बसली.

‘उठ... उठ’ मी तिला हाताला धरून घाई करू लागले. ते परत येऊन आमच्यावर हल्ला करतील अशी मला भीती वाटली. पण कार वळण घेऊन केव्हाच निघून गेली. तिच्या किंचाळण्याने आणि अपघात झालेला पाहून आजूबाजूचे लोक जमा झाल्याने ते पसार झाले होते.

कुणीतरी पोलिसांना फोन केला. लगेच पोलिसांची कारही आली. माझ्या हातात पिस्तूल पाहून पोलिसांनी आम्हा दोघींना पकडून नेलं.

पोलिसांना आम्ही घडलेली सारी हकीकत सांगितली. तेव्हा त्यांनी आम्हाला कमिशनरांकडे नेले. कमिशनर साहेबांनी  आम्हाला खुप वेळ प्रश्न विचारले.

‘विनीता, तुझ्यावर लैंगिक अत्याचार झाला?’तिच्याकडे रोखून पहात त्यांनी विचारले.  (तिचे नाव विनीता आहे हे मला तिच्या बोलण्यातून कळाले. )तिने मान हालवली.

‘लेखी तक्रार देतेस?’

तिच्या घुटमळण्याचा मला राग आला.

‘तुझ्याकरीता प्रभात मेला. इतकी पोर गेली. आणि तू जीवाच्या भीतीने तक्रार करत नाहीस?’ ती खाली मान घालून बसली.

‘हे बघ घाबरू नकोस. आश्रमात काहीतरी अवैध चालत हे आम्हाला माहीत आहे. पण कुणी तक्रार करीत नाही म्हणून आम्हाला काही करता येत नाही. तू तक्रार कर, पुरावे आम्ही गोळा करु. भानू, तू खुनाच्या केसमध्ये साक्ष देशील?’

‘हो. ’ मी ठामपणे म्हणाले. ‘आम्ही दोघीच साक्षीदार असल्याने तो नक्कीच आम्हाला संपविण्याचा प्रयत्न करील. पण आम्ही तक्रार केली नाही तर ह्या प्रकरणाला कधीच वाचा फुटणार नाही. जीव गेला तरी बेहत्तर, मी साक्ष देणारच. ’

‘मीही तयार आहे. ’ माझा अभिनिवेश पाहून विनीताला धैर्य आले, ‘माझी तक्रार लिहून घ्या. जटाशंकरने माझ्यावर लैंगिक अत्याचार केला!’

घाव घातल्याप्रमाणे तिचे शब्दांनी उपस्थितांच्या मनावर आघात केला. काय बोलावं कुणाला कळेना. कमिशनरसाहेब आधी बोलले,

‘मिस् विनीता, आज मला अतिशय दुर्दैवी गोष्ट ऐकायला लागते याबद्दल मला खेद होतो. तुमचं दुःख, तुम्ही भोगलेल्या यातना मी समजू शकतो. तुम्ही मला सगळं संगतवार सांगा. तुम्हाला न्याय देण्याचा आम्ही पुरेपुर प्रयत्न करु याची मी तुम्हाला खात्री देतो. ’

त्यांचे अधिकाराचे आणि प्रेमळ शब्द ऐकून विनीताला धीर आला. तिने आपली हकीकत सांगायला सुरवात केली.

‘माझे आईबाबा जटाशंकरचे भक्त होते. ते एकदा मला घेऊन त्यांच्या आश्रमात त्यांच्या दर्शनाला गेले होते. तेथे मी त्यांच्या नजरेत पडले. बाबांनी माझ्या आईबाबांना बोलावून चौकशी केली. त्यांना विशेष वागणूक दिली. आपल्याला मिळालेल्या सन्मानाने आईबाबा भारावून गेले. घरी परतल्यावर याभेटीत जटाशंकरची आपल्यावर विशेष मर्जी झाल्याचे ते अभिमानाने येणाऱ्या जाणाऱ्यांना सांगू लागले.

एकदिवस मी कॉलेजमधून परत येत असताना एक भारी कार माझ्या जवळ येऊन थांबली. गाडीत आश्रमाची माणसं होती. त्यांनी सांगितले की प्रत्यक्ष जटाशंकरांची माझ्यावर कृपा झाली असून आज मला त्यांच्या सेवेची संधी मिळणार आहे. मी कुणीतरी फार भाग्यवान आहे अशा अभिनीवेशात ते बोलत होते.

मी घरच्या लोकांना विचारल्या शिवाय येणार नाही असे सांगितल्यावर ते म्हणाले, महाराजांनी आपल्या दिव्यसामर्थ्याने तुझ्या घरी कळविले . तरीही  मी घरी जाण्याचा  हट्ट धरुन बसले तेव्हा ते तयार झाले व मला गाडीत बसण्याची विनंती केली. मी गाडीत बसल्यावर त्यांनी माझ्या नाकावर रुमाल दाबून धरला. कसला तरी चरमरीत वास माझ्या डोक्यात गेला. जास्त धडपड करण्याआधी माझी शुध्द हरपली.

जेव्हा मला शुध्द आली तेव्हा मी पंचकमळमहालाच्या पाचव्या मजल्यावर कैद झाले होते.  सहा महीने त्याने मला कैद करुन ठेवले होते. त्याकाळात तो मनास येईल तेव्हा माझे शोषण करीत होता. त्याला जेव्हा कंटाळा आला तेव्हा त्याने मला बोलावून घेतले, आणि म्हणाला,

आज तुला माझ्या सेवेतून मुक्त करण्यात येत आहे. तुझ्या सेवेबद्दल तुला काय हवे ते माग. पैसा, सोने, मोठया पदावरील नोकरी तुझे भावी जीवन सुखा समाधानेचे जाईल असे काहीही मागून घे. मात्र तुझ्या आयुष्यातले इथले सहामहीने तू विसरुन जायला हवे. त्यासंबंधी तू कुठे वाच्यता करता कामा नये. अन्यथा मी तुला मोक्ष मिळावा म्हणून प्रार्थना करील.

'मी तुला मोक्ष मिळावा म्हणून प्रार्थना करील' याचा अर्थ तो मला मारून टाकील. असा होता. त्याचे म्हणणे मान्य करुन मी सुटका करुन घेतली. तो इतका मोठा होता, किंवा त्याच्यासमोर आपण खुप लहान आहोत, त्याच्या विरुध्द आपल्या शब्दांवर कोण विश्वास ठेवेल? उलट आपली बदनामी होईल म्हणून आईबाबांनी लाजीरवाणी गोष्ट उरात दडवून ठेवली. जटाशंकरच्या सल्ल्याप्रमाणे आम्ही सगळं विसरण्याचं ठरवलं. त्याने देऊ केलेली कुठलीही गोष्ट आम्ही स्वीकारली नाही.  घरात कुणी जटाशंकरचे नाव सुध्दा उच्चारत नव्हते.

प्रभात पासून मात्र ही गोष्ट मी लपवू शकत नव्हते. त्याच्याशी माझे लग्न ठरले होते. या प्रकारना नंतर कोणत्या तोंडाने मी त्याच्याशी लग्न करणार होते? मी त्याची प्रतारणा करु

शकत नव्हते. त्याला मी घडलेली सगळी हकीकत सांगितली. प्रभात सुडाने पेटून उठला. पण तो संयमी होता. त्याने जटाशंकरला धडा शिकविण्याचा निर्णय घेतला. पोलीसांकडे जाण्याचा प्रश्नच नव्हता. कारण आमच्याकडे जटाशंकरविरुध्द कुठलाही पुरावा नव्हता. जटाशंकर हे एव्हढे मोठे प्रस्थ आहे की पुराव्या शिवाय त्याला हात लावण्याची कुणाची हिम्मत नव्हती.

आम्ही आश्रमात जाऊन पुरावे मिळविण्याचा प्रयत्न करीत होतो. माझे तीन नातलग त्याला साथ द्यायला तयार होते. एक माझा सख्खा भाऊ होता. दुसरे दोघे जवळच्या दूरच्या नात्याने भाऊच होते. आमच्या कारस्थानाचा जटाशंकरला वास लागला. त्याने आम्हाला पकडून जुन्या पर्णकुटीत नेले. प्रभातने हुलकावणी दिली असं आम्हाला वाटलं पण जरावेळाने त्याच्या माणसांनी त्याला जेरबंद करुन आणलं. त्याच्या सोबत ही पण होती.

माझ्याकडे निर्देश करुन ती म्हणाली.

तिच्या डोळयातून घळघळा अश्रू वाहत होते. भूतकाळात भोगलेली पिडा, नुकतेच गमावलेले आप्त स्वकियांच्या वियोगाचं दुःख बाहेर पडत होतं. तिचं कुणीच सांत्वन केलं नाही. तिच्या दुःखाचा निचरा होऊ देण्याशिवाय काय उपाय होता?

तिची अवस्था पाहून मी म्हणाले, ‘पुढची हकीकत मी सांगते. ’

६

।

'पुढचं सगळं जगजाहीर आहे, तुम्हालाही माहीत असेलच. " आपलं बोलणं संपवून तिने थकून खुर्चीवर मान टेकवली. सर्व प्रसंग सांगताना ती पुन्हा ते क्षण अनुभवत होती. एकदा सांगून टाकल्यावर तिला आता हलकं वाटत होतं. तिला जवळ घेऊन विजया मायेने डोक्यावरून हात फिरवू लागली.

'हो. पुढचं सगळ आम्हाला माहीत आहे, 'वीरभद्र  बोलला त्याच्या बोलण्यात राग होता. 'तो बदमाश जटाशंकर पोलीस येण्यापुर्वीच पळून गेला. त्याला महीन्याभराने पोलीसांनी परप्रांतात अटक केली. त्याचा मुलगा त्राहीशंकर, बापाला जामिन मिळाविण्यासाठी  प्रयत्न करतो. पण अजून त्याला यश आले नाही. '

'बरोबर वीरभद्र. त्या प्रकरणाची मी शेवटची साक्षीदार असल्याने मला ठार मारल्यावर त्याची केस कोर्टात उभी राहू शकणार नाही. म्हणून तो माझ्या जीवावर उठला आहे. एक दिवस तो मला ठार मारणार हे निश्चित. ' ती अतिशय निराशेने म्हणाली.

'हे बघ, तू अशी वेडयासारखी बोलू नकोस. ' विजया तिला धीर देत म्हणाली. 'आता प्रत्यक्ष वीरभद्र तुझ्या मदतीला उभा राहील्यावर तुला कुठलाही धोका नाही. '

'किती दिवस मी तुमच्या संरक्षणात राहू शकते? पोलिसतरी किती दिवस मला संरक्षण देणार? आपली न्यायव्यवस्था अशी आहे, हा खटला कितीही वर्ष चालेल. आज जरी त्यांचा वार चुकला तरी प्रत्येक वेळी तो चुकेलच असं नाही. नाही विजयाताई, तो सैतान आज ना उद्या माझा घास घेतल्या शिवाय रहाणार नाही. ती पुन्हा रडू लागली. '

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

'तुझ्या सोबतची ती मुलगी... विनिता. तिचे काय? तिच्यावरही असा हल्ला झाला काय?' वीरभद्रने विचारले.

तिचं नाव निघताच भानूने विजयेला मारलेली मिठी घट्ट झाली. ती आणखी जोराने रडू लागली.

' काय झाले?'विजयाने विचारलं.

दुःखाचा आवेग कमी झाल्यावर भानू म्हणाली,

'परवा विनिताने रेल्वेरुळावर जीव दिल्याची बातमी कळाली. मला माहीत आहे, तिने जीव दिला नाही, तिला जटाशंकरच्या माणसांनीच मारले. नुकतेच आमचे मोबाईलवर बोलणे झाले होते. तिचे प्रेत सापडल्यावर पोलिसांनी, माझा शेवटचा कॉल पाहून, मला फोन केला होता. आता मीच उरले. एकटी. एकदा माझा काटा काढला की संपलं. तो सैतान निर्दोष सुटणार. आता माझीच पाळी. मीच आहे एकमेव : शेवटची साक्षीदार!'

वीरभद्रला या प्रकरणाची पुर्ण कल्पना आली होती. या सर्व प्रकाराचा त्याला मनातून राग आला होता. भानूला मदत करण्याचा त्याने मनोमन निश्चय केला.

'मी आता काय करू? त्याला शरण जाऊन त्याच्या गटात सामिल झाले किंवा त्याचा मृत्यु झाला तर माझा जीव वाचेल. जीव गेला तरी मी त्याच्या गटात मी कदापि सामिल होणार नाही. तो म्हातारा सत्तरीचा तरी असेल. त्याचे आयुष्य असेल तेव्हढा तो जगेलच ना. देव अशा माणसाला आयुष्यही मोठे देतो. तो जर माझ्यासमोर आला ना तर मी... ... '

तिच बोलणं थांबलं. अचानक तिच्या मनात नवा विचार आला, तसा तिच्या चेहऱ्यात बदल झाला. गलितगात्र झालेले शरीर ताठरले. चेहऱ्यावर चमक आली.

'मरायचंच असेल तर असं कुत्र्या सारखं मेल्यापेक्षा मी वाघीणीसारखं मरेल. ठरलं. वीरभद्र तुम्ही अजिबात या प्रकरणात पडू नका. माझ्या एकटीचे काय व्हायचं ते होऊ देत. मी त्याला ठार मारण्याचा विडाच उचलते. '

वीरभद्रने पुढे होऊन तिच्या पाठीवर थाप मारली.

‘शाब्बास! याला म्हणातात मराठी मुलगी. तू निश्चय केलास तर काय होणार नाही? अन्याया विरुध्द लढलेच पाहीजे. पण तुझा त्याला जीवे मारण्याचा बेत मला पसंत नाही.

‘मलातरी दुसरा कुठला मार्ग दिसत नाही. ’भानू बोलली.

‘पण मला दिसतो आहे. आपण अजुन भक्कम  पुरावे मिळवू. अनेक साक्षीदार जमा करू म्हणजे तुझी हत्या करावी एव्हढे तुझ्या साक्षीला एव्हढे महत्व उरणार नाही. तू जरा मला विचार करू दे. आता तू सारे माझ्यावर सोपवून आराम कर’

‘वीरभद्र, माझ्यामुळे तुम्ही संकटात पडावं हे मला मुळीच पटत नाही. तो माणूस अतिशय घातकी आणि शक्तीशाली आहे. त्याला भक्तांच, पैशाचं पाठबळ आहे. ’

‘तू अजून माझ्या नवऱ्याला ओळखले नाही. ’ तिच्या खांद्यावर हात ठेऊन विजया म्हणाली, ‘आजवर त्यांनी अनेक अशक्य गोष्टी शक्य करून दाखविल्या. तेंव्हा ते सांगतात तसं तू वाग. ते निश्चित तुला या संकटातून बाहेर काढतील. पण वीरभद्र, या सगळ्या प्रकरणात तुम्ही एकटयाने मजा करता कामा नये. मला आणि भैरवलाही यात भाग घेऊ द्यायला हवा. ’ ती वीरभद्रकडे पाहून म्हणाली.

‘यात शंका ती कोणती. कुठलेही काम मी तुमच्या सहकार्या शिवाय करतो काय? या प्रकरणात तर मला तुमच्या दोघांसह भानूचीही मदत लागेल. करशील ना भानू?’

‘हा काय प्रश्न झाला? ही तर माझीच लढाई आहे’.

‘ठरलं तर मग. मिशन जटाशंकर स्टार्ट! प्रथम मला सांग, या प्रकरणाशी भार्गव भद्रेचा काय संबंध?’ त्याने भानूला विचारले.

‘भार्गव भद्रेला मी ओळखत नाही. या पुर्वी आमची कधी भेट झाली नाही. त्याने माझ्या मिसिंगची तक्रार द्यावी याचं मलाही आश्चर्य वाटतं. ’

वीरभद्र म्हणाला. 'ठीक आहे, गुंता सोडवायचा असेल तर दोऱ्याचं एक टोक पक्कं हातात धरुन ठेवलं पाहीजे. मी व विजया भार्गव भद्रेची चौकशी करण्यासाठी बाहेर जातो आहे. भैरव, तू एव्हढा वाईट चेहरा करू नकोस. आज आम्ही फक्त माहीती काढण्यासाठी जातो. जेव्हा मारामारीची वेळ येईल तेव्हा तुला सोबत घेऊन जाऊ. तू घरी राहून भानूची देखभाल कर. तिला कुणी इजा करण्याचा प्रयत्न केला तर तू त्याचा चांगला समाचार घेऊ शकतोस. '

हे ऐकून भैरव खुश झाला.

'चल विजू, आपण बाहेर जातो आहोत. मी तुला विनोदरावाच्या ऑफिसला सोडून पुढे जातो. तू त्यांच्याकडून भार्गव भद्रेबद्दल मिळेल तेव्हढी माहीती घे. मी माझ्या मित्रांना त्याच्याबद्दल काय माहीती आहे ते विचारुन, तुला पुन्हा घ्यायला येतो. '

'तू तुझ्या खास मित्रांना भेटणार असशील तर तू भैरवला सोबत ठेवावं हे बरे. ' विजयाने सुचविले. वीरभद्रचे खास मित्र म्हणजे मुंबईतले निर्ढावलेले बदमाश हे तिला अनुभवाने माहीत होते.

'विजया, वेडे, तू कधी पासून माझ्या संरक्षणाची काळजी करू लागलीस? माझ्यापेक्षा भानूची सुरक्षा महत्वाची आहे. तेव्हा भैरवला घरी राहू दे. भानू, तू कुठलीही चिंता न करता आरामात रहा. टि व्ही पहा. आत संगणक आहे. पण आधी तू घरी फोन करुन सुखरुप असल्याचे कळव. घरची मंडळी काळजी करीत असतील'

'ते मी पहाते. तुम्ही काळजी करू नका. लवकर परत या. '

ती दोघं निघुन गेल्यावर भानूभैरवला म्हणाली, 'मला संगणक कुठे आहे ते सांग. मग तू तुझ्या कामाला लागलास तरी माझी हरकत नाही. '

तिला संगणक रुममध्ये सोडून भैरव निघुन गेला. भैरव जाताच तिने संगणक सुरू केले. गुगल शोधमध्ये जाऊन तिने भार्गव भद्रे टाईप केले. लगेच भार्गव भद्रेचे पान उघडलेः

त्याच्यावर भार्गव भद्रेचा फोटो असलेलं पान उघडलं. हसरा फोटो पाहून तो असा बदमाश असेल असं वाटत नव्हतं. भानूने त्याचा फोटो अनेकदा वर्तमानपत्रातून पाहिला होता.

तो नामांकित राजकीय पुढारी होता. आयुष्यात कधी त्याच्याशी भेट झाल्याचे भानूला आठवत नव्हते. त्याने आपल्याला पकडण्यासाठी धांवपळ का करावी हे एक कोडेच होते. तिने विकीपीडीयावरील त्याची माहीती वाचायला सुरवात केली:

"भार्गव भद्रे : जन्म: 1953: उत्तरप्रदेशच्या जौनपुर. मॅट्रीक नापास झाल्याने मुंबईत काम शोधायला आले. सुरवातीच्या काळात ते खारला एका चाळीत रहात असत. उमेदवारीच्या काळात त्यांनी अनेक ठिकाणी नोकऱ्या केल्या पण कुठेही जास्त काळ टिकले नाही. त्यांनी हातगाडीवर भाजी विकण्याचा धंदा सुरू केला.

भाजी विकताना, परप्रांतिय भाजीवाल्यांच्या प्रश्नाची जाणिव होऊन त्यांनी त्यांचे संघटन केले. आपल्याला जनतेच्या प्रश्नाला वाचा फोडता यावी यासाठी त्यांनी लोकाच्या आग्रहाखातर कार्पोरेशनची निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला व सत्ताधारी पक्षात प्रवेश केला.

त्याच्यावर आर. टी. आयच्या कार्यकर्त्यांनी बेहिशोबी मालमत्ता जमा केल्याचा आरोप केला असुन एस. आय. टीने छापे मारून त्यांच्या कार्यालय सील केले. त्यांचा जामिन मंजूर झाला असून त्यांच्यावरील खटला चालू आहे. "

बराच वेळ ती नेट वरील उपलब्ध बातम्या व माहीती मिळवत होती. तरी तिला त्याने आपल्या अपहरणाची तक्रार पोलीसात का द्यावी याचे उत्तर मिळाले नाही.

II

विजया विनोदरावाच्या कार्यालयात पोहचली तेव्हा दुपारचे चार वाजले होते. तिला दारात पहाताच त्यांनी हसून तिचे स्वागत केले,

‘कोण विजयाताई? ये ना ये. तुझा तापदायक नवरा तुझ्या सोबत दिसत नाही? तू एकटीच आलीस? छान. निवांत बोलता तरी येईल. बाकी तू त्याच्याशी कसा संसार करतेस देवजाणे. बरं सांग तू चहा घेणार की कॉफी?’

विजयाने पाहीले, त्यांचा चेहरा प्रसन्न दिसत होता. विजयाला भेटून त्यांना नेहमी आनंदच होत असे. खरं तर वीरभद्रबद्दल त्यांच्या मनात वैरभाव नव्हता. त्याच्यामुळे आपण अनेक गुंतागुंतीची प्रकरण यशस्वीरित्या सोडवू शकलो हे ते मनोमनी मान्य करीत. शेवटी कुठल्याही प्रकरणाचे सर्व श्रेय तो विनोदरावांना देई. आपल्याला प्रमोशन मिळण्यामागे त्याचा हात आहे हे खाजगीत मान्य करीत.  पण त्याचा तो बेदरकारपणा, कायद्याला धाब्यावर बसवून काम करणे, त्यांना अंधारात ठेवणे, वारंवार खोट बोलणे आणि सतत त्यांची टिंगल टवाळी करणे याचा त्याना राग येई.

ते आपल्या येण्याची वाट पहात होते अशी भावना त्यांच्या बोलण्यातून विजयाला जाणवली. वीरभद्रची आणि भार्गव भद्रेची आमनेसामने झाली ह्याचा त्यांना आनंद असला पाहीजे. गेल्या काही दिवसांपासून भार्गव पोलिसांसाठी डोकेदुखी बनला होता. त्याच्या अटकेबद्दलच्या आणि जामिनावर सुटल्याच्या बातम्या विजयाने वर्तमानपत्रातून वाचल्या होत्या. कायद्याच्या चौकटीत राहून भार्गव सारख्या मातब्बर नेत्याला अटक करणे पोलीसांना अवघड जात होते. भार्गवप्रमाणेच कायद्याच्या पळवाटाचा फायदा करुन घेणारा वीरभद्रच त्याला जेरबंद करु शकेल याची त्यांना खात्री होती.

सटरफटर गप्पा झाल्यावर, कॉफीचे घोट घेताना, त्यांनी तिला येण्याचे कारण विचारले.

‘सकाळी तुम्ही वीरभद्रवर एका तरूणीचे अपहरण केल्याचा आरोप केला. त्याचे त्याला फार दुःख झाले. त्याला वाटते की भार्गव भद्रेचा काहीतरी गैरसमज झाला असावा. त्याचा गैरसमज दूर करण्याची त्याची इच्छा आहे. कृपा करून तुम्ही मला भार्गव भद्रेची माहीती द्याल का?’


©ई साहित्य प्रतिष्ठान

'म्हणजे तुझ्या लबाड नवऱ्याने माझ्याकडून माहिती काढण्यासाठी तुझी योजना केली तर. ' विनोदरावांना मनातून बरे वाटले. वीरभद्र जर भार्गवच्या मागे लागला तर तो नक्कीच त्याला सबळ पुराव्यासह पोलीसांच्या ताब्यात दिल्याशिवाय राहणार नाही याची त्यांना खात्री होती. मनातला विचार चेहऱ्यावर दिसू न देता उघडपणे ते म्हणाले, 'आम्ही गुप्त माहीती सहसा कुणाला देत नाही. पण मी तुला नकार देऊ शकत नाही. जर मी दिलेली माहीती तू गुप्त ठेवण्याचे- अगदी तुझ्या नवऱ्याला सुध्दा सांगणार नाहीस असे- वचन देत असशील तर मी तुला काही महत्वाची माहीती देऊ शकेल. '

यावर विजयाने आनंदाने दिलेले वचन ती खचितच पाळणार नाही याची खात्री असूनही त्यांनी समाधान झाल्याचे दर्शविले.

खरे तर भार्गव भद्रेने एका सामान्य मुलीत एव्हढा रस का घ्यावा हे विनोदरावच्या ध्यानात आले नाही. या प्रकरणात वीरभद्रचा संबंध आहे, म्हणजे हे काही साधं प्रकरण नाही याची विनोदरावांना कल्पना आली होती. वीरभद्रचे भार्गव कडे लक्ष गेले म्हणजे तो आता लवकरच पोलिसांच्या जाळयात सापडणार याचीही त्यांना खात्री होती. एव्हढयासाठीच तर ते सकाळी  त्याला भेटायला गेले होते.

"भार्गव भद्रे हा मुंबईत कधी आला ते आम्हाला माहीत नाही. तो आला तेव्हा खार भागात रहात होता. तो सुरवातीला पोटासाठी अनेक छोटी मोठी कामे करीत होता. तो कुठेही जास्त दिवस टिकत नसे. त्याला कारण तो अतिशय हुषार होता. कोणतेही काम तो लवकर आत्मसात करीत असे. पण त्यात एक दुर्गुण  असा होता की मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग तो विघायक कामासाठी न करता तो विघातक कामासाठी करी.

"एका ऑफिसमध्ये काम करताना त्याला समजले की, तिथला लेखापाल ऑफिसच्या हिशोबात अफरातफर करतो. ही गोष्ट मालकाला सांगण्या ऐवजी त्याने त्या लेखापालाला गाठून आपल्याला त्याचे गुपित कळाल्याचे सांगितले. जर ते मालकाला कळू नये अशी त्याची इच्छा असेल तर कमाईतला काही भाग मुकाटयाने त्याला मिळावा. बरेच दिवस हे चालू राहीले. पण जेंव्हा भांडं फुटण्याची वेळ आली असं त्याला कळाले तेव्हा त्याने स्वतः मालकाकडे जाऊन लेखापालची तक्रार केली.

“नंतर त्याने भाजीवाल्यांची युनियन बनवली. पुढे निवडणूक लढवली आणि एका राजकिय पक्षात प्रवेश केला. पक्षातही त्याला सत्तेची हाव नव्हती. तो मध्यस्त म्हणूनच काम करीत असे. दिल्लीचे नेते आणि राज्यातल्या नेत्यांचा दुवा म्हणून तो काम करू लागला.

“कुठल्यातरी कंपनीत एका पैश्याचेही भांडवल न गुंतवता त्याने भागीदारी मिळवली. कंपनीच्या मालकाचे भयंकर गुपीत त्याला समजले असावे असा तर्क आहे. त्याला ब्लॅकमेल करून त्याने शेयर्स मिळविले अशी कुजबुज आहे, पण त्याला पुरावा काही नाही.

“त्याचे वैशिष्ठ म्हणजे तो कोणतेही अवैध  काम करीत नाही किंवा त्यात गुंतत नाही. थोडयाशा कालावधीत त्याने अमाप संपत्ती जमा केली, पण त्याच्या नावावर काहीही नाही. आजही तो अंधेरीला भाडयाच्या घरात राहतो. (ते घर त्याच्या मेव्हण्याच्या  नावावर आहे)

“पोलिसांना त्याच्या व्यवसायावर दाट संशय आहे. त्याने केलेला प्रत्येक व्यवहाराची आम्ही गुप्तपणे सखोल चौकशी करतो पण अजुन तरी आमच्या हातात काही सांपडलं नाही. ज्या दिवशी ते सांपडेल त्या दिवशी त्याला कुठल्याही राजकिय पक्षाचं संरक्षण असलं तरी  मी स्वतः त्याला बेडया घालायला जाईल. ”

त्यांनी बोलणे संपविले. क्षणभर विचार करून विजया म्हणाली, ‘त्याच्या नातेवाईकांची चौकशी तर तुम्ही करू शकता ना?’

‘त्याने काय होईल? प्यादं पकडलं जाईल. पण तो सावध होईल. त्याला आम्ही पोलीस, त्याच्यासमोर हतबल असल्याचं दाखवतो. त्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढेल व तो कधीतरी चुक करील अशी आमची अटकळ आहे. ’

‘तो कधी चुक करतो याची तुम्ही वाट पहात रहा. पण वीरभद्रने त्याला एखादे प्रवचन दिले व त्याला उपरती होऊन पाप क्षालनासाठी पादऱ्यांकडे देतात तशी त्याने तुमच्याकडे येऊन कबुली दिली तर तुम्ही वीरभद्रला जाब विचारणार नाहीत ना?’ तिने सहज आवाजात विचारले.

‘वीरभद्र?’ दचकून ते म्हणाले, ‘वीरभद्रचा याचाशी काय संबंध? विजयाताई, तू वीरभद्रला यातले काही सांगणार नाहीस असे नुकतेच मला वचन दिलेस ना?’

त्या दोघांची नजरानजर झाली. बराच क्षण ते एकमेकांकडे पहात होते. शेवटी विनोदराव म्हणाले,

‘अर्थात तू वचनभंग केलास तरी लहान बहीण समजून तुला माफच करील. ’

विजया हसली. ‘ठीक आहे मी निघते. नाही... नाही. मला सोडविण्याची गरज नाही. वीरभद्र येणार आहे मला घ्यायला. तो येईपर्यंत मी बाजूच्या मॉलमध्ये जाऊन त्याची बँकतली शिल्लक कमी करते.

‘गुड बाय विनोदराव. ’

III

वीरभद्रला गुन्हेगारी जगात ओळखणारे बरेच लोक होते. तेथे त्याला जितके दुष्मन होते तेव्हढेच किंवा त्यापेक्षा जास्त मित्र होते. वीरभद्रने आजवर अनेकांवर उपकार केले होते. परिस्थितीने गुन्हेगारीकडे वळलेल्यांना तो मदतच करीत असे. आजवर त्याने अनेकांना सन्मार्गाला लावले होते. ते वीरभद्र करता काहीही करायला तयार असत.

विजयाला सोडून तो आपल्या नेहमीच्या वर्तुळातील मित्रांना भेटायला गेला. तेथे त्याला हवी ती माहीती मिळण्याची खात्री होती. तो त्याच्या जवळच्या मित्राला घेऊन हिंडत होता.

भार्गव अनेक धंदे करुन नावानिराळा राहणारा कारस्थानी माणूस आहे. भुकेला वाघ आणि भार्गव अरण्यात भेटले तर आधी भार्गवला गोळी घालवी अशा लायकीचा तो माणूस. पैसा दिसल्याशिवाय तो कुठल्याही भानगडीत पडत नाही.


©ई साहित्य प्रतिष्ठान

मध्यस्ती करणे. अडचणीत सापडलेल्या लोकांकडून पैसे उकळून तो त्यांना अवैध मार्गाने बाहेर काढी. पण वेळ प्रसंगी त्यांनाच ब्लॅकमेल करण्यास तो मागे पुढे पहात नसे, त्याला कुणी मित्र नव्हते. त्याला कुणाबद्दल सहानुभूती वाटत नसे, अनेकांचा काळा पैसा त्याच्याकडे सुरक्षीत पडून होता. त्यासाठी तो त्यांच्याकडून भक्कम कमिशनही कमावत होता. त्यात अनेक पुढारी, सिनेमातली मंडळी, व्यापारी होते.

अलिकडे त्यानी काळा पैसा लपविण्याचे नविन तंत्र शोधुन काढले होते. त्यासाठी तो जटाशंकरच्या नादी लागला होता. जटाशंकरला अनेक राजकिय व सरकारी नोकरीतील हुद्देदार शिष्य होते. त्यांच्या साह्याने अनेक गोष्टी साध्य होतात हे लक्षात आल्यावर त्यानेही जटाशंकरचे शिष्यत्व पत्करले. स्वतःच्या फायद्यासाठी तो त्याच्या आज्ञेत रहात होता.

विजयाचा फोन आला तेव्हा वीरभद्रला हवी ती सगळी माहीती मिळाली होती. तिच्या फोनची वाट पहात तो पेयपान करीत मित्रांसोबत रंगात येऊन गप्पा मारत होता. विजयाचा फोन आल्यावर मित्रांचा निरोप घेऊन तिला भेटण्यासाठी विनोदरावच्या ऑफिसजवळील मॉलकडे निघाला.

भार्गव भद्रे हा बदमाश असून त्याने बरीच संपत्ती जमा केल्याची माहीती वीरभद्रने मिळवली होती. परंतू त्याच्या नावावर कुठलीही संपत्ती नाही, ही जगजाहीर गोष्टही त्याला माहीत होती. त्याच्या जवळ करोडोची संपत्ती असून ती त्याने कुठे ठेवलेली आहे याची त्याने माहीती मिळविली होती. आज रात्रीच तो त्याच्या गुप्त जागेवर धाड घालणार होता. भार्गव भद्रे सारख्या लबाड माणसांना लुबाडण्यात वीरभद्रला नेहमी आनंदच वाटे. मनातून तो अगदी उत्साहीत झाला होता. कार ड्राईव्ह करताना त्याच्या डोक्यात रात्रीच्या धाडसाची योजना आकार घेत होती.

मॉलसमोर त्याने रस्त्याच्या एका बाजूला कार उभी करून विजयाला आपण आल्याचा फोन केला. विजया त्याची वाट पहात असल्या सारखी उभी होती. पायऱ्या उतरुन येत असताना त्याने हात हालवून तिचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. ती हसत त्याच्या बाजूला वळाली. अचानक एक तरूण तिच्या पाठीमागे आला आणि तिला खेटून उभा राहीला. तिच्या चेहऱ्यावरील भाव बदलल्याचे वीरभद्रला जाणवले. तो घाईने तिकडे निघाला पण कुणीतरी त्याचा हात धरून थांबवले.

वीरभद्रने वळून त्याच्याकडे पाहीले. त्याने सभ्य माणसांसारखा पोशाख केला होता पण पाहताक्षणी जाणवत होते की तो गुंड आहे. वीरभद्रकडे पाहून त्याचा चेहऱ्यावर क्रुर हसू उमटले.

'अजिबात गडबड करू नको,' त्याला अडवणारा माणूस म्हणाला, 'गुपचुप समोरच्या टोयाटा गाडीत बैस. तुझ्या बायकोच्या पाठीला पिस्तुल लावले आहे. गडबड केलीस तर तिला गोळी मारण्यात येईल. '

वीरभद्र मोठयाने हसला. त्याने विजयाला पिस्तुल लावलेल्या माणसाकडे सहानुभूतीने पाहीले. एक मिनीट म्हणत त्याने विजयेला पुन्हा फोन लागला. तिच्या हातात फोन होताच. वीरभद्रचा नंबर पाहून तिने तत्काळ फोन उचलला.

'विजू, हा माझा मित्र सांगतो तुझ्या बाजूच्या छपरट माणसाने तुझ्या पाठीला पिस्तूल लावले आहे. '

'होय, ' विजया म्हणाली, 'मी त्याचे काय करावे?' तिने विचारले

'सध्या तू त्याच्यावर दया कर. माझ्या शेजारी उभा असलेला सभ्यगृहस्थ आपल्याला लिफ्ट देणार आहे. कदाचित ते आपल्याला भार्गवभाऊकडे घेऊन जातील. तेव्हा तू काही गडबड न करता ते सांगतात तसं कर. '

ते दोघे गुंड विजयाला आणि वीरभद्रला त्यांच्या टोयाटा कार जवळ घेऊन आले. दरवाजा उघडून त्याने विजयाला आत बसविले व तो स्वतः तिच्या मागून आत शिरला. दुसऱ्या दाराने दुसरा गुंड आत शिरण्याचा प्रयत्न करत होता. त्याला विजयाने लाथेने उडविले. आणि पुन्हा दरवाजा बंद करून लॉक केला.

'तुझ्या मित्राला पुढच्या सीटवर बसव नाही तर त्याला टॅक्सीने येण्यास सांग. त्याच्या तोंडाचा घाणेरडा वास येतो. '

पलिकडचा दरवाजा उघडून तिने वीरभद्रला आवाज दिला. वीरभद्र गाडीतल्या गुंडाला धक्का मारून आत बसला. तो गुंड विजया आणि वीरभद्रच्यामध्ये पुरता अडकला गेला. आपल्या हातात पिस्तुल आहे याचा त्याला विसर पडला. तो इतका गोंधळला की काय घडते,

ते त्याला कळेना. त्याचा पिस्तुलाचा हात वीरभद्रच्या ओझ्याने मुरगळून पिस्तुलाची नळी आता त्याच्या पोटाकडे झाली. चुकुन चाप दाबला जाईल अशी त्याला भीती वाटत होती.

'चल मित्रा, ' पुढे बसलेल्या ड्रायव्हरला उद्देशून वीरभद्र म्हणाला, 'आपला मित्र सांगेल तिकडे, घेऊन चल. भार्गवभाऊला भेटायला आम्हीही उताविळ झालो.' वीरभद्र सहजतेने म्हणाला. पिस्तुलधारी गुंडाची फजिती पाहून त्याला हसू येत होते.

'चल चल लवकर चल. ' वीरभद्रच्या बाजूचा माणुस कळवळून म्हणाला. त्याच्या अडकलेल्या हाताला वेदना होऊ लागल्या.

ड्रायव्हरने गाडी सुरू केली. वीरभद्रने आरश्यातून मागे पाहीले. विजयाने खाली ढकलून दिलेला गुंड जिवाच्या आकांताने दोन्ही हात हालवत गाडीच्या मागे पळत येताना दिसला.

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

७

इकडे वीरभद्रने भार्गवच्या माणसाची फजीती केली तेव्हा भार्गव त्याच्या वर्कशॉपच्या ऑफिसमध्ये अस्वस्थपणे येरझाऱ्या घालत होता. ते दिसायला वर्कशॉप असले तरी तिथे कुठलेही काम होत नव्हते. लोकांना फसविण्यासाठी वर्कशॉपचा देखावा होता. खरंतर तो भार्गवचा एक अड्डा होता. या ठिकाणी त्याने अनेक करामती करुन ठेवल्या होत्या. त्याला बाहेर पडण्यासाठी एक खाजगी दार सुध्दा होते. ते फक्त त्यालाच ठावूक होते. शिवाय वर्कशॉपला एक तळघर होते. तळघरात ऑफिसमधून लिफ्टने जाणाचा एकच मार्ग होता. तो फक्त भार्गव आणि त्याच्या विश्वासू दोन तीन माणसांनाच माहीत होता. त्याला तो तिजोरी म्हणे. तेथे रांगेने मजबूत बांधणीचे कपाटं ठेवलेले होते. त्या कपाटांत तो इतराचे काळे धन लपवून ठेवी. त्या बदल्यात त्यांच्याकडून मोठे कमिशन वसुल करीत असे. तिजोरीची तो जीवापाड काळजी घेत असे.

भार्गव दिसायला बेढब होता. तो डोक्याला पचपचीत तेल चोपडून भांग काढत असे. त्याच्या कपाळवर तेलाचे ओघळ स्पष्ट दिसत. तो मुद्दाम आपल्या प्रांताचा पोशाख करी असे. पैश्याचे नाव निघाले की त्याच्या नजरेत चमक येई.

लोकांच्या अडचणी आणि गुप्त गोष्टी माहीत करुन घेण्यात त्याला रस होता. किंबहूना त्यावरच त्याचा व्यवसाय आधारीत होता. जटाशंकर मोठे प्रस्थ आहे. त्याला तो गुरू मानत असला तरी त्याच्या विरुध्द पुरावे जमा करण्याच्या प्रयत्न्यात तो होताच.

आश्रमात काही तरी विपरीत प्रकार घडला असून त्या घटनेचे दोन साक्षीदार आहेत याची भार्गवला माहीती होती. म्हणून जटाशंकरने जेव्हा त्याला भानू भारस्वाडकराचा फोटो पाठवून तिला मारावे असा संदेश पाठवला तेव्हा त्याने नेमकी उलटी भाऊबंदकी केली. मा च्या ऐवजी ध केला. त्याला माहीत होते, जर भानू आपल्या तावडीत जिवंत सांपडली तर आपण जटाशंकरला वाटेल तसं खेळवू शकतो, त्याच्याकडून हवी ती किंमत वसूल करू शकतो.

म्हणूनच त्याने आपल्या माणसाला त्या रात्री भानूला पकडून आणण्याच्या सुचना केल्या. तिचा खून करायचा असता तर गोष्ट सोपी होती. पण त्या छोटयाश्या कामातही त्याच्या

माणसांना यश आलं नव्हतं. ऐनवेळी कुणी वीरभद्र नावाच्या तरूणाने मधे पडून तिची सुटका तर केलीच शिवाय त्याच्या दोन माणसांना जायबंदी केले.

ही बातमी ऐकल्यावर वीरभद्र त्याला पायाखाली तुडवावे अशी मनापासून इच्छा झाली. गोष्ट पुढे वाढण्या पुर्वी त्याने नजिकच्या पोलिसस्टेशनला जाऊन तक्रार केली. भानूमति सूर्यकांत भारस्वाडकर आपली नातेवाईक असून तिच्या डोक्यावर परिणाम झालेला आहे. ती वैद्यकिय उपचारासाठी मुंबईला आलेली आहे. आपली नजर चुकवून ती पळाली व तिला पकडून देण्यासाठी मला मदत करणाऱ्या सुजाण नागरीकाला मारहाण करून कुणी वीरभद्र नामक गुंडाने तिचे अपहरण केले.

कालपासून त्याची अवस्था एखाद्या जखमी श्वापदा सारखी झाली होती. भानू भारस्वाडकर त्याच्या माणसाच्या हातून निसटली. वीरभद्रच्या बायकोला ओलीस ठेऊन तिच्या बदल्यात भानूची मागणी करण्याचा त्याचा बेत होता. पण नुकताच त्याच्या माणसाचा फोन आला की वीरभद्र त्याच्या एका माणसाला, त्याची मोटार व ड्रायव्हरसह पळाला. तो कुठे आहे देवजाणे.

मरो तो वीरभद्र!

त्याने कितीदा प्रयत्न केले तरी पुन्हा-पुन्हा त्याचे विचार कालच्या प्रसंगाकडे जात होते. त्याने खिशात कोंबलेले सिगारेटचे पाकिट बाहेर काढले. कुठलीही वस्तू खिशात खुपसून ठेवण्याची त्याला सवय होती. एक चुरगाळलेली सिगारेट काढून त्याने सरळ केली. वेडयावाकडया झालेल्या काडेपेटीच्या काडीने त्याने सिगारेट पेटवली.

एव्हढयात त्याचा फोन वाजला. शर्टच्या खिश्यातून फोन काढताना त्याच्या खिशातून काही वस्तू खाली पडल्या. तिकडे दुर्लक्ष करून त्याने मोबाईलकडे पाहीले.

त्राहीशंकरचा फोन होता. त्याने उघड एक इरसाल शिवी हासडली. रात्रीपासून त्राहीशंकर सतत फोन करत होता. आधीच चिडलेल्या भार्गवने खाली पडलेल्या वस्तू सावकाश उचलून खिशात कोंबल्या मग फोन कट होण्याआधी त्याने तो स्वीकारला.

'फोन उचलायला एव्हढा वेळ का लागतो तुला?' पलिकडून खेकसल्याचा आवाज आला.

'मी काय  फोन जवळ आदबीने उभं राहून तुझ्या फोनची वाट पहातो काय?'उध्दटसुरात त्याने विचारले.

'तू माझ्याशी या पध्दतीने बोलू शकत नाही. '

'तुझ्या त्या लंपट बापाशीही असं बोलायला मी कचरत नाही. ' त्याच्या सुरात तुच्छता होती.

'तू अशाच पध्दतीने बोलणार असशील तर तुझ्या सोबत काम करणं कठीण जाईल. मुंबईतील आपला हस्तक बदलण्याची सुचना मी वडीलांना देणार आहे. '

'आधी ते जेलमघुन कसे सुटतील याची काळजी कर. ' बेफिकीरीने भार्गव म्हणाला. 'बोल कशाला फोन केला होतास? आणि तू असा सतत फोन करून नकोस. त्याचा रेकॉर्ड तयार होतो माहीत आहे ना तुला? उद्या या रेकॉर्डवरुन पोलीस माझा आश्रमाशी संबंध जोडतील. तेव्हा सारखा फोन करु नको. गरज पडल्यास मीच फोन करील. '

'कधी? तुझ्या फोनची वाट पाहून माझा रक्तदाब वाढत चालला आहे. तिला संपवली की नाही अजून?'

'काल ती माझ्या माणसांच्या हातून निसटली. ' हे सांगताना त्याला अपमान वाटत होता, 'पण तू काळजी करू नको. मी त्याच कामगिरीवर आहे. ठेव आता. पुन्हा फोन करू नको. ती हातात लागताच मी तुला फोन करीन. '

फोन ठेऊन तो पुन्हा आपल्या टेबला जवळील खुर्चीवर जाऊन बसला. वीरभद्रच्या बायकोचे अपहरण करायला गेलेल्या माणसाचेच त्याच्या कार व ड्रायव्हरसह अपहरण झाले होते. तो वीरभद्र आपल्या माणसाला जायबंदी करेल अशी त्याला अनुभवाने  भीती वाटत होती. पण तो त्यांना घेऊन पोलिसांत गेला तर काय करायचं? आपली माणसं आपलं नाव सांगणार नाहीत याची त्याला खात्री होती.

इतक्यात बाहेरचे शटर उघडण्याचा आवाज आला. त्याने टेबलाचा खण उघडून आत पिस्तूल असल्याची खात्री करुन घेतली. वेळ पडल्यास पिस्तूल काढता यावे यासाठी तो खण किंचित् उघडा ठेवला.


©ई साहित्य प्रतिष्ठान

एक देखणा तरुण डुग्गाच्या, त्याच्या माणसाच्या, गळयात हात टाकून येत होता. त्याचा चेहरा प्रसन्न दिसत होता. डुग्गा ओढल्यासारखा चालत होता. त्यांच्या मागून एक सिनेमा नटीसारखी सुंदर तरूणी गजगतीने येत होती. ते जवळ येई पर्यंत तो आवाक होऊन पहात होता. ‘तू आमचे तुझ्या या भिकार जागेत स्वागत करणार नाहीस का?’ जवळ येताच वीरभद्र त्याला म्हणाला.

‘कोण तू? डुग्गा... . कोण आहे हा? इथं कशाला आला?’ त्याने भानावर येऊन विचारले. त्याच्या बोलण्यात उत्तरप्रदेशच्या हिंदीची झांक होती.

‘हे मात्र ठीक नाही हां. ’ लटक्या रागाने वीरभद्र म्हणाला, ‘तुच तर ह्याला पाठवले होतेस आम्हाला आणायला. हो की नाही प्रिये?’ विजया कडे पहात तो म्हणाला.

‘तू कोण?’ त्याने प्रश्न केला.

‘वीरभद्र. ’

‘वीर... ... वीरभद्र!’ त्याच्या कडे अविश्वासाने पहात भार्गव म्हणाला. ह्या तरुणाने काल त्याच्या दणकट, राकट साथीदाराला जायबंद केले?

‘असं काय करतोस भार्गवभाऊ, माझ्या बायकोला पकडून आणायला तूच ह्याला पाठवला नव्हत कां? मी म्हटले चला आपणही सोबत जाऊ. मला सांग भाऊ, तू आम्हाला भेटायला इतका उताविळ का झाला?’

‘वीरभद्र, तू परत जाऊन भानूला घेऊन आले पाहीजे. तिला माझ्या ताब्यात दिल्या नंतरच तुझ्या बायकोची सुटका करण्यात येईल. तू कुठलीही गडबड करण्याचा विचार करू नकोस. माझ्या मर्जीशिवाय तू येथून सुखरुप बाहेर जाऊ शकणार नाही. ’

वीरभद्रने मिस्किल नजरेने त्या दोघांकडे पाहिले. तो त्याच्या समोरील खुर्चीत टेबलावर दोन्ही पाय ठेऊन बेफिकीरीने बसला.

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

'आम्ही दोघंच येथे आहे असं समजू नकोस. मी इशारा करताच वर्कशॉपमध्ये विखुरलेली माझी माणसं क्षणात जमा होतील. ' भार्गवने बजावले.

'मी म्हणतो त्याची गरजच काय? आपण दोघे एकाच धंद्यातले आहोत. सामोपचाराने हा प्रश्न सोडवू शकणार नाही का?' वीरभद्र म्हणाला.

'म्हणजे काय?'

'भानू भारस्वाडकर तुला कशासाठी हवी आहे हे मला चांगले माहीत आहे. तू जटाशंकरच्या सांगण्यावरून तिच्या मागे लागला आहेस. तू तिला ठार मारणार आहेस की त्याच्या ताब्यात देणार आहेस?'

'त्याच्याशी तुला काय करायचे?मी तुला अजिबात घाबरत नाही. ' त्याने पिस्तूल काढण्यासाठी अर्धवट उघडलेल्या ड्रावरमध्ये हात घातला. पण त्याला पिस्तूल काढता आले नाही.

त्याची हालचाल पाहून विजया मांजरीसारखी उडी घेऊन टेबलाच्या दुसऱ्या बाजूला गेली आणि तिने आपल्या शरीराचा जोर लाऊन ड्रॉवर दाबुन धरले. त्याचा हात ड्रॉवरमध्ये अडकल्याने तो वेदनेने कळवळला. त्याने डाव्या हाताने विजयाला ठोसा मारण्याचा प्रयत्न केला. पण तिने त्याचा हात वरचेवर पकडून पिळवटला.

आपल्या बॉसची अशी अवस्था पाहून डुग्गा त्याच्या मदतीला धावला. पण त्याला वीरभद्रने वाटेतच अडवले. दोन बोटांच्या चिमटीत त्याचे नाक पकडून जोराने पिळवटले. वेदनेने तो जागीच थयथयाट करुन नाचू लागला.

तुम्ही दोघांनी अजिबात आवाज करता कामा नये. शांततेने बोलण्याची तुझी तयारी असेल तर तुम्हाला सोडतो नाहीतर... . '

त्याने पुन्हा डुग्गाचे नाक पिरगाळले. विजयाने ड्रॉवरवरील दाब वाढवला.

'सोड... सोड. माझी तयारी आहे. ' कळवळून भार्गव म्हणाला.

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

'विजू, त्याला सोड. 'वीरभद्रने तिला सांगताच तिने ड्रॉवर वरील दाब कमी केला, तसा तो हात बाहेर काढून झटकू लागला. विजयाने चपळाईने ड्रॉवर उघडून पिस्तुल काढून घेतले.

तो शांत होई पर्यंत विजया वीरभद्रच्या शेजारी येऊन बसली. डुग्गा नाक चोळत भयंकर नजरेनं वीरभद्रकडे पहात होता.

'तू मला दिसशील असा आपल्या बॉसच्या शेजारी उभे राहयला हवे. 'वीरभद्र त्याला म्हणाला. तसे डुग्गाने भार्गवकडे पाहीले. भार्गवने मान हालवून संमती दाखविली.

एव्हढया गडबडीत वीरभद्रचा हात वेगळया कामात गुंतला होता. टेबलाखालून हातातल्या फोनवरून त्याने विनोदरावचा नंबर लावला होता. त्यांनी फोन उचलून हॅल्लो म्हणण्या आधी वीरभद्र मोठया सुरात म्हणाला,

'भार्गव, सांग तुझा आणि भानूचा काय संबंध आहे? तू तिच्या मागे का लागलास? तुला त्यातून काय मिळणार आहे ? मला सर्व सांग मग मी तुला माझ्या अटी सांगतो. '

'भानूचा आणि माझा काहीही संबंध नाही . मला त्राहीशंकरने फोन करून तिला ठार मारण्याच्या सुचना दिल्या होत्या. पण तिला जिवंत पकडून त्राहीशंकर कडून भरपूर पैसे उकळण्याकरता मी काल तिला पळवून आणणार होतो. पण वीरभद्र, तुझ्यामुळे माझ्या योजनेवर पाणी फिरले. ' तो खेदाने म्हणाला. त्याच्या बोलण्यावर वीरभद्रला हसताना पाहून खुनशी आवाजात तो म्हणाला,

'आज जरी मी तुझ्या तावडीत असलो तरी संधी मिळताच मी तुझी मान आनंदाने मुरगाळीन . '

विनोद ऐकल्याप्रमाणे वीरभद्र मोठयाने हसला.

'ते आपण नंतर पाहू . भार्गव तू मला जर पाच कोटी देणार असशील तर मी भानूला त्राहीशंकरच्या आश्रमात नेऊन सोडायला तयार आहे. '


©ई साहित्य प्रतिष्ठान

‘किती?’

‘मी काही जास्त सांगत नाही. आपल्या भोळ्याभक्तांना फसवून त्या लुच्च्या जटाशंकरने अब्जावधीची माया जमविली. त्यातून मी फक्त पाच कोटी मागतो. त्याची फाशी वाचली तरच तो जमवलेल्या संपत्तीचा उपभोग घेऊ शकेल. ’

‘मी त्राहीशंकरशी बोलतो. ’ तो म्हणाला.

‘आधी मला इथला पत्ता दे. मी तिला इथंच बोलावून घेतो. ’

वीरभद्रने ऐकू येत नसल्याचे नाटक करून दोन-दोनदा त्याच्या कडून तेथला पत्ता वदवून घेतला. विनोदराव तो  टिपून घेतील याची त्याला खात्री होती. त्याने आपला फोन बंद करून कुणाच्या नकळत कोटाच्या खिशात सारला.

भार्गव फोनवरुन जरावेळ त्राहीशंकरशी बोलला. फोन बंद केल्यावर तो म्हणाला,

‘त्राहीशंकरची तयारी आहे . तो तिथं गेल्यावर तुला पाच कोटी देईल. ’

‘मला ते मान्य नाही . मला पैसे इथंच मिळायला हवेत. इतकी रक्कम तुझ्याकडे नाही हे तू सांगू नकोस. कारण तुझी तिजोरी इथंच आहे याची मला कल्पना आहे. ’

आपल्या तिजोरीच्या उल्लेंख ऐकुन तो दचकला. शेवटी नाईलाज झाल्यावर त्याने वीरभद्रला पाच कोटी देण्याचे कबुल केले. त्यासाठी त्याला बाहेर बसून वाट पहावी लागणार होती. वीरभद्र विजयेसह बाहेर आला. त्याच्या मागे त्यांच्यावर नजर ठेवण्यासाठी डुग्गा बाहेर आला. पण त्याच्या नजरेतील आपल्याबद्दलची भीती वीरभद्रने ओळखली. त्याने खिशातून सिगारेटचे पाकिट काढले.

‘सिगारेट घेणार ? घे. आता आपण एकाच गँगचे झालो. ’  त्याला वीरभद्रचे म्हणणे पटले. त्याने वीरभद्रने दिलेली सिगारेट स्वीकारली. वीरभद्रने आपली सिगारेट पेटवून त्याच्या पुढे लायटर धरला. त्याने मुद्दाम लायटर जरा खाली धरला. डुग्गाला डोकं खाली वाकायला

लागलं. वीरभद्रने विजयाला खुण करताच तिने त्याच्या डोक्यावर पिस्तुलाच्या दस्त्याने प्रहार केला.

दुसऱ्या क्षणी डुग्गा बेशुध्द होऊन खाली कोसळला.

वीरभद्र पुन्हा ऑफिसमध्ये गेला तेव्हा आत कुणी नव्हते. जटाशंकरची तस्वीर बाजूला सरकून तेथे छोटीसी फट तयार झालेली दिसली. वीरभद्रने खाली वाकून पाहीले. त्याला पायऱ्या दिसल्या. तो पावलांचा आवाज न करता पायऱ्या उतरू लागला.

वीरभद्र तळघरातून वर आला तेंव्हा हातात एक ब्रीफकेस होती. त्याचा चेहरा प्रसन्न दिसत होता. ह्या केसचे कमिशन त्याने वसुल करून घेतले होते. तळघरात भार्गवची गठडी वळविण्यास त्याला पांच मिनीटेही लागली नव्हती. एव्हाना विनोदराव आपल्या मार्गावर असतील. ते येतील तेव्हा त्याला तळघरात, तिजोरीजवळ, हातपाय बांधलेला भार्गव भद्रे सापडेल. नोटांनी भरलेल्या आलमाऱ्या सापडतील. एव्हढया पैशाचा हिशेब देणे भार्गवला शक्य होणार नाही.

भार्गवला हातकडया घालताना विनोदरावांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासाठी वीरभद्र तेथे थांबला नाही. त्यांची जीप जेव्हा वर्कशापच्या दाराशी थांबली तेव्हा तो गल्लीच्या दुसऱ्या बाजूने विजयासह त्वरेंने निघून गेला.

८

।

भानूने सकाळी वर्तमानपत्र पाहीले, हेडलाईन्समध्ये भार्गव भद्रेच्या अटकेची बातमी झळकली होती. तशी दूरदर्शनच्या प्रत्येक वाहीनीवरूनही बातमी, रात्री उशीराच्या बातम्यातूनच देण्यात आली होती. भार्गवची अटक, तळघर, तळघरातील तिजोरी व तेथला अमाप पैसा यावर मिडिया देशभरातून भडीमार करत होता. एव्हढया पैशांच स्पष्टीकरण अजून भार्गवला देता आलं नव्हतं. त्याच्या पक्षानेही या प्रकरणातून अंग काढून घेतले होते.

‘आता त्याला पळता भूई थोडी होईल. ’ विजया टिव्हीचा आवाज लहान करीत म्हणाली.

‘त्याला तुम्ही शिक्षा केली हे बरं केलं. ’ हातातले वर्तमानपत्र बाजूला सारत भानू म्हणाली. ‘पण मला हे कळत नाही, त्याला जेलमध्ये पाठवून माझा प्रश्न निकालात कसा लागेल?’ तिने वीरभद्रकडे पाहीले.

वीरभद्र जवळच आरामात बसला होता. त्याचे टि व्ही वरील बातम्याकडे लक्ष नव्हते. वर्तमानपत्राला त्याने हात लावला नव्हता. कसल्या तरी विचारात तो गढला होता. भैरवने दिलेला चहा त्याने नकळत उचलला आणि कप तोंडाला लावला.

‘वीरभद्र, तुम्ही कसला विचार करता आहात?’ भानूने त्याची तंद्री मोडत विचारले.

विजयाच्या लक्षांतही गोष्ट आली होती. तिने जाणून बुजून तिकडे दुर्लक्ष केले होते. त्याच्या डोक्यात काहीतरी योजना आकार घेत आहे याची तिला कल्पना होती. अश्यावेळेस त्याची तंद्री भंग करायची नसते हे तिला व भैरवला माहीत होते. भानूला ते माहीत नसल्याने तिने अजाणते पणाने त्याला विचारले.

'मी तुमच्या विचारात व्यत्यय आणला का ?' आपली चूक लक्षांत येताच दिलगीरीच्या सुरात ती बोलली. वीरभद्र तिला काही उत्तर देणार एव्हढयात फोनची रिंग वाजली.

'तू नसता व्यत्यय आणला तरी विनोदरावांनी आणलाच असता. ' फोनकडे निर्देश करून वीरभद्र तिला म्हणाला, 'तेव्हा तू वाईट वाटून घेऊ नकोस. '

'नमस्कार विनोदराव. तुमचे मनःपुर्वक अभिनंदन. फार मोठी कामगीरी पार पाडली तुम्ही. तुमच्या नावाची टी व्ही वर, वर्तमानपत्रातून बरीच स्तुती चालली आहे. '

'ते जाऊ दे वीरभद्र. तो भार्गव सांगतो त्याला तू फसविले. भानूला त्याच्या हवाली करतो अशी लालूच दाखवून त्याच्या तिजोरीतून पाच कोटी रुपये पळवलेस?'

'याला म्हणतात, चोराच्या उलटया बोंबा. विनोदराव तुमचा माझ्यापेक्षा त्या बदमाशावर जास्त विश्वास बसावा ना? तुमच्या अशा बोलण्याने माझ्या मनाला किती यातना होतात म्हणून सांगू!'वीरभद्र नाटकी दुःखाने बोलला.

'पण तुझ्या हातात एक ब्रीफकेस होती असं प्रत्यक्ष पहाणारे सांगतात. '

'म्हणून काही मी चोर ठरत नाही. विनोदराव, तुम्हाला भेटल्यानंतर विजया मॉलमध्ये गेली होती. तिने खरेदी केलेल्या वस्तू त्यात होत्या. तुमचा काही तरी गैरसमज झालेला दिसतो. वाटल्यास मी कालच्या खरेदीचे बील दाखवू शकतो. पाहायचे असतील तर या. '

'काही नको. बायका मॉलमध्ये गेल्यावर काय करतात याचा मला अनुभव आहे. ठीक आहे. 'त्यांनी बोलणे संपवले. 'भार्गवने आरोप केला म्हणून चौकशी केली. मीही फोनवर तुझं बोलण ऐकताना असं काहीतरी ऐकल होतं. असो. तुला जास्त खोटं बोलायला लावत नाही. गुडबाय'

‘एक मिनीट विनोदराव, ’ वीरभद्र घाईने म्हणाला, ‘माझ्यासाठी एक करा, त्याला पंधरा दिवस तरी कस्टडीत ठेवा. पंधरा दिवस तो कुणीशी संपर्क करणार नाही याची काळजी घ्या’

‘का?’

‘मी सांगतो म्हणून. हा फक्त एक मोहरा आहे. पंधरा दिवसांनी मी तुम्हाला आणखी एक भेट देणार आहे. तयार रहा. ’विनोदरावकाही बोलण्याच्या आत त्याने फोन ठेवला.

‘बघ विजया, जग किती कृतघ्न आहे. या विनोदरावांना मी एव्हढा बेरका गुन्हेगार पकडून दिला त्याबद्दल आभार मानणे तर दूरच, त्यांना माझा संशय येतो की, मी भार्गवच्या तिजोरीतून पाच कोटी रुपये पळवले. मी तसे केले नाही याची तू खात्री देशीलच. कारण त्या वेळी तूच माझ्या सोबत होतीस. ’

‘अर्थातच तुम्ही तसे केले नाही हे मी कुणासमोरही शपथेवर सांगेन. त्याची तुम्ही काळजी करु नका. मला खात्री आहे, विनोदरावत्या बदमाशाच्या सांगण्यावरून तुम्हाला काही त्रास देणार नाही ‘तुम्ही पुढे काय करायचे ठरविले आहे?’

‘मला वाटते आपण जटाशंकरची प्राथमिक माहीती मिळवली पाहीजे. ’वीरभद्र म्हणाला.

‘माझ्याकडे त्यांची माहीती आहे. ’ उत्साहाने भानू म्हणाली. ‘काल तुम्ही दोघे बाहेर गेल्यावर मी दोघांची माहीती नेट वरुन मिळवली. भार्गवची माहीती आता काही कामाची नाही. जटाशंकरची सांगू ?’

तिच्या बालिश उत्साहाला दोघे एकमेकांकडे पाहून हसले. तिला वाईट वाटू नये म्हणून त्यांनी तिला होकार दिला.

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

जटाशंकरः यांचा जन्म १९४१ साली पाकिस्तानच्या सिंध प्रांतात झाला. त्यांची माता गरोदर असताना काही पंडीत त्यांच्या घरी आले व म्हणाले, 'तुमच्या घरी दिव्य बालक जन्म घेणार असून आम्ही त्यांच्या दर्शनास आलो आहोत. त्या आठवडयातच त्यांचा जन्म झाला. त्याचे दर्शन घेऊन ते पंडीत निघुन गेले. पण गावात त्यांच्याबद्दल कुतुहल निर्माण करुन गेले. '

फाळणी झाल्यावर त्यांचे कुटूंब गुजरातमध्ये रहायला आले. तीसरी पर्यंत त्यांचे शालेय शिक्षण तेथेच झाले. वडील वारल्यानंतर कुटूंबाची जबाबदारी स्वीकारुन त्यांनी शिक्षण सोडून दिले. पण त्यांचे घरात मन लागत नव्हते. ते पळून एका आश्रमात गेले. तेथे त्यांनी गुरूमंत्र घेतला. तेथेच त्यांनी ध्यानधारणा व योगसाधना केली. त्यांच्या आईच्या आग्रहाखातर व गुरुजींच्या आज्ञेनुसार त्यांनी विवाह करून गृहस्थाश्रमात प्रवेश केला. संसार करताना त्यांनी ध्यान धारणा सोडली नाही. दरम्यान त्यांना पुत्रप्राप्ती झाली. असं म्हणतात एका सकाळी नदी किनारी ध्यान लाऊन बसले असताना त्यांना परमेश्वराचे दर्शन झाले व घरी येऊन त्यांनी पत्नीची परवानगी घेऊन गृहत्याग केला.

या वर्षीच्या ऑगस्ट महीन्यात त्यांना नाबालिग मुलीवर लैंगिक अत्याचार व खुनाचा आरोपा खाली पोलिसांना अटक केली. निर्विघ्न चौकशी करता यावी म्हणून कोर्टानी त्यांचा जामिन नाकारला आहे.

वाचून झाल्यावर तिने वीरभद्र व विजया कडे पाहिले. ते दोघे तिच्याकडे पाहून हसत होते. ती खरोखर निरागस मुलगी आहे याची त्यांना खात्री पटली.

' तुझी माहिती अतिशय उपयुक्त आहे. योग्य वेळ आल्यावर तिचा उपयोग करता येईल. ' विजया म्हणाली.

'छान. प्राथमिक माहीती चांगली आहे. विजू मला वाटते मी दोन दिवस त्याच्या संबंधी योग्य ती माहीती मिळवतो. परवा सकाळी मी व भैरव मोटारीने त्याच्या आश्रमाकडे प्रस्थान करु. '

'म्हणजे काय! तुम्ही मला सोबत नेणार नाही?' विजयाने मोठे डोळे करून विचारले.

'नाही विजू. मी तुला राखीव दलात ठेवणार आहे. आणीबाणीच्या प्रसंगी आम्ही तुझीच मदत घेऊ. शिवाय भानूला एकटीला इथं ठेऊन जाता येणार नाही. तिच्या सोबत कुणीतरी हवे ना. '

'हे मात्र मला बिल्कुल मान्य नाही हां, तुम्हाला सांगून ठेवते. मी तुम्हाला एकटयाला अजिबात जाऊ देणार नाही. ' विजयाने आक्षेप घेतला.

त्याला तिचे प्रेम समजत होते. तिला दुखविणे त्याला मनापासून आवडत नव्हते. पण आपल्या बरोबर तिनेही संकटात पडावे हे त्याला पटत नव्हते.

'वीरभद्र, तुम्ही मला घरी सुरक्षीत ठेवण्याचा प्रयत्न कां करता? माझ्याकरीता तुम्ही संकटात पडावं आणि मी मात्र घरी आरामात लोळावं हे मला काही योग्य वाटत नाही. कृपया तुम्ही मला तुमच्या सोबत ठेवा. 'भानू आग्रहाने म्हणाली.

वीरभद्र काही न बोलता विचार करू लागला.

'पण तुला सोबत घेतल्यास ते तुला पहाता क्षणी ओळखतील आणि आपल्याला आश्रमात प्रवेश करायला अवघड जाईल. '

त्याचे म्हणणे तिला पटले. पण रुचले नाही. त्या रात्री वीरभद्रने आपल्याला नुसते वाचविलेच नाही तर ज्यांनी आपल्यावर हल्ला केला त्याला पोलिसांतर्फे अटक पण करविली. तरी आपल्या जीवाचा धोका टळला नव्हता. खरा धोका जटाशंकर पासून होता. त्या कारस्थानी माणसाशी दोन हात करायला, आपला जीव धोक्यात घालून, त्रयस्त वीरभद्रने एकटयाने जावे हे तिच्या मानी स्वभावाला पटण्या सारखे नव्हते. तिला अचानक एक कल्पना सुचली. त्यावर फारसा विचार न करता ती उत्साहाने म्हणाली,

'आपण असे करू या. तुम्ही ऐकून तर घ्या. तुम्हाला नाही पटले तर राहू द्या. ' तिचा हट्ट पाहून वीरभद्र चेहऱ्यावरील गंभीर करून ऐकू लागला.

'तुम्ही असं दाखवा की तुम्ही मला पकडून त्यांच्या स्वाधीन करायला घेऊन गेलात... . '

'भानू, ही कल्पना माझ्या डोक्यात आली नसेल असं तुला वाटलं का? अग पण वेडे, यामुळे तू पुन्हा संकटात सांपडणार नाही का?'

'नाही. वीरभद्र पहिल्यांदा मी संकटात सांपडले कारण त्या वेळी मी सावध नव्हते. या वेळी आपण तयारीने जाणार आहोत. शिवाय तुम्ही सोबत आहात. मी घाबरुन बिळात लपून बसणाऱ्यां पैकी नाही. वीरभद्र, ज्याने एकट्या स्त्रीवर भ्याड हल्ला केला त्याच्या छाताडावर पहिला प्रहार करायला मला निश्चितच आवडेल. तुम्ही मला अजिबात अडवू नका. '

तिच्या आवेशातून ती  कोणत्याही संकटाला सामोरी जाण्यास तयार असल्याचे वीरभद्रच्या निदर्शनास आले. ती सोबत आली तर मदतच होईल याची त्याला  खात्री पटली.

'ठीक आहे. आपण तसेच करू या. तुला मात्र तुझी काळजी घ्यावी लागेल. मी व भैरव तुझ्या सोबत असूच. '

'आणि मी ?' आपले नाव गळालेले पाहून विजया रागाने उद्गारली.

' तू राखीवदलात राहिलीस तर चांगले असे मला वाटते. आपण सगळे एकाच वेळी आत गेलो आणि संकटात अडकलो तर ऐन वेळी मदतीला कोण येणार? तू आश्रमाच्या बाहेर राहा . वाटल्यास आमच्यासोबत तिथपर्यंत चल. '

ते ऐकून विजया काहीच बोलली नाही. त्याचे वीरभद्रला आश्चर्य वाटले. अशा गोष्टी सहज स्वीकारणे तिच्या हट्टी स्वभावाला धरून नव्हते.

' माझ्याकडे त्राहीशंकरचा फोन नंबर आहे. मी त्याच्याशी बोलून आपली भेटण्याची वेळ ठरवून घेतो. मी भानूला घेऊन त्याच्याकडे जाईल. भैरव तू आमच्यामागे राहून आम्हाला संरक्षण देशील. कळले ना तुला भैरव?

'चांगलेच कळले मालक. आश्रमात तुम्हाला संरक्षण द्यायचे. ' त्याने वीरभद्रचे शब्द पुनःउच्चारले.

त्याच्या मठ्ठ डोक्यात किती शिरले याचा वीरभद्रला संशय होता तरी त्याचे आपल्यावरील प्रेम व निष्ठा याबद्दल त्याला कधीच संशय नव्हता. वेळेप्रसंगी आपले प्राणपणाला लाऊन तो आपले रक्षण करील याबद्दल त्याला खात्री होती.

'विजया तेथेच नजिकच्या हॉटेलमध्ये उतरलेली असेल. आपण कायम तिच्या संपर्कात असू तशी वेळ आली तर ती पोलिसांना घेऊन आश्रमात प्रवेश करील . ठीक आहे?'

दोघांनी मान हालवली . पण विजयाची मान हालली नाही हे वीरभद्रच्या नजरेतून सुटले.

'ओ के आता सगळे शांत बसा. मी त्राहीशंकरशी फोनवरून संपर्क करतो आहे. '

त्याने नंबर दाबला. जरा वेळ ओम् जय जगदीश हरे ची धुन ऐकू आली. त्यांना वाटले अनोळखी नंबर पाहून  तो फोन उचलणार नाही. पण फोन कट होण्यापुर्वी त्याने तो स्वीकारला.

'ओम् नमःशिवाय... ... . ?' पलिकडून शांत मृदू लाघवी आवाज आला.

'ओम नमः शिवाय... . ' मी मिश्किल माडीवाले बोलतो. वीरभद्र म्हणाला.

भानू त्याच्याकडे चकित होऊन पहात राहीली. त्याचा आवाज एकदम बदलून गेला. फोनवर ऐकणाऱ्याला वाटावं,  एखादा पारशी म्हातारा बोलतो आहे.

॥

दुसऱ्या दिवशीची प्रवासाची तयारी करुन ते रात्री उशीराने झोपले. वीरभद्र त्यांना पुन्हा-पुन्हा सुचना देत होता. विशेषतः भैरवला एक गोष्ट समजाऊन सांगताना त्याला कष्ट पडत

होते. इतक्या मठ्ठ माणसाला वीरभद्र का सोबत घेत आहे याचा भानूला उलगडा होत नव्हता. या भैरवमुळेच आपण संकटात सांपडण्याची शक्यता आहे याची तिला खात्री वाटत होती. कितीतरी वेळा त्याला घेऊ नये अशी सुचना करण्याचा तिला मोह झाला, पण तिने तो टाळला.

वीरभद्रची झोप हुकुमी होती. पण उद्याच्या साहसाच्या कल्पनेन भानूला रात्री लवकर झोप लागली नाही. सकाळी वीरभद्रने तिला उठवले तेव्हा मोठया मुश्किलीने डोळा उघडत होता. झोपेचा अंमल कमी झाल्यावर तिला समजले, वीरभद्र आपल्याला काही विचारतो आहे.

‘काय?’ तिने सावध होऊन विचारले.

‘तू विजयाला पाहिले आहेस काय?’

‘छे!’ ती म्हणाली ‘तुम्हीच तर मला झोपेतून उठविले. ’

एव्हढयात विजयेला शोधायला गेलेला भैरव परतला.

‘मालक सगळे घर शोधले. बाईसाहेबांचा कुठे पत्ता नाही. ’

‘कमाल आहे!’वीरभद्र उद्गारला. तेव्हढयात त्याचा फोन वाजला.

त्याने उघडून पाहीला. विजयाचा मॅसेज होताः मला शोधु नका. आपल्या योजनेप्रमाणे करा.

‘विजयाचा संदेश आला. चला आपण ठरल्याप्रमाणे कामाला लागू या. ’वीरभद्र म्हणाला तरी त्याच्या मनात मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले होतेः

ही विजया गेली असेल तरी कुठे?

९.

त्राहीशंकरने, जटाशंकरच्या एकुलता एक मुलाने, चाळीसी ओलांडली होती. उंचीला पांचफूट आठ इंच होता. त्याचे खांदे भक्कम आणि रुंद होते. गोऱ्या देखण्या चेहऱ्यावरील दाढीत अधुनमधुन पांढरे केस चमकू लागले असले तरी त्याला दाढी शोभून दिसत होती. त्याला वडीलांप्रमाणे शांत, धीरगंभीर आवाजात बोलण्याची सवय होती. बाबांना अटक झाल्यावर आश्रमातील लोक त्याच्याकडे वारस म्हणून पाहत होते. म्हणूनच सध्या, बाबांच्या अनुपस्थितीत, पंचकमळमहालाच्या पाचव्या मजल्यावर त्याचा मुक्काम होता.

त्राहीशंकर योगसाधना आटोपून सज्जात आला तेव्हा पूर्व दिशा पांढरी फटफटीत दिसत होती. सकाळच्या शितवायू लहरीने त्याला प्रसन्न वाटले. येथून आश्रमाचा सगळा परिसर नजरेच्या टप्प्यात येई. त्यासाठीच आश्रमाच्या परिसराचा मध्य साधून ह्या भवनाचे बांधकाम केले होते. भवनाचे बांधकाम सुरु झाले तेव्हा तो लहान होता. जटाशंकरला, त्याच्या बाबाला, ही इमारत फार आवडत होती. तिच्याबद्दल बोलताना त्यांचा चेहरा अभिमानाने उजळतो. त्यांनी मोठया हौसेने तिचे नाव पंचकमळमहाल ठेवले होते.

बाबा त्याच्याशी फारसे बोलत नाही. पण जेव्हा ते कुटूंबासोबत खाजगीत असत तेव्हा आईशी बोलताना त्यांनी कित्येकदा त्यांच्या लहानपणाबद्दल व तारुण्यातल्या दिवसांबद्दल ऐकले. फाळणीच्या दिवसातले विदारक अनुभव. केवळ अंगावरील कपडयांवर त्यांच्या आजोबांनी सिंधप्रांतातून रात्रीतून पळ काढला.

जटाशंकरला आपल्या पित्याबद्दल फार प्रेम व अभिमान होता. सिंध सुटल्यावर ते गुजरातमध्ये स्थिरावले. सुरवातीला निर्वासितांच्या छावणीत राहून त्यांनी दिवस काढले. पुढे पडेल ती काम करीत त्यांनी स्वतंत्र संसार उभा केला, आजी घरघुती पदार्थ करून विकत असे. तिला अशी कामं करावी लागतात याचे आजोबांना फार वाईट वाटे. सिंधमध्ये मोठया रुबाबात राहणारी आजी आता मोलकरणीसारखी काम करते याचा त्यांना खेद वाटे. पण आजीला त्याचे

काही वाटत नसे, ती अतिशय धार्मिक होती. झुलेलालवर तिचा अत्यंतिक श्रध्दा होती झुलेलालला भोग दिल्या शिवाय ती अन्न ग्रहण करीत नव्हती.

'झुलेलाल माझी परिक्षा पाहतो आहे. संकटात टाकल्याने मी त्याच्या राग करते का? त्याने माझे वैभव नेले एक दिवस तोच माझे वैभव पुर्वीपेक्षा कितीतरी पट करुन परत करेल. '

तिची ही निष्ठा छोटया जटाशंकरमध्ये उतरली. त्याला लहानपणापासून देवाची ओढ होती. रिकामा वेळ मिळेल तेव्हा तो ध्यान लाऊन बसे. कुणी विचारले तर तो ध्रुवबाळाचे उदाहरण देई. ते ऐकून त्यांच्या आईला फार समाधान वाटे ती त्यांना प्रेमाने जवळ घेऊन कुरवाळी. देवाने आजीला आणखी संकटात टाकले, आजोबांचे निधन झाले, तरीही आजीची श्रध्दा अढळ राहीली.

वडील गेल्यावर बाबांना घराची जबाबदारी घ्यावी लागली. त्यांचे मन संसारात रमत नव्हते. ते दोघे माय-लेक वेळ मिळेल तेव्हा भजन पुजनात वेळ घालवित असत. जगरहाटीप्रमाणे त्यांचं लग्न झाले, निसर्ग नियमाप्रमाणे त्यांना पुत्र प्राप्ती झाली. एके दिवशी आईच्या संमतिने संसाराचा त्याग करून ते सन्यास घेऊन निघुन गेले.

ते निघून गेले तरी त्यांच्या माघारी घरी काही कमी पडले नाही. त्यांची किर्ती उत्तरोत्तर वृध्दिंगत होत गेली. कुणीतरी भक्ताने त्यांना आपली पाच एकर जमिन आश्रमासाठी दान दिली. तेथे पर्णकुटी बांधुन ते राहू लागले.

पुढे त्याच ठिकाणी एका बाजुला औटहाऊस सारखे छोटेसे घर बांधुन आपल्या कुटुंबाच्या राहण्याची सोय केली. पर्णकुटी, घरापासून अंतरावर होती. तेथे बाबा साधना करीत असत. त्राहीशंकरला किंवा कुटूंबातील कुणाला तिकडे जाण्याची परवानगी नव्हती. बाबा तिथे भक्ताच्या कल्याणासाठी यज्ञयाग करीत असत. ज्या दिवशी तेथे यज्ञ असे त्या दिवशी घरात तणावपुर्वक मौन पाळले जाई. बाबा घरात फारसे कुणाशी बोलत नसत. कधी-कधी तर ते घरी परतत नसत. यज्ञविधी आटोपून मगच घरी येत. आजी त्यांना आंघोळ केल्याशिवाय घरात घ्यायची नाही. छोटया त्राहीशंकरला आश्रमाचे नेहमी गूढ वाटे.

मोठं झाल्यावर त्याला कुणीतरी सांगितले यज्ञ म्हणजे उग्रशक्तिला शांत करण्यासाठी हवन करण्यात येतो. त्या उग्रशक्तिची भुक भागवण्यासाठी बळी द्यावा लागतो.

'बळी कशाचा द्यावा लागतो?'त्याने अबोधपणे विचारले. सांगणारा गडबडला.

'कशाचा म्हणजे? कशाचाही. ती देवता मागेल त्याचा. जशी मागणी तसा बळी. '

तो पुढे काही न बोलता निघुन गेला. त्याच्या त्या उत्तरातून त्राहीशंकरला काही कळले नाही मात्र काहीतरी न सांगण्या सारखे अशुभ होत असावे असा बोध झाला. त्याने बळीची इतकी धास्ती घेतली की आपल्याला ते चुकून कधीतरी समजेल या भीतीपोटी तो किती दिवस त्या विषयावर कुणाशी बोलला नव्हता. मोठं झाल्यावर त्याला कळले: 'जेव्हढी राक्षसी अपेक्षा तेव्हढा राक्षसी बळी. '

काळ बदलला तशी आजीची श्रध्दा खरी उतरायला सुरवात झाली. भक्तिच्या वाऱ्या बरोबर लक्ष्मीचे आगमन होऊन तीघरभर नांदू लागली. ती सुफळ वृक्षासारखी बहरु डवरू लागली. आजीने सिंधमध्ये सोडून आलेल्या वाडयापेक्षा भव्य सदन तिच्या डोळयासमोर बांधले गेले. तिच्या डोळयातले समाधान पाहून जटाशंकर तृप्त झाले. त्यानंतर देशात अनेकठिकाणी पंचकमळमहालापेक्षा भव्य व खर्चिक आश्रम बांधले गेले, पण बाबांना पंचकमळमहाल प्रिय होता.

पंचकमळमहाल होताही तसा आकर्षक आणि अव्दितीय. दुरून तो जमिनीतून एकातून एक पाच कमळ उगवल्या सारखा दिसे.

कमळाच्या आकाराची ती एक गोलाकार पाच मजली इमारत स्थापत्य विशारदतेचा उत्कृष्ट नमुना होती. तिच्याभोवती खंदक असून मध्यभागी एक गोलाकार टॉवर उभारला होता. खंदकात सोडलेल्या पाण्यात मगरी पाळल्या होत्या. टॉवरच्या आतल्या बाजूने जीना असून तेच प्रवेशव्दार होते. जीन्याच्या बाजूला एक छोटी लिफ्ट होती. जटाशंकर शिवाय ती वापरण्याची परवानगी काही ठराविक लोकांनाच होती. कमळाला चारी बाजूला कमलदल होते. ते इमारतीच्या प्रवेशव्दारा पासून निघुन खंदकाच्या पलिकडील जमिनीवर टेकत होते. यंत्राच्या सहाय्याने ते उचलून घेता येत असत. ते उचलल्यावर कुणीही इकडून तिकडे जाऊ शकत नसे. सुरक्षिततेच्या दृष्टीने ही सोय करण्यात आली होती. रात्री दहा नंतर ते कमलदल मिटल्याप्रमाणे बंद होत.

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

इमारतीच्या तळमजल्यावर सामान्य भक्तजनांना मुक्त प्रवेश होता. मात्र त्याच्या वरच्या मजल्यावर भक्तांच्या योग्यतेप्रमाणे प्रवेश मिळे. चौथ्या मजल्या पर्यंत जायला बाबांची फारमोठी कृपा लागे. पाचव्या मजल्यावर तर बाबा आणि त्याचे खाजगीतले सेवकच जात.

बाबांना अटक झाल्यापासून त्राहीशंकर तेथे रहायला आला होता. भक्तांचे म्हणणे होते बाबांची गादी रिकामी राहू नये. त्राहीशंकर तर त्यांचा उत्तराधिकारी होता. तेंव्हा त्यानी, ते येई पर्यंत, त्यांची गादी सांभाळावी. भक्तगण त्याला बाबांच्या जागी समजून मान देतील.

त्राहीशंकरला ही न पटणारी गोष्ट होती. अध्यात्म म्हणजे काय दुकानदाराची पेढी आहे बापाकडून मुलाकडे जायला. बाबांनी सत्तर वर्षाच्या तपश्चर्येने जे मिळवलं ते मला चाळीस वर्षाच्या वयात कसं प्राप्त होणार? मी त्यांच्या आदरास पात्र व्हावे असे काही गुण माझ्यात नाही. उलट मी तर... . .

ते जाऊ द्या. तो माझा वैयक्तिक प्रश्न आहे. हा केव्हढा मोठा पसारा बाबांनी उभा केला. तो त्यांच्या अटकेनंतर बंद करायचा म्हटला तरी कोण करू देणार? देशभरातल्या आश्रमातून किती करोडची उलाढाल होते. किती लोकांना रोजगार मिळतो याचा विचार केला का कुणी? हे सगळ बंद करणं म्हणजे एक इंडस्ट्री बंद करण्या सारखं आहे. बाबा म्हणजे वन मॅन इंडस्ट्रीच आहेत. मुलं बापाच्या माघारी त्यांची इंडस्ट्री चालवतातच ना? त्यांच्या कुवतीबद्दल कधी कुणी शंका उपस्थित करतं का? बाबा परत येई पर्यंत सांभाळीन मीही हा व्यापार... ...

“व्यापार” शब्दाला तो स्वतःशी खुद्कन हसला. बाबांना ह्या शब्दाचा राग येत असे. त्यांच्या मते हे एक कार्य आहे आणि ते त्यांच्या हातून पार पडावे ही परमेश्वराची इच्छा आहे. तो त्यांच्याशी वाद घालत नाही. दोन पिढयांत अंतर असणारच.

पाचएकरचा आश्रम पहाता-पहाता साडेतिनशे एकराच्या परिसरात पसरला. कुणी प्रेमाने जमिन दिली, कुणी भक्तिभावाने, कुणी बाजारभावाने दिली. ज्यांनी प्रेमाने भक्तिने जमिन दिली त्यांची व्यापर व्यवसायात भरभराट झाली. ज्यांनी बाजार भावाने दिली त्यांना जटाशंकरने विस्थापित होऊ दिले नाही. त्यांना आश्रमाच्या सेवेत ठेवून घेतले.

मात्र ज्यांनी जमिन देण्यास नकार दिला त्यांना लगेच त्याची प्रचिती आली. देवकार्ग्रास इन्कार करणाऱ्यानी देवाचा कोप ओढावून घेतला. त्यांच्यावर संकटाची मालिका सुरू झाली. एव्हढयावर वेळीच जे चुकी उमगून शरण आले, त्यांना जटाशंकरांनी मोठया मनाने क्षमा केली. मात्र जे आठमुठे धोरण स्वीकारून बसले, कालांतराने त्यांच्यावर घरदार सोडून परागंदा होण्याची वेळ आली. आता ते कुठे आहेत याची कुणाला माहीती देखील नाही. काहीतर स्मृतिआड गेले.

आज भारतभर बाबांचे भक्तगण आहेत. भारतातल्या प्रमुख शहारात बाबांचे आश्रम आहेत. हजारो माणसांना आश्रमात रोजगार मिळाला. करोडो लोक बाबांचे भक्त आहेत. त्यात राजकारणी, व्यापारी, व्यावसायिक, सिनेकलावंत असे उच्चस्तरावर वावरणारे लोक तर आहेतच पण त्यांचे खरे भक्त मध्यमवर्गातले लोक आहेत. ते संखेने जास्त आहेत. त्यांचे प्रत्यक्ष आश्रमात येणे जाणे नसले तरी जेव्हा एखाद्या शहरात सत्संग होतो तेंव्हा ते मैदान भरून गर्दी करतात. आणि बाबांना गर्दी आवडते. लोकांच्या गराडयात त्यांना विराटरूप दिसते.

अध्यात्माच्या पराकोटीला पोहचलेले बाबा पुत्राच्या, त्याच्या, बाबतीत मात्र हळवे होते. त्याला जराही कुणी दुखावले तर त्यांचा संताप अनावर होई.

त्याला आठवले. बाबा परदेशवारी करुन परतले होते. त्यांच्या आगमनाची वार्ता शहरात पोहचली. ( ती त्यांना नेमकी कशी कळते ते त्राहीला समजत नव्हते. नंतर कळाले ती पसरावी याची व्यवस्था केली जाते. ) बाबांच विमान जमिनीला टेकल्या पासूनच लोकांनी जल्लोष सुरु केला. बाबा जेंव्हा विमानाच्या शिडीजवळ आले तेव्हा लोकांनी त्यांच्या नावाचा जयजकार सुरु केला. बाबा दाराशी येऊन थांबले. समोरची भरगच्च गर्दी पाहून त्यांच्या शरीरातून एक खुशीची लहर पसरली. भक्तांचे प्रेम हेच माझे वैभव आहे. ते नेहमी म्हणत. *ज्या दिवशी मी लोकांच्या मनातून उतरेल त्या दिवशी माझे अस्तित्व संपेल.*

सावकाश शिडी उतरून ते खाली आले. विमानापासून त्यांना नेण्यासाठी विमान कंपनीने स्वतंत्र कारची व्यवस्था केली होती. (ती त्यांच्यासाठी केलीच जाते. हा अलिखित नियम होता. ) कारमधून उतरताच लोकांनी त्यांच्या भोवती गराडा घातला. जो तो त्यांच्या पायाला स्पर्श करण्यासाठी धडपडून लागला. सेक्युरिटी गार्ड्सना लोकांना आवरणे कठीण चालले. पोलिसही जमावाच्या उत्सवाला पायबंद घालू शकत नव्हती. भक्तांना पोलिसांचा

किंवा आपल्या सुरक्षकाचा जाच होऊ नये या कडे कटाक्ष असे. त्यामुळे त्यांना बाबासमोर कडक उपायही योजता येत नसे. गर्दीचा जोर वाढला तसा मागून अतिशय दाब वाढला. त्यांच्या डाव्या हातच्या रक्षकाला उभे राहणे अशक्य झाले. तो बाबाकडे फेकला गेला. त्यांच्या अंगावर पडू नये म्हणून त्याने शेजारी उभे असलेल्या माणसांच्या खांद्यावर हात टेकले. तो बाबांच्या अंगावर आदळला नाही पण त्या गडबडीत त्याच्या जडशिळ बुटाचा  पाय आपल्या उघड्या पायावर पडला. बुटाचे काठ धारदार होते. गार्डही चांगला वजनदार होता. आपल्या नाजुक पायाला अतिशय वेदना झाल्या.

त्राहीशंकरला काय झाले ते लक्षांत येताच बाबाने त्या रक्षकाच्या तोंडात एक सणसणीत चपराक लागवली. कसाबसा सावरलेला रक्षक तोल जाऊन लोकांच्या गर्दीत पडला. त्याच्याकडे दुर्लक्ष करुन लोक बाबांच्या दिशेने झेपावत राहीले. बाबा निघून गेल्यावर गर्दी कमी झाली तेव्हा लोकानी पायाखाली तुडवलेला तो सुरक्षा रक्षक मरणासन्न अवस्थेत सडकेवर पडून होता. त्याला पोलिसांनी हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

दुसरे दिवशी आश्रमाकडून त्याला कामावरून कमी केल्याचे पत्र मिळाले.

त्राहीशंकरला लोकांबद्दल नेहमी कुतुहल वाटे. खरंच काय मिळते लोकांना बाबां कडून. पंडालमध्ये दूर कोपऱ्यात बसुन टी व्हीवर दिसणाऱ्या बाबांच्या प्रतिमेकडे पाहून, त्यांचे स्पीकर वरून प्रवचन ऐकून त्यांना काय आध्यात्म समजत असेल? पण सगळयात जास्त सेल तिथे होतो. बाबांच्या पुस्तकाचा, कॅसेटसचा, प्रतिमेचा. कि-चेन वगैरे छोटया अँटमकडे आश्रम लक्ष देत नाही, पण त्याचे विक्रेते खुश असतात. एकदंरीत मोठया शहरातला सत्संग चांगले उत्पन्न देऊन जाई.

त्यांचे हे सारे वैभव पहायला त्याची आजी नाही. पण झुलेलालने तिच्या श्रध्देची लाज राखली. सिंधमध्ये जे वैभव सोडून यावं लागलं त्याच्यापेक्षा कितीतरी पट तिच्यासमोर परत आलं. तृप्त मनाने आणि समाधानाने ती झुलेलालच्या आश्रयाला सोडून  कायमची निघुन गेली.

त्राहीशंकरला वाटले, ती गेली तेच योग्य झाले. आज ती असती तर जटाशंकरची हालत पाहून तिला नक्कीच यातना झाल्या असत्या. त्याने नकळत एक सुस्कारा सोडला.

गेल्या काही दिवसांपासून ग्रह बदलले. बाबां विषयी आदर दाखविणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यानी अचानक येऊन त्यांना, एखाद्या गुन्हेगाराला करावी तशी, अटक केली. नंतर कळाले की त्यांच्यावर अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. खुनाचाही आरोप आहे. त्या आरोपांना सिध्द करण्यासाठी पोलिसांकडे प्रत्यक्षदर्शी साक्षीदारही आहे.

बाबांच्या अटकेची बातमी समजल्यावर गावात तणाव निर्माण होईल असे पोलिसांना वाटले म्हणून त्यांनी योग्य बंदोबस्त ठेवला होता. पण गावातली शांतता भंग झाली नाही. लोकांचेही मन समजत नाही. ज्यांना आदर्श म्हणून पुजतात त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न करत नाही. भक्तांचे एकच म्हणणे आहे, सत्पुरूषाला अशा संकटातून जावेच लागते. प्रत्यक्ष श्रीकृष्णावर चोरीचा आळ आला होता. देवाच्या कृपेने बाबा निर्दोष बाहेर पडतील.

भक्ताने जरी त्यांना परमेश्वराच्या कृपेवर सोडले तरी त्राहीशंकरला आपल्या बापाला थोडंच ईश्वराच्या भरोश्यावर सोडता येते? तो पितृऋणातून उतराई होण्यासाठी प्रयत्नशिल होता. त्याने हुशार आणि नामांकित वकीलांची फौज उभी केली.

एव्हढेच नव्हे तर तुरुंगात बाबांना त्रास होऊ नये म्हणून रोज लाखो रुपये खर्च करीत होता. पैशाचा प्रश्न नव्हता. त्याच्या वडीलांची किती संपत्ती आहे हे त्याला माहीत नव्हतं. एव्हढेच काय तर त्याच्या व त्याच्या आईच्या नावावर किती संपत्ती आहे हेही त्याला माहीत नव्हते. पण वाईट प्रसंग आला की काही कामास येत नाही. पैशाने सगळया समस्या सुटत नाही. एव्हढे नामांकित वकील, पुढारी यांचा पाठींबा असूनही त्यांचा जामिन मंजूर होत नव्हता. साक्षीदारावर दबाव आणला जाईल, चौकशीत अडथळे निर्माण होतील अशी सरकारी पक्षाची भूमिका होती.

बाबा जेलमध्ये असताना त्यांचे कार्य बंद पडणार काय? चौकशीला अनुकूल वळण देण्याचे प्रयत्न चालूच आहे. पोलिसात काम करणाऱ्या खबऱ्यांनी तक्रारदार अल्पवयीन मुलीचा व खुनाच्या साक्षीदाराचा पत्ता स्वतः होऊन त्राहीशंकरला आणून दिला. बाबांच्या विरूध्द असे घाणेरडे आरोप त्यांना सहन झाले नव्हते.

लैंगिक शोषणाची आरोप करणारी मुलगी रेल्वे अपघातात मरण पावली. बाबांसारख्या सत्पुरूषावर घाणेरडे आरोप केल्याचा पश्चाताप होऊन तिने आत्महत्या केली. अशी भक्तांची खात्री पटली. तिने स्वतःच मरणापुर्वी तशी चिठ्ठी लिहून ठेवली. पण काही

पाखंडींच्या मते, ती अशिक्षित असून तिला लिहीता वाचता येत नव्हते. मग ती चिठ्ठी कशी लिहीणार? ही आत्महत्या नसून खून आहे. तरी बरं, बाबा जेलमध्ये आहेत. नाहीतर त्यांच्यावर ह्या खुनाचाही आरोप आला असता.

एक मात्र खरे वकिलांनी, ही घटना दुर्देवी असली तरी, जटाशंकरची केस दुबळी करणारी आहे असं सांगितलं. आपण वडीलांच्या काहीतरी कामास येतो याचा त्याला आनंद झाला. लैंगिक शोषणाची केस उभी राहू शकणार नाही.

पण खुनाची केस? त्याचे काय? जो पर्यंत भानू भारस्वाडकर जिवंत आहे, तो पर्यंत बाबांच्या डोक्यावर जेलची टांगती तलवार आहेच.

भानू भारस्वाडकर ! शेवटची साक्षीदार!

जर तिचे काही बरे वाईट झाले नाही तर... . ?

त्याने पुन्हा उसासा सोडला. विनीताच्या आधी त्याने भानूला संपविण्याचा प्रयत्न केला. पण ती पोरगी नशिबवान निघाली. एकाएकी ती गायब झाली. तिचा शोध घेतल्यावर कळाले ती मुंबईत आहे. मुंबईतला जटाशंकरचा भक्त (की हस्तक?) भार्गव भद्रेशी संपर्क साधावा लागला. भार्गव भलताच लोभी निघाला. असा राग आला, पण काय करणार? त्याला तोंडाने मागीतलेली रक्कम द्यावी लागली. तरीही ते काम त्याने धडपणे केले नाही.

भानूला मध्येच कुणीतरी पळवलं. आधी त्याला वाटलं, आपल्या व्यवसायिकां पैकी कुणीतरी असावं. बाबांच वाढतं प्रस्थ इतर महाराजांना पहावत नाही. अशा रितीने बाबांचा परस्पर काटा निघाला तर तो त्यांना हवाच आहे. पण कुणीतरी “मिश्किल माडीवाले” असं विचित्र नाव असलेल्या माणसाचा फोन आला. भानू त्याच्या ताब्यात असून तिला तो त्राहीशंकरच्या ताब्यात द्यायला तयार होता. त्यासाठी त्याने पाचकोटी रुपयांची मागणी केली होती. ह्या कामासाठी आधीच त्याने पाच कोटी भार्गव भद्रेला कबुल केले होते. त्याने ते तिजोरीतून वसुल केल्याचे सांगितले होते. त्यावेळी त्याच्यासमोर प्रत्यक्ष भानू नसली तरी भानूला ताब्यात देण्याची हमी देणारा एक माणूस बसला होता. त्याचं नाव वीरभद्र की काय असं विचित्र होतं. त्यानंतर वारंवार फोन करून भार्गवचा संपर्क झाला नाही.

रात्री उशीराच्या टी. व्ही. वरील बातम्यात भार्गवला अटक झाल्याचे कळले आणि त्राहीशंकरचे धाबे दणाणले. काल त्यानी सुचना देऊनही आपण त्याला वारंवार फोन करीत होतो. जर पोलिसांनी त्याचे फोन रेकॉर्ड तपासले तर सरळ ते आपल्या पर्यंत येऊ शकतील. पण त्याला बेहिशोबी मालमत्तेबद्दल अटक झाली हे समजल्यावर थोडे बरे वाटले. कुठल्याही वाहीनीने त्याचा व भानूचा संबंध जोडला नव्हता.

कुणाची तरी चाहूल लागली म्हणून त्याने वळून पाहीले. सेविका उभी होती. त्याने प्रश्नार्थक पाहीले. सिक्युरिटी स्क्रिनवर आहे.

तो आत गेला. पडद्यावर मुख्य सिक्युरिटी अधिकारी उभा होता. त्राहीशंकरला पाहून त्याने हात जोडून वंदन केले. त्राहीशंकरने सवयीप्रमाणे अशिर्वादासाठी हात उचलला.

‘सर… . क्षमा करा, महाराज… . ’

त्याचा गोंधळ त्राही समजू शकत होता. सगळे सर म्हणत असत. अलिकडेच त्याला बाबा किंवा महाराज म्हणायला लागले होते.

आपल्याला भेटायला कुणी मिश्किल माडीवाले आले आहेत.


©ई साहित्य प्रतिष्ठान

१०

।

वीरभद्र व भानू खाली उतरल्यावर भैरवने पार्किंग असा बाण दाखवलेल्या रस्त्याने गाडी नेली. आश्रमाच्या पार्किंगमध्ये गाडी उभी करायला भानूला मनापासून आवडले नव्हते. पळण्याची वेळ आली तर ऐनवेळी कार हाताशी हवी. तिच्या बोलण्यावर वीरभद्रने तुटक उत्तर दिले,

‘त्याची काळजी नको. भैरव हवी तेव्हा कार उपलब्ध होईल याची व्यवस्था करेल. ’

भैरवची व्यवस्था म्हणजे काय त्याला माहीत होत. भैरव कोणतीही कार चावी शिवाय सुरू करु शकतो याची वीरभद्रला खात्री होती.

तो पार्कींग कडे गेला असताना वीरभद्र सिक्युरिटी तपासणीसाठी गेला. त्याने समोर एक रजिस्टर ठेवले. नाव पत्ता कुठून आले सोबत किती माणसे आहेत त्यांचे नाव काय वगैरे माहीती होती. ती भरून त्याने गार्ड कडे दिली.

‘वेल कम मिस्टर... . . त्याने रजिस्टरवर नजर टाकली. “मिश्किल माडीवाले?”

त्याचा उद्गार ऐकुन वीरभद्रची खात्री पटली आपण येणार असल्याची त्याला पूर्व कल्पना देण्यात आलेली आहे. त्याने वळून पाहीले. तो गार्ड घाईने प्रमुख गार्डच्या केबिनमध्ये जाताना दिसला. आपण आल्याची वर्दी कुणाला तरी पोचली यात शंका नाही.

वीरभद्र जेव्हा सिक्युरिटी गार्डच्या केबिनमध्ये गेला तेव्हा तेथल्या पहारेकऱ्याला पाहून त्याला अतिशय आनंद झाला. खरेतर त्याला मोठ्याने हसावे वाटले. आपल्याकोटाच्या खिशातले पिस्तुल नकळत आत कसे न्यावे ही त्याला चिंता होती. गार्डच्या जवळ जाऊन त्याने त्याच्याकडे रोखून पाहिले.

‘कायरे डिकरा, तमारो नाम सुं छे?’

गार्ड काही बोलला नाही. तरी वीरभद्रने अगदी त्याच्या छाती जवळ तोंड नेऊन त्याच्या खिशाला अडकवलेले आयकार्ड वरील मजकुर मोठया आवाजात वाचला वाल्मिकी पांडे

‘अरे वा वा पिलाहत्ती! तू वाल्या कोळयापेक्षा मोठा दिसतो. तो वाल्याचा वाल्मिकी झाला पण तू तर पिलाहत्तीचा वाल्मिकी पांडे झालास. ’

त्याच्या या बोलण्याने गार्डचा चेहरा गोरामोरा झाला. त्याच्या जवळ जाऊन वीरभद्र म्हणाला, ‘हे बघ पिलाहत्ती, मी तुला मुंबई पासून ओळखतो. माझ्या कोटाच्या खिशात पिस्तूल आहे. माझ्या सोबत आलेला गबाळा व भोळसट दिसणारा माणूस आहे ना त्याच्या जवळही शस्त्र आहेत. जर आम्हाला दोघांना आडवलेस तर भाऊ, सुप्रिटेंट विनोदरावांचा फोन नंबर माझ्याकडे आहे. ते अजून तुझा तपास करतात. ’

‘मी आता सुधारलो. ’ तो घाबरुन म्हणाला.

‘असंच सुखाचं आयुष्य जग. ’ तपस्व्याच्या सुरात त्याने अशिर्वाद दिला.

थोडया वेळातच वीरभद्र व भैरव सेक्युरिटी रुममधून बाहेर येऊन त्यांची वाट पहात उभ्या असलेल्या भानूकडे निघाले. त्यांचे चेहरे प्रसन्न दिसत होते.

वीरभद्रने अगदी बेमालूम पारसी बाबाचे वेषांतर केले होते. त्याने जर हे वेषांतर भानूसमोर केले नसते तर तिला सुध्दा ओळखता आले नसते की तो वीरभद्र आहे. त्याने लांब कोट घातला होता. डोक्यास गोल पारसी टोपी. पाठीस किंचित् बांक निघाला होता. चष्मा नाकाच्या टोकापर्यंत खाली उतरला होता. किरकिऱ्या आवाजात बोलताना तो चष्म्याच्या टोकावरून समोरच्याकडे रोखून पाही. ओठांवरील मिश्या हनुवटी पर्यंत खाली आल्या होत्या. वीरभद्रच्या परिचिताने देखील त्याला ओळखले नसते. आपली सिक्युरीटी तपासणी आटोपून ती वीरभद्रची बाहेर येण्याची वाट पहात उभी राहीली. काचेच्या दारातून तिचे वीरभद्रकडे लक्ष होते.

तो तिच्या जवळ येताच ती म्हणाली, ‘आता आपल्याला स्वागतकक्षात जावं लागेल. ’ तेव्हढयात एक गार्ड पळत त्यांच्या जवळ आला.

‘आपण मिश्किल माडीवाले आहात कां?’ त्याने वीरभद्रच्या जवळ येऊन विचारले.

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

‘होय. तुमची काही हरकत आहे का?’ वीरभद्रने किरकिऱ्या आवाजात विचारले.

‘तुम्ही जरा थांबा. तुमची खास सोय करण्यात आली आहे. तुमच्याकरीता वाहन मागवले आहे. ’ तो त्याची निगरानी करीत उभा असल्या सारखा तिथे उभा राहीला.

त्यांना घेऊन जाण्यासाठी स्पेशल वाहन आले. तसे शेजारी उभ्या असलेल्या माणसांने त्यांच्या बॅगा उचलून गाडीत ठेवताना ड्रायव्हरला सुचना दिल्या. ड्रायव्हर झोकदार वळण घेऊन बॅटरीवर चालणारी गाडी आवाज न करता पंचकमळमहालाकडे वळविली.

त्यांची गाडी पंचकमळमहाला जवळ पोहचली तेव्हा सकाळी सहाला पांच मिनिट बाकी होते. पंचकमळाच्या पाकळया अजुन मिटलेल्या होत्या. गाडी खंदका जवळ उभी होती.

ती इमारत एखाद्या सरोवरातूनमधून उमललेल्या कमळासारखी दिसत होती. मधले टॉवर हिरव्या रंगाने रंगवले असल्याने ते एखाद्या कमळाच्या देठासारखे दिसत होते. त्याच्या भोवती कमळयाच्या आकारात पाच मजली इमारत बांधलेली होती.

‘ बरोबर सहाला रस्ता उघडतो. ’ गाडीवान म्हणाला.

रस्ता उघडण्याची वाट पहात ते परिसर न्याहळत गाडीत बसून राहीले पण गाडी थांबताच भैरवने खाली उडी मारली व तो खंदकाच्या दिशेने गेला. त्याला तिकडे जाताना पाहून ड्रायव्हर ओरडला.

‘आत वाकून पाहू नका. धोका आहे. ’

कुठून तरी एक पाखरू आलं आणि सुंई करुन खंदकात गेलं. तो इजिप्सियन प्लोव्हर होता. हा पक्षी इथ कसा? भैरवला आश्चर्य वाटलं.

‘इथं जवळपास कुठे मगरी आहेत का?’त्याने ड्रायव्हरकडे चौकशी केली.

‘इथल्या खंदकातच मगरी पाळलेल्या आहेत. ’ गाडीवानाने उत्तर दिले.

भानूने अर्थगर्भ नजरेनं वीरभद्रकडे पाहील. तिच्या नजरेतला संदेश त्याला कळाला.

इतक्यात इशारा देणारा सायरन वाजला. ड्रायव्हरने भैरवला आवाज दिला,

'ओ पाहूणे, इकडे या आता दरवाजा उघडून राहिला. '

भैरवचे त्याच्याकडे लक्ष नव्हते. तो समोरचे दृष्य पहाण्यात गुंग होता.

उगवत्या सूर्याच्या किरणात चार अजस्त्र पाकळ्या धीम्यागतीने उमलत होत्या. वीरभद्रला त्याच्या बाजूची पाकळीसंपूर्ण दिसत होती. त्याच पध्दतीने चारही पाकळ्या उमलत होत्या. हळू-हळू कमळाच्या पाकळ्या जमिनाकडे झुकू लागल्या. पहातापहाता त्याजमिनीला टेकल्या आणि इमारतीत जाण्यासाठी चारी दिशांनी पुल तयार झाले. ही करामत पहाण्यासाठी टेरेसवर जमा झालेल्या माणसांचा जल्लोष व आश्चर्योद्गारचा कोलाहल वीरभद्रच्या गाडी पर्यंत ऐकू आला.

'चला. ' असा उद्गार काढून ड्रायव्हरने वाहन सुरू केले. गडबडीने भैरव आत चढला. उजव्या बाजूचा रस्ता इमारतीच्या पहील्या मजल्यावर जात होता, ते बाणाने निर्देश केलेले होते. दुसरा उतरणीचा रस्ता विषेश पार्किंगकडे जाता होता. तेथे "प्रवेश निषिद्ध" अशी पाटी लिहीली होती. त्याच्या बाजूलाच एक गार्ड उभा होता. त्याने हात दाखवून गाडी आडविली.

आपली गाडी अडवल्याचे ड्रायव्हरला आवडले नाही.

'महाराजांनी बोलावले. ' त्याने घुश्शात उत्तर दिले.

'सोबत कोण आहे?'

'महाराजाना जाऊन इचार. मी चौकशा करीत नाही. घेऊन यायचा हुकूम झाला, घेऊन आलो. पाहीजे असन तर महाराजांना जाऊन इचार. '

'एव्हढं रागवायचं काम नाही. मी माझी डयुटी करतो. उद्या तुम्ही कुणा ऐऱ्यागैऱ्याला घेऊन जाल. बोलणी मला ऐकावी लागतात. '

'हो. तुलाचअक्कल आहे आम्हाला तर काही कळत नाही. ' ड्रायव्हर बोलला.

'जा ना आता. जास्त बोलू नको. ' गार्डला सकाळी कटकट नको होती.


©ई साहित्य प्रतिष्ठान

‘आधी गेट तर उघड. ’ हुकूम सोडावा तसा ड्रायव्हर बोलला.

चरफडत गार्डने गेट उघडले. गाडी सावकाश आत गेली.

‘गेटवाला मानस काय स्वतःला बिल्डींगचा मालक समजते. ’वीरभद्र बोलला.

यावर ड्रायव्हर त्याच्या मनातली मळमळ काढण्यासाठी गार्डला उद्देशून वीरभद्रशी बोलू लागला. वीरभद्र त्याला मान हालवून ‘बरोबर हाय’ म्हणत उत्तेजन देत होता. गाडी लिफ्ट जवळ आली तरी त्याचे बोलणे संपले नव्हते. त्याचे बोलणे ऐकायला भैरवला सोडून तो भानूला घेऊन लिफ्टकडे गेला. लिफ्टचे बटन दाबण्याआधी त्याने भानूला विचारले,

‘मिशन स्टार्टः भानू तू तयार आहेस ना?’

उत्तरा दाखल भानूने हात उचलून लिफ्टचे बटन दाबले.

॥

कुणाचीतरी चाहूल लागली म्हणून त्याने वळून पाहीले. नव्याने आलेली सेविका, काशी, उभी होती. त्याने प्रश्नार्थक पाहीले.

‘सिक्युरिटी स्क्रिनवर आहे. ’

त्राहीशंकर आत गेला तेव्हा पडद्यावर मुख्य सिक्युरिटी अधिकारी वाट पहात उभा होता. त्याला पाहून त्याने हात जोडून वंदन केले. त्राहीशंकरने सवयीप्रमाणे अशिर्वादासाठी हात उचलला.

‘सर... . क्षमा करा, महाराज... . ’

त्याचा गोंधळ त्राही समजू शकत होता. सगळे सर म्हणत असत. अलिकडेच त्याला बाबा किंवा महाराज म्हणायला लागले होते.

‘आपल्याला भेटायला कुणी मिश्किल माडीवाले आले आहेत. ’

त्याने तिरप्या नजरेन दाराकडे पाहीले, सेविका अजून दारात आज्ञेची वाट पहात उभी होती. तिला हातानेच तिला दूर जायला सांगितले. त्याचा इशारा समजून ती बाजूला झाली असे त्याला वाटले ती गेली. पण ती दाराआड उभं राहून त्यांचे बोलणे ऐकते याची त्राहीशंकरला खबर असती तर त्याने काही गोष्टी उघड बोलल्या नसत्या किंवा हळू आवाजात बोलला असता.

त्याचे बोलणे संपल्यावर त्याने बाहेर येऊन पाहीले. ती सेविका टेरेसवर उभी राहून बाहेरचा परिसर न्याहळण्यात गुंतली होती. समोरून पाहिले असते तर त्याला तिचा फुललेला श्वास दिसला असता. तिच्या पाठमोऱ्या कमनीय शरीराकडे पाहून त्याला मागून जाऊन तिला मिठी मारावी अशी प्रबळ इच्छा झाली. एरव्ही त्याने तसे केले असते तरी त्याला अडवायला कुणी नव्हते. काहीही झाले तरी येऊन बघायचे नाही असा तिथला दंडक होता. तिथले नोकर फक्त सांगितलेला हुकूम ऐकत. वडिलांनी त्यांच्या सेवेकरीता विश्वासातल्या माणसांची वर्णी लावली होती. तरी सुध्दा तो तिला स्पर्श करू शकत नव्हता.

दोन दिवसांपुर्वीच काशी त्यांच्या आश्रमात आली होती व तिने सरळ त्याची भेट मागितली. पडद्यावर तिचे सौंदर्य पाहून तो इतका मोहीत झाला की त्याने तिला सरळ पाचव्या मजल्यावर भेटायला बोलावले.

ती समोर येताच तो भारावून तिच्याकडे पहात राहीला. आता पर्यंत त्याने अनेक स्त्रिया पाहल्या होत्या पण इतकी लावण्यवती स्त्री त्याच्या पाहण्यात नव्हती. त्याच्या पाहण्याचा रोख लक्षांत येताच तिने चेहऱ्यासमोर पदर आडवा धरला.

नजरेस व्यत्यय आला म्हणून तो भानावर आला.

‘कोण तू? माझ्याकडे काय काम आहे?’

‘मी... माझं नाव काशी. ’ तिच्या मंजुळ आवाजात एक नशिली लय होती. त्याला तोंडात गोडघासा बरोबर केस गेल्यासारखे वाटले. इतक्या सुंदर मुलीचे नाव काशी?


©ई साहित्य प्रतिष्ठान

‘तुला बाबांची दिक्षा घ्यायची काय?’ त्याने विचारले

‘न्हाई. येगळच काम हाय बघा बाबाकडं. आता ते जेलात हायेती, तवा शेजारीन म्हंली बाबा काय आन त्याचा मुलगा काय एकच. त्यो बी त्यांच्याच वळणावर गेला. आता वळणाच पाणी वळणावरच जाणार नव्हं? तुमी बाबाचं काम चालू ठिवलं. म्हणं त्यांना भेटून गाऱ्हाण घाल. तुज काम व्हईल. ’

‘व्हय?’ त्राहीशंकर मनातून खुश होऊन नकळत तिच्या भाषेत बोलला, ‘बरोबर आहे तिचं म्हणणं. बाबाच्या माघारी मीच त्यांची गादी सांभाळतो. मला सांग तुझ्या मनातली गोष्ट. मी तुझे दुःख दूर करीन. ’त्याचा स्वर लंपट झाला.

‘माहा नवरा. एका तरूण मुलीसंगट कुठेतरी निघुन गेला, मला यकटीला टाकून. तुमी कायतरी योजना करा. त्या सटवीला चांगली अद्दल घडली फायजे. ’

‘काय काळजी करु नको. तुला त्रास दिल्याबद्दल त्या दोघाना चांगला धडा शिकवतो. ’ त्राहीशंकर तिच्या जवळ जात म्हणाला.

‘नग नग दोघांना नग. त्या भवानीलाच शिकवा. माझा दादला चांगला हाय. तो परत माझ्याजवळ यील असं करा. ’ हे म्हणाताना तिचे लाजणे पाहण्यासाठी त्राहीशंकरने जीव दिला असता पण तिने चेहरा पदराने झाकून घेतला होता.

‘ठीक आहे. मी तिला शिक्षा करील. त्याला तुझ्याकडे परत पाठवीन. पण त्या बदल्यात तू माझी सेवा करायला हवी. काय?’ त्याच्या बोलण्यातून त्याचा हेतू स्पष्ट समजत होता.

तिने उत्तर दिले नाही तसं तोच म्हणाला,

‘ठीक आहे. मग तुझे काम माझ्या कडून होणार नाही. बाबा सुटून आल्यावर भेट. ’

‘नग नग माझी तयारी हाय. पर एक अडचण हाय बघा. ’ती म्हणाली

‘काय?’

‘जरा हे चार दिवस. . देवाची अडचण हाय बघा... जाऊ द्या. मग ... . ’

तिला बघितल्यावर चार दिवस थांबणे त्याच्या जीवावर आले होते. त्याला काय इलाज नव्हता. पण तिने कुठेही न जाता त्याच्या सेवेत तिथेच राहावे असे सांगितल्यावर तिने आढे-वेढे घेत तयारी दाखवली. ती सतत आजुबाजुलाच वावरताना दिसे. तिचे आसपासचे वावरणे त्राहीशंकरला मोहीत करीत होत.

‘काशी... ’

त्याने मृदू आवाजात हाक मारली. ती नाकाच्या टोका पर्यंत पदर ओढून वळाली.

एव्हढयात बाहेर मोठयाने बोलण्याचा आवाज आला. कुणीतरी गेंगाण्या आवाजात मोठयाने बोलत होतं. त्याला सेवक सरळ आत येण्यास मना करीत होते.

‘महाराज, तुम्हाला भेटायला... . ’

‘मिश्किल माडीवाले. . मिश्किल माडीवाले नाव आहे माझं. ’

काशी टेरेसच्या दरवाजात उभी होती. तिच्याकडे लक्ष न देता त्राहीशंकर जाड भिंगच्या चष्म्यातून रोखुन बघणाऱ्या पारश्याकडे बघत होता. त्याच्या मागे भेदरलेली तरूणी मान खाली घालून उभी होती.

आपल्या बापाला तुरुंगात जायला कारणीभूत ठरलेली मुलगी. भानू भारस्वाडकर ! तिला पाहून त्याच्या मनात क्रोधाची ज्वाला भडकली. त्याने सेवकाना आज्ञा केली

‘सर्व मार्ग बंद करा. कुणीही बाहेर जाता कामा नये!’

११

हुकूम ऐकून  सेवकांनी दरवाजे बंद करून घेतले. काशी टेरेसचा दरवाजा बंद करुन आत येऊन इतकी शांत उभी राहीली की त्राहीशंकर तिचे अस्तित्व विसरून गेला.

त्याचा तो अभिनिवेश पाहून पारसी बाबा गडबडला.

‘ए, सुनो डिकरा. मी इथं असताना तू तिच्या अंगाला हात लाऊ शकत नाही. ए ट्राहीशंकर... सुन ना डिकरा. तू प्रॉमिस केला मला. ’

वाटेत आडवे येऊन बडबडणाऱ्या पारश्याकडे त्याने कटाक्ष सुध्दा न टाकता त्याला हाताने बाजूला ढकलून दिले. तो तोल सावरत खाली, मऊशार जाजमावर पडला. पुन्हा हाताल्या काठीच्या साह्याने उठण्याचा प्रयत्न करु लागला.

त्याच्या क्रोधाला किंवा अंगावर धावून येण्याने भानू जराही विचलित झाली नाही. आपली ओढणी कमरे भोवती गुंढाळून ती प्रतिकाराच्या पवित्र्यात उभी राहीली. तिची निर्भीड अविचलता पाहून त्राहीचे पावलं जागीच थबकली.

‘हे बघ ट्राही, माझ्या समक्ष तू तिला हात लाऊ शकत नाही. ’ पारसी बाबा उठून पुन्हा दोघांच्या मध्ये आला.  ‘ये डिकरी तू नीट उभी रावा ना. अशी झेप घेणाऱ्या वाघिणी सारखी कशाला उभी राहते?’

‘तू बाजूला सरक पारश्या’ रागाने त्याच्यासमोर बोट नाचवत त्राहीशंकर ओरडला. ‘माझ्या बापाला तुरुंगात डांबणाऱ्या पोरीला चांगलाच धडा शिकवतो. ’

‘तुझा बाप त्याच लायकीचा आहे, घुबडा. ’ भानू फुत्कराली.

‘शांती... शांती... शांती नाखजो ना भाई. ’ दोघाच्यामध्ये हात आडवा धरून मिश्किल माडीवाले त्राहीला म्हणाला,

‘तावा मंधी समदा काम बिघडून जाईल. ’भानूला उद्देशून तो बोलला. त्याच्या बोलण्याने ती भानावर आली. ती सारा राग गिळून गप्प बसली. पण त्राहीशंकरचा राग अनावर झाला.

‘तिला मी मारूनच टाकणार आहे. ’वीरभद्रला  हाटविण्याचा प्रयत्न करीत दात ओठ खात तो म्हणाला.

‘व्यवहाराची बात आहे भई, तू फोनवर आम्हाला कबुल केला होता, डिकरीला आणून पोहचविला की माझा पैसा मिळेल. अजुन माझा पैसा मिळाला नाही. ती डिकरी माझ्या ताब्यात हाय. ’

‘काय बोलला तू? पैसा? तुला पैसा पाहीजे?’

आता त्याने सरळ वीरभद्रचे बकोट धरले. त्याला शेजारी उभ्या असलेल्या रक्षकाच्या अंगावर ढकलले.

‘पकडा त्याला. सुटू देऊ नका. ’

दोन आडदांड माणसांने त्याच्या दंडाला धरून मागे ओढले. तो त्यांच्या हातून सुटण्याची धडपड करू लागला. त्याचा अडसर दूर झाल्यावर त्राही तिच्याकडे रोखुन पहात आत्मविश्वासाने पुढे सरकू लागला.

तो पुढे येऊ लागला तशी भानू पाऊलभर मागे सरली. वीरभद्रकडून काही सुचना मिळते का ते पाहण्यासाठी तिने वीरभद्रकडे नजर टाकली. दोघांच्या पकडीत तो असाह्य उभा होता. त्याच्या घाबरलेल्या चेहऱ्याकडे पाहून त्याची मदत मिळणार नाही याची तिला खात्री पटली.

‘त्राही, माझं ऐकून घे. तू ह्या थेरडया पारश्याला हाकलून लाव. त्याला कबुल केलेले पैसे मला दे. मी कुठेतरी निघुन जाईल. कोर्टात तुझ्या बापाविरूध्द साक्ष द्यायला येणार नाही. ’


©ई साहित्य प्रतिष्ठान

'आधी मागितले असते तर तुझ्या वजनाच्या भरोभार दोनहजाराच्या नोटा दिल्या असत्या. पण तू नागाच्या शेपटीवर पाय दिलास. तुला मरावंच लागेल. ' त्याचा आवाज टिपेला गेला.

'शेपटीवर पाय पडलेल्या कुत्र्यासारखा विव्हळू नकोस. त्राही विचार कर. तू मला मारलंस तरी ह्या पारश्याला पैसे देऊन पाठवणारच आहे ना. उद्या तो पलटला तर कोर्टात साक्ष देणार नाही कशा वरून? त्याच्या सारखा हावरट माणूस तुला बॅकमेलही करेल. '

त्राहीशंकर विनोद ऐकल्या सारखा मोठयाने हसला.

'तुला कुणी सांगितले, ह्या माकडाला मी जिवंत सोडणार म्हणून? तुम्हा दोघांनाही मी येथून जिवंत जाऊ देणार नाही. '

त्याने अंगरक्षकाच्या कमरेला अडकलेलले पिस्तुल उपसून काढले.

त्याच्या त्या कृतिने भानुला त्या रात्रीची आठवण झाली. जटाशंकरने अश्याच रागाने अंगरक्षकाच्या कमरेला अडकवलेले पिस्तुल काढले आणि सर्वांच्या समक्ष त्यानी प्रभातवर गोळ्या झाडल्या. त्यांच्या कृतित, हालचालीत किती साम्य होत. जस काही ती पडद्यावर फ्लॅशब्लॅक बघत होती. फरक एव्हढाच होता, तो सत्तरीचा म्हातारा होता आणि हा तरूण आहे. त्याच्या हातात पिस्तुल आले की तो सुध्दा पारश्याच्या वेषातल्या वीरभद्रवर गोळ्या झाडेल व नंतर आपल्यालाही ठार मारेल.

तो पिस्तूल घेऊन वळण्यापुर्वीच तिने भक्षावर झेप घेण्याऱ्या मांजरीप्रमाणे त्याच्या अंगावर झेप घेतली. तिच्या अकस्मात धडकेने तो जमिनीवर कोसळला ती त्याच्या छाताडावर बसून दोन्ही हातांनी त्याच्या गालावर प्रहार करु लागली.

काय प्रकार घडते आहे, ते जरावेळ कुणाला कळला नाही. त्राहीशंकरच्या ओरडण्याने रक्षक भानावर आले. वीरभद्रला सोडून ते भानूच्या दंडाला धरून ओढू लागले. तिच्यात एव्हढे अवसान आले की, तिला आवरताना दोघाना कष्ट पडले.

तिला बाजूला हटवताच त्राहीशंकर उठून उभा राहीला. त्याच्या अंगावरची शाल खाली पडून राहीली याचे त्याला भान नव्हते. तो रागाने थरथरत होता. उठल्यावर त्याने झटापटीत दूर पडलेले पिस्तुल उचलले आणि भानूवर रोखले.

'ए ए ए भई, धीरज रख ना जरा. पिस्तूल हातात आला की गोली चालवली धॉय असं थोडंच चालत. ए डीकरी तुला शांती नाखायला सांगितलं होतं ना. '

तिचं वीरभद्रच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतं. ती विस्फारल्या नजरेनं एकटक त्राहीशंकरने ताणलेल्या पिस्तुला कडे पहात होती.

'चल बाजूला हो म्हाताऱ्या. ती माझ्या हातून वाचणार नाही. ' त्याने पुन्हा पारश्याला धक्का मारला.

'मग चालू द्या तुमच भांडण. मला तुमची छोकरी नको आणि पैसा नको. जान बची लाखो पायें... ' किनऱ्या आवाजात बोलत तो दरवाजाकडे जाण्यास वळाला.

'थांब. ' जरबेच्या आवाजात त्राहीशंकर म्हणाला, 'दोघही जिवंत जाणार नाही. म्हाताऱ्या, तुला नीट उभं राहता येत नाही पायांवर आणि तू माझ्याशी टक्कर घ्यायला निघालास?' त्याच्या धमकीला घाबरल्यासारखा वीरभद्र हात वर करून उभा राहीला. तो भीतीने थरथरत होता.

भानूच्या अविचाराने सगळा खेळ बिघडला. आता यातून सुटण्याचा मार्ग शोधायला हवा. त्याचे डोके वेगाने काम करत होते. वीरभद्र कितीही संकटात असला तरी त्याचे डोके शांतपणे काम करीत असे.

नाका पर्यंत पदर ओढलेली काशी झटापटीत अंगावरून गळून पडलेली शाल उचलून त्राहीशंकरच्या उघडया अंगावर पांघरताना त्याच्या कानात पुटपुटली,

'सावध! त्यांचा एक माणूस खाली उभा आहे. '

त्राहीशंकर भानावर आला. मनातून त्याने गावरान काशीच्या बुध्दिला दाद दिली. रागाच्या भरात त्याला खाली उभ्या असलेल्या वीरभद्रच्या माणसाचा विसर पडला होता.


©ई साहित्य प्रतिष्ठान

यांना जर इथेच संपवले तर त्यांच्या प्रेताची विल्हेवाट लावणे काही कठीण नव्हते. रात्री भुयारात जाऊन खंदकात फेकले की झाले. मगरी सगळा पुरावा नष्ट करुन टाकतात. पण खाली उभा असलेला मिश्कील माडीवलेंचा माणूस जिवंत सुटला तर बाहेर जाऊन बोंबाबोंब करणार. आधीच पोलिसांची संशयी नजर आश्रमावर आहे. त्यात आणखी भर नको. त्याने कौतुकाने काशीकडे पाहीले.

'या दोघांना बांधून ठेवा. ' त्याने सेवकांना हुकूम सोडला.

दोन माणसं पुढे आली. त्राहीशंकरने त्याच्यावर पिस्तूल रोखले असल्याने वीरभद्रने कुठलीही हालचाल केली नाही. आपल्याला बांधून ठेवले तरी जगातली कुठलीही गाठ आपण हवी तेव्हा सोडू शकतो याची वीरभद्रला खात्री होती. दोघांवर बंदूक ताणली असताना कसली धडपड करणे वेडेपणाचे ठरले असते.

आधीच भानूने त्राहीवर हल्ला करून त्याच्या योजनेचा बोजवारा उडवला होता. आवश्यक पुरावे मिळे पर्यंत त्याला तिथेच रहायचे होते. भानूला त्याच्या हवाली करण्याचे नाटक करून तेथे वेळ काढण्याचा त्याचा मानस होता. पण भानूने गडबड केली. आतासारा डाव बदलावा लागणार होता.

त्याही परिस्थितीत भानूच्या धैर्याचे त्याने मनोमन कौतुक केले. तशी वेळ आली तर तिचा उपयोगच होणार होता.

'फार छान!' त्यांना करकचून बांधल्याची खात्री करुन त्राहीशंकर म्हणाला. 'आता तुम्ही दोघं त्यांच्यावर नजर ठेवा. जास्त शहाणपणा दाखवू लागले तर सरळ गोळी घाला. आणि तू, ' तो एकाकडे वळून म्हणाला, 'लिफ्टने खाली जा. याचा माणूस याची वाट पहात खाली उभा असेल. त्याला म्हणावं, तुला मालकाने वर बोलावले. '

'आणि हो. ' तो निघालेला माणूस वळाला. 'सोबत आणखी एखाद्याला घेऊन जा. प्रेमाने नाही आला तर त्याला उचलून आणा. रिकाम्या हातानी येऊ नका. निघा. '

त्याची आज्ञा ऐकून वीरभद्रला सातमजली हसावे वाटले. भैरव म्हणजे झाडावरचं माकड. त्याच्या सारख्या चपळ आणि सावध माणसाला उचलून घेऊन येणे केवळ अशक्य होतं.


©ई साहित्य प्रतिष्ठान

भैरव त्यांना घेऊन येणाऱ्या ड्रायव्हरशी गप्पा मारत होता. ड्रायव्हरलाही असा मोकळा बोलणारा माणूस बऱ्याच दिवसांनी भेटला होता. आश्रमात खूप लोक येत. पण ड्रायव्हरशी गप्पा कोण मारणार? गप्पा मारताना भैरवने खिशातून एक लोखंडाची चपटी डबी काढली तेव्हा ड्रायव्हरला आश्चर्य वाटले. त्याने डबी उघडून एक विडी स्वतःच्या तोंडात ठेवून डबी ड्रायव्हर पुढे धरली.

क्षणभर त्याच्या मनात चलबिचल झाली. 'आश्रमाच्या परिसरात विडी पिण्यास मनाई आहे. ' तो म्हणाला.

'आपण कुठे आश्रमाच्या परिसारात आहे? आपण खालच्या पातळीवर आहोत. आणि हा नियम बाहेरून येणाऱ्या साहेब लोकांसाठी. ते पाहीजे तेव्हा बाहेर जाऊन नाहीतर आपल्या खोलीत बसून धुम्रपान करतातच की. आपणच काय घोडं मारलं. घ्या हो. घ्याना. '

त्याने विडी स्वीकारली. डबी खिशात ठेवून भैरवने खिशातून दोन पांढरे दगड काढले. तेव्हा ड्रायव्हरने कुतुहलाने विचारले,

'काय आहे ते?'

'गारगोटी. '

'कशाला?'

'विडी चेतवायला. ' त्याने सावरीचा कापूस गुंढाळून दोन दगड एकमेकांवर घासले. त्यातून थिणगी निघाली आणि कापसाने पेट घेतला. भैरवने सराईतपणे आपली विडी शिलगावली. विस्तू त्याच्या पुढे धरला. तो इतका नवलाईने पहात राहीला की विडी पेटविण्याचे त्याला भान राहीले नाही.

मालकाची वाट पहात दोघांच्या गप्पा चांगल्या रंगात आल्या तेव्हढयात लिफ्टचा आवाज आला. तसा ड्रायव्हरने विडी हातने चुरगाळून खिशात कोंबली. बाबा आले. त्याने उतावीळ सुरात भैरवला विडी विझविण्याची सूचना दिली. तेव्हा भैरवने फक्त विडीचा हात पाठीमागे नेला.

तो वीरभद्र आणि विजया शिवाय कुणाची इतका आदर करत नसे.

लिफ्टमधून दोन गुलाबी पोशाखातले नोकर बाहेर आले. ते सरळ भैरवच्या दोन्ही बाजूस येऊन उभे राहीले. त्यांचे असे घेरून उभे राहणे भैरवला आवडले नाही. बदमाश असे केंव्हा उभे राहतात याची त्याला अनुभवाने माहीती होती.

'तुला तुझ्या मालकाने वर बोलावले. ' एक भसाड्या आवाजात म्हणाला.

'तुला माझ्या मालकाने पाठवले काय?' भैरवने संशयाने विचारले.

'होय. '

'मग येणार नाही. माझ्या मालकाचा हुकूम आहे. ते येई पर्यंत येथून हालू नकोस. मी येणार नाही. ' हटवादी सुरात भैरव म्हणाला.

'पण तुझ्या मालकांनीच तुला वर घेऊन येण्यासाठी आम्हाला पाठवले. '

'ए टकल्या, ' त्याच्या तुळतुळीत डोक्यावर हात फिरवून भैरव म्हणाला, 'एका माणसाला निरोप द्यायला दोन माणसांच काय काम? तुझ्या मालकाला जाऊन सांग. माझ्या मालकाच्या अंगाला धक्का जरी लागला तरी मी तुझ्या या लंकेला भस्म करून टाकील. मी असा गावरान छाप दिसतो म्हणून मला काय येडा समजला का?'

'तुमचा गैरसमज होतो आहे. खरोखरीच तुमच्या मालकानी तुम्हाला वर बोलावले. ' आपल्या रागावर ताबात ठेऊन तो बोलत होता. त्याच्या मालकाचा हुकूम नसता तर त्याने टकलावर हात फिरवल्याबद्दल भैरवला चोप दिला असता. 'वाटल्यास या बगारामला विचारा.'

शेजारच्या बगारामने मुंडी हालवली.

'तुम्ही काय म्हणा, माझ्या मालकानेही जागा सोडू नको म्हणून सांगितलं. ते येई पर्यंत मी इथून हालणार नाही. ' त्याने आडमुठेपणाने सांगितले.

त्या दोघांनी एकमेकांकडे पाहीले.

'तर मग आम्हाला तुला पकडून न्यावे लागणार. ' शेजारी उभ्या असलेल्या बगारामने भैरवच्या दंडाला पकडून म्हटले.

त्या दोघांच्या मनात काहीतरी कपट आहे हे भैरवच्या लक्षात आले होते. त्याला आपले मालक संकटात आहेत याची जाणिव झाली. यांच्या सोबत वर जाऊन आपणही त्यांच्या

सोबत कैद होणार त्यापेक्षा बाहेर राहून त्यांना मदत करता येईल. बाईसाहेबांशी संपर्क करता येईल मदत मागवता येईल.

भैरवने पाठीमागे लपलेली जळती विडी बगारामच्या हातावर टेकवली. चटका बसल्याने त्याने झटकन दंडावरचा हात मागे घेतला.

भैरवला तेव्हढा एक क्षण पुरेसा होता. दुसऱ्या क्षणी त्याने  पळायला सुरवात केली. त्या दोघांना काहीच सुचेना. बगाराम अजून चटका लागलेला हात झटकत होता.

'त्याला सोडलेस का मुर्खा?' पहीला ओरडला.

'तुझ्या हाताला असा चटका दिला असता तर तू काय त्याला मिठी मारली असती काय?'

'आता बोलण्यात वेळ घालवू नको. चल, पळ. पकड त्याला. तो हातून सुटला तर बाबा चामडी काढतील आपली. ' पहील्याने भैरवच्या मागे पळायला सुरवात केली.

'आपण वाहनात बसून जाऊ ना. ' ड्रायव्हरकडे पहात बगाराम म्हणाला. पुढे पळालेला रेंगाळला. त्याने ड्रायव्हरकडे पाहीले. ड्रायव्हरची या प्रकरणात पडण्याची इच्छा नव्हती.

'बॅटरीवर चालणारी गाडी आहे. ती काय माणसाच्या वेगाने पळणार?' ड्रायव्हर जागचाही हालला नाही.

त्याचे म्हणणे बरोबर होते. तो म्हणाला, 'बगाराम, वेळ घालवू नकोस. एव्हाना तो बराच लांब गेला असणार. तो हातून निसटला तर तू जबाबदार'

त्यांना भैरवची माहीती नव्हती. एव्हाना तो लांब नाही, नजरेच्या पार गेला होता. रानावनात आयुष्य काढलेला भैरव आश्रमाच्या मोकळया मैदानातून दाट झाडीत गेल्यावर कुणाला सांपडणार?

ते दोघे बाहेर आले तेव्हा भैरव त्यांना कुठेच दिसला नाही.

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

१२

वीरभद्रला आणि भानूला करकचून बांधल्यावर त्राहीशंकरला मनातून इतका आनंद झाला की तो  वेडयासारखा खदाखदा हसतच सुटला.

सोप्पं आहे. फार सोपं आहे. आपल्याला वाटतात तितक्या गोष्टी अवघड नसतात. 'भानू! बाबांच्या आरोपाला सिध्द करणारा शेवटचा साक्षीदार! हा माझ्या समोर बसलाय, खुर्चीवर जेरबंद होऊन. एकदा तिला गप्प केल की मग चालू दे  कोणत्याही कोर्टात केस. साक्षीदार कुठय?  कुणी साक्षीदारच नाही राहिला तर केस कसली उभी राहणार?' बाबांची निर्दोष सुटका होणार हे नक्की.

आपण वडीलाची सेवा करू शकलो याचे त्याला समाधान वाटले.

भानू सोबत या किरकिऱ्या पारश्यालाही तिच्या सोबत पाठवावे लागणार. त्याला इलाज नाही. खाली उभ्या असलेल्या त्याच्या नोकराला पकडला म्हणजे झाले. त्या तिघांना एकदमच... ... .

आज मगरी खुश होतील.

दरवाजा उघडून पहीला हस्तक आत आला. त्याच्या मागे बगाराम त्याला बाजूला सारून पुढे झाला. त्याचा श्वास फुलला होता, छाती धपापत होती तरीही तो बोलू लागला,

'माझी काही चुकी नाही. त्याने माझ्या हाताला चटका दिला. ह्या सखारामने त्याला जाऊ दिला. त्याच्यामागे पळण्या ऐवजी... . '

'गप्प बस! तुझा मुर्खपणा नडला. मी त्याच्या मागे धावत होतो. तुलाच गाडी हवी होती बसायला. '

ते दोघे एकमेकांना दोष देत होते.

त्यांच्या भांडणाचा अर्थ लक्षात येताच त्राहीशंकर ताड्कन उभा राहिला. वीरभद्र खदाखदा हसला. भानूच्या मुखावर स्मित झळकलं. भैरव पकडला जात नाही तोपर्यंत आपल्या जीवाला धोका नाही याची त्यांना खात्री होती.


©ई साहित्य प्रतिष्ठान

'तुम्ही दोघांनी त्याला पळून जाऊ दिले. दोघं मिळून एका माणसाला पकडणे तुम्हाला शक्य झालं नाही?' त्राहीशंकर पिसाळला.

'माणूस ? माकड आहे महाराज ते. माकड. इतका चपळ माणूस मी तरी पाहीला नाही. ' सखाराम आपली बाजू मांडत म्हणाला.

'बरोबर आहे त्याचं म्हणणं. वानरच आहे तो. त्राहीशंकर, आम्हाला मुकाटयाने सोड नाहीतर तुझ्या लंकेला आग लावील तो. 'वीरभद्र म्हणाला.

'हेच, हेच बोलला तो. माझ्या मालकाला सोडा नाही तर तुमच्या लंकेला आग लावील. महाराज तो माणूस बोलल्याप्रमाणे करील. '

त्राहीशंकरने बगारामच्या खाडकन मुस्काटात लगावली. त्याच्या डोळ्यांसमोर काजवे चमकले.

'नालायकांनो, एका साध्या माणसाला पकडता आलं नाही आणि मी पकडलेल्या दोन माणसांना सोडायला सांगता. '

'अरे बापरे... . पहा पहा... महाराज! समोरून धुराचे लोट दिसताहेत. त्या माणसानें आग लावायला सुरवात केलेली दिसते. ' काशीच्या आक्रस्ताळया आवाजाने त्राहीशंकर टेरेसवर गेला. त्याच्यामागे बगाराम, सखाराम धावले. वीरभद्रला दोरखंडाने बांधलेले असल्याने त्याच्यावर नजर ठेवणारे दोघेजण फाजील आत्मविश्वासाने आग पाहण्यासाठी टेरेसवर गेले. वीरभद्रला तेव्हढा वेळ पुरेसा होता. त्राहीशंकरशी बोलतानाच त्याची बोटं दोरीची गाठ सैलकरण्यात गुंतली होती. त्याला एकांत मिळताच उघडपणे हालचाल करुन त्याने आपली बंधनातून सुटका करुन घेतली. वीरभद्रने झटका देऊन हात मोकळे केले. भानू त्याच्याकडे आश्चर्याने पहातच राहीली. स्वतःचे पाय सोडवून त्याने भानूला मोकळे केले. हे सर्व त्याने इतक्या वेगाने व चपळाईने केले की, त्यांची सुटका व्हायला तीन मिनीटांपेक्षा कमी वेळ लागला.

'आश्चर्य करत बसू नको चल, पळ माझ्यासोबत. '

एका झेपेतच त्यांनी दरवाजा गाठला. बाहेरच्या पॅसेजमध्ये दोन पहारेकरी होते. आत महाराज आणि चार अंगरक्षक असताना कैदी सुटून बाहेर येतील असे त्यांना चुकूनही वाटले नव्हतं. त्या दोघांना असं अचानक बाहेर पाहून ते आश्चर्याने आ वासून पहात राहीले.

तेव्हढा एकच क्षण होता. ते भानावर येण्याआधी जवळच्या पहारेकऱ्याच्या हनुवटीवर वीरभद्रने आपला खास ठेवणीतला ठोसा लगावला. तो तोल जाऊन खाली पडला. त्याच वेळी प्रसंगावधान राखून तिकडे लक्ष न देता भानूने पळत जाऊन लिफ्टचा दरवाजा उघडला. त्या दोघांना पाहून दूरवर उभा असलेला पहारेकरी गोंधळला. त्याला कळेना आपल्या साथीदाराच्या मदतीला जावे की लिफ्टकडे धावणाऱ्या पोरीला पकडावे. त्याच्या गोंधळाचा फायदा घेत भानू ओरडली,

'वीरभद्र या. लिफ्ट उघडीच आहे. पळा. ' घाईने लिफ्टचे दार उघडून ती वीरभद्र करता थांबली.

वीरभद्र लिफ्ट जवळ आला तोवर दुसरा पहारेकरी लिफ्टच्या दिशेने येत होता. जवळ आल्यावर त्याच्या लक्षात आले वीरभद्र आपल्याला काहीतरी देण्यासाठी हात पुढे करतो आहे. नकळत त्या पहारेकऱ्याने हात पुढे केला वीरभद्रने आपली मिशी काढून त्याच्या हातावर ठेवली. तो चकित होऊन हातातल्या मिशीकडे पहात असतानाच वीरभद्र लिफ्टमध्ये शिरला व त्याने दरवाजा बंद करून लिफ्ट सुरु केली.

लिफ्ट खाली जाताना वीरभद्रने ओझरते पाहीले, तो पहारेकरी काय करावे ते न कळून जागीच नाचत होता. कॅरिडोरमधून येणारा गोंगाट टेरेसवरून आगीकडे स्तिमीत होऊन पहाणाऱ्या त्राहीशंकरच्या कानावर गेला. तो धांवत आत आला.

वीरभद्र आणि भानूच्या खुर्च्या रिकाम्या होत्या. ते पाहून त्याच्या मागून येणाऱ्या पहारेकऱ्यांच्या पायातले अवसान गेले. त्राहीशंकरचा क्रोध सगळयांना माहीत होता. आता आपली काही धडगत नाही. त्यांच्या उरात धडकी भरली.

कॅरिडोर मधले दोघे पहारेकरी आत आले. वीरभद्रने ज्याला ठोसा लगावला होता त्याचे दोन-तीन दात पडले होते. त्याच्या तोंडातून रक्त वहात होते. त्याला बोलाताही येत नव्हते. दुसरा पहारेकरी कसेबसे काय घडले ते सांगत होता, पण तो इतका उत्तेजित झाला होता की तो काय सांगतो ते कुणाच्याच लक्षात येत नव्हते.

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

हातातल्या पिस्तुलाने त्या सहाजणांना ठार करावे अशी  इच्छा त्राहीशंकरच्या मनात प्रबळ झाली. वेळ डोक शांत ठेवण्याची होती. नुसता आरडाओरडा करून संतुलन बिघडवून घेण्याचे कारण नव्हते. काय घडले ते नीट सांग. तो शांतपणे म्हणाला.

एकाला तर बोलता येत नव्हतं, बोलणारा शांत होऊन म्हणाला, ‘ते दोघ पळून गेले.
’

रिकाम्या खुर्चीच्या पायाशी दोऱ्या लोबकाळत होत्या.

त्यांच्यावर नजर ठेवणाऱ्या पहारेकऱ्यांकडे त्राहीशंकरने क्रुध्द नजरेन पाहीलं.

‘आम्हाला काय माहीत महाराज, आग दिसली म्हणून आम्ही तुमच्या सोबत बाहेर आलो. इतक्या थोडयावेळात त्यांना दोरी सोडली कशी? आणि हे होते ना पहाऱ्यावर बाहेर?’

त्राहीशंकरने बाहेरच्या दोघांकडे संशयाने पाहू लागला तसा तो म्हणाला, ‘ते सुटले तेव्हा आम्ही बाहेरच होतो. आमच्या पैकी कुणी आत आले नाही. आम्ही त्याला मदत केली असती तर त्यांना आम्हाला चोप दिला असता का?’ आपल्या जखमी साथीदाराकडे केविलवाणे पहात तो म्हणाला.

त्राहीशंकरला समजेना काय करावे? त्याचे लक्ष बोलणाऱ्याच्या हाताकडे गेले.

‘तुझ्या हातात काय आहे?’

‘मिशी, ’अजुन नकली मिशी आपल्या हातातच आहे याची त्याला जाणिव झाली. सांगताना त्याला विचित्र वाटत होतं, ‘त्या पारशी बाबाने त्याची मिशी काढून माझ्या हातात दिली. ‘खोटी मिशी आहे. ’

‘मिशीच नाही तो पारशीच खोटा आहे. ’त्राहीशंकर किंचाळला.

‘त्राहीशंकर आत या जरा. ’ काशी आतल्या भागात जात म्हणाली. तिने आपल्याला एकेरी नावने बोलावले याचा त्याला विसर पडला. तो एखाद्या आज्ञाधारक बालकासारखा आत गेला. ती कॉम्प्युटर स्क्रिनसमोर उभी होती.

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

‘आता आरडाओरडा करुन काही उपेग नाही. तुम्ही जरा थंड डोक्याने इचार करा. यक चुक तुम्हाला म्हागात पडन. ते नोकर हायती. त्येंची अक्कल बी त्यव्हढी ऱ्हाणार. ’हलक्या आवाजात ती बोलली.

‘मी काय करावं असं तुझं म्हणणं आहे?’ त्राहीशंकर नकळत बोलून गेला. तशी ती हसली. आता सूत्र आपल्या हातात आली याची तिला खात्री पटली.

‘सांगते. तुम्ही फक्त माझ्यामागे कंपुटरवर दिसन असं उभा ऱ्हा. ’ ती कॉम्प्युटर खुर्चीवर बसली.

तिने पटापट कमांड द्यायला सुरवात केली. प्रथम तिने सिक्युरिटी हेडला व्हीडीओ कॉल लावला. तो स्क्रीनवर येताच ती म्हणाली,

‘काय चाल्ल आश्रमात याची खबर हाये का तुम्हास्नी? आग कुठं लागली? धुर कसला येतो?’ तिचा आवाज हुकमी होता. गार्डला खुर्चीमागे उभे असलेला त्राहीशंकर दिसत होता. तेव्हा तिच्याशी उध्दटपणे बोलण्याची त्याची हिम्मत झाली नाही.

‘गवत पेटवलं कुणी तरी ... . . ’

‘मुर्ख, ’ त्याला पुढे बोलू न देता ती ओरडली, ‘कसली सुरक्षा ठेवता म्हणायची तुम्ही? बाबांचे दुष्मन आत आले तरी तुम्हास्नी खबर नाही. ताबडतोब यक काम करा, आश्रमातील भाईरच्यांना इथून जायला सांगा. सांगा तेंना, आश्रमात बॉम्ब ठेवल्याची अफवा आहे. सुरक्षें करता आश्रम खाली करा. ’

त्याने आश्चर्याने त्राहीशंकरकडे पाहीले.

‘म्हाराजाकडं पाहू नकोस. त्यांच्या समोरच तुला आज्ञा देते. ’तिने त्याच्याकडे पाहल्यावर त्राहीशंकरने मान हालवली. त्याला अजूनही काय चालले ते काही कळत नव्हते.

‘तासाभरात आश्रम रिकामा करुन घ्या. समद्या विभागाच्या सुरक्षाप्रमुखाना आणि रक्षकांना घेऊन पंचकमळमहालावर या. पाचव्या मजल्यावर तुम्ही विभाग प्रमुखांना घेऊन या. तेथे तुम्हाला पुढच्या सुचना मिळतील. ’

‘ठीक आहे मॅडम. ’ त्याने नकळत काशीला सॅल्युट मारला.

‘आणि हो. मॅनेजमेंट स्टाफला महालाच्या पहील्या माळयावर येकत्र करुन ठेवा. कुणी भायेर ऱ्हाता कामा नये. येळ आली तर गोळीबार पन करावा लागन. ’

‘गोळीबार! मॅडम, पोलिसांना इन्फॉर्म करायच का?’

‘तुम्हाला सांगितलं तेव्हढं करा. जास्त् डोकं वापरू नका. ’तिने खडसावलं.

त्याने ठीक आहे मॅडम म्हणायच्या आधी तिने कॅमेरा बंद केला. नंतर तिने लोकल पोलिसांना फोन लावला.

‘नमस्ते पोलिसस्टेशन, मी आश्रमातून बोलते. आमच्या आश्रमात काही समाजकंटक घुसल्याचे निदर्शनास आले. नाही... नाही... सध्या आम्ही आमच्या सिक्युरिटी कडून त्यांना शांततेने बाहेर काढण्याचा प्रयत्न करतो. जर जमलं नाही तर तुम्हाला फोन करू तेव्हा मात्र धावून या. कृपया मिडियाला दूर ठेवा. धन्यवाद. ’

‘काशी, तू आहेस तरी कोण?’ तिच्या नव्या स्वरुपाला पाहून त्राहीशंकरने गोधळून विचारले.

‘मी? मी काशी. तुमची भक्त हाय. ’गोड आवाजात ती म्हणाली. त्राहीशंकरला आश्चर्य वाटले. आत्ता ओरडणारी आणि आज्ञा सोडणारी काशी हीच होती कां?

‘तुझे गावरान रुप पाहून वाटत नाही. तुला कसं येतं कॉम्प्युटर चालवायला?’

‘त्यात काय हाय? मिशिन हाय ते. मिशिन चालवाया अन् हुकुमत गाजवायला काय अक्कल लागते?’

तिचं म्हणणं बरोबर वाटलं. ‘ पुढे काय करायचा विचार आहे?’

‘आश्रम रिकामा झाला की रिकामखंडया स्टाफला तळमजल्यावर बंद करून ठेवा. सिक्युरिटीला हत्यार घेऊन आश्रमाच्या परिसरात पाठवा त्या तिघांना शोधायला. सगळया बाप्या माणसाला जाऊ द्या. पण लक्षात ठेवा त्यांना ठार मारण्याचा हुकूम देऊ नका. त्यांना जिवंत पकडून आणायला सांगा. ’

‘का?’

‘त्येंना काय माहीती आहे? ते कुणाला सांगून इथं आले का?’ समदी माहीती घेऊन मग ठरवू . ’ ती म्हणाली.

तिने सूत्र हातात घेतल्या पासून त्राहीशंकरला तिच्या सगळया गोष्टी पटू लागल्या.

‘चुकून काही बरंवाईट झालं तर पोलिसांना सांगीतलेलं आहेच. आपल्यावर संशय येणार नाही. ’ त्राहीशंकरला वाटले अगदी बरोबर. आपल्यालाही ह्या गोष्टी कळल्या नसत्या. काशी तिचा प्रश्न सोडवायला आली की आपला?

‘पंचकमळमहालाचे रस्ते वर ओढून घ्या. तुमच्या सुरक्षेसाठी वाटल्यास दोन रक्षक ठेवा बाकीच्यांना धुंडाळायला घ्यायला पाठवून द्या. ’

‘काशी, ’ त्याने तिच्या पाठीवर हात ठेवला. ‘हे सगळे प्रकरण आटोपल्यावर मी तुला विषेश बक्षिस देईल. ’

‘माझा नवरा सुखरुप परत मिळाला हेच माझे बक्षिस. ’ काशी म्हणाली.


©ई साहित्य प्रतिष्ठान

## १३

।

वीरभद्र आणि भानू एकमेकांचा हात धरून पळत सुटले. त्यांच्या पळण्याकडे कुणाचे लक्ष गेले नाही. त्यांना धाप लागली तेव्हा ते एका झाडाचा आडोसा पाहून दम घ्यायला थांबले. आपला पाठलाग होत नाही याची वीरभद्रने खात्री केली.

भानूचा ऊर धपापत होता. चेहऱ्यावर घामाचे बिंदू चमकत होते. तिच्याकडे पाहून वीरभद्र किंचित हसला. ‘तू आमच्या सोबत यायला नको होतं. तुझ्या नाजुक शरीराला हे झेपणार नाही. ’

‘पण मजा येते आहे. ’ तिने वरच्या दातानी खालचा ओठ दाबला. ‘आता पुढे आपण काय करायचं? हा भैरव आपल्याला भेटणार तरी कुठे?’ ती आकाशात जाणाऱ्या चार धुराच्या लोटांकडे पहात म्हणाली, ‘हा तर आग लावत सुटला. आश्रम पेटायचा. ’

‘घाबरू नकोस. भैरव हुषार आहे. तो कोणत्या भागात आहे याचा इशारा देतो आहे. पण आग लावल्यावर त्याला जास्त वेळ तेथे थांबता येत नाही. म्हणून तोतिथून पळतो आणि नव्या ठिकाणी आग लावतो. ते बघ, पुन्हा आग लागली. या क्षणी तो जुन्या आश्रमाच्या परिसरात आहे. चल आपण त्याला संदेश देऊ. ’

एव्हढे बोलून वीरभद्रने तोंडात बोट घालून एक विशिष्ट प्रकारची शिळ घातली. दुरून ऐकणाऱ्याला तो एखाद्या पक्षाचा आवाज वाटला असता. जरा वेळ शांतता पसरली. वीरभद्रचा इशारा त्याला समजला की नाही कुणास ठाऊक ? वीरभद्रने पुन्हा शिळ घालण्याआधी त्याच्या कानावर कोकीळेचा आवाज आला. वीरभद्रच्या चेहऱ्यावर समाधान दिसले. त्याने पुन्हा सांकेतिक शिळ घातली, व भानूकडे वळून म्हणाला,


©ई साहित्य प्रतिष्ठान

'चल भैरवला मी आपल्यासाठी थांबावयला सांगितलं. ' सावधपणे, सावकाश त्यांनी जुन्या आश्रमाच्या दिशेने चालायला सुरवात केली.

जुना आश्रम दाट झाडांच्या गर्दीत दडला होता. मधूनच दिसणाऱ्या त्याच्या आकृतिकडे पाहून तिथे घडलेल्या अभद्र प्रसंगाच्या आठवणीने भानू शहारली.

अनेक माणसांचा आपसात बोलण्याचा आवाज आला. एक घोळका त्यांच्या दिशेने येत होता. ते चपळाईने एका झाडाच्या मागे सरकले. घोळक्यातली माणसं आपसात मोठयाने बोलत येत होते. त्यांच्या पोशाखावरून ते तिथले कामगार किंवा स्वयंसेवक दिसत होते. त्यांच्या चालण्यात घाई होती.

त्याच वेळी खालच्या रस्त्यावरून एक बॅटरीवाहन येऊन थांबले. ड्रायव्हरच्या शेजारी हातात भोंगा घेऊन बसलेला माणूस वाहन थांबताच बोलू लागला.

'लक्ष द्या! लक्ष द्या! माझा आवाज ऐकणाऱ्या बंधु भगिनींनो, आपणास तोबडतोब पंचकमळमहालाच्या पहील्या मजल्यावर जमा होण्याची बाबांची आज्ञा आहे. हा संदेश वाटेत दिसणाऱ्याला पण कळविणे हो. '

उत्तरादाखल रस्त्याने जाणाऱ्या जथ्याने त्यांच्याकडे पाहून हात हालवला. थांबलेले माणसं आणि वाहन आपापल्या दिशेने निघुन गेली.

त्राहीशंकरने सगळयां माणसांना एकत्र का जमविले असेल? माणसं गेलेल्या दिशेने पहात वीरभद्र विचार करु लागला. त्याची काय योजना असावी? अर्थात् वीरभद्र त्याची काळजी करीत नव्हता. भैरव त्याला भेटल्यावर त्याचे अर्धे बळ परत मिळणार. जर विजयाशी संपर्क करु शकलो तर किती बरे होईल.

त्राहीशंकरचा काहीही डाव असू दे. वीरभद्रची योजना तयार होती. परिस्थितीप्रमाणे तो कोणत्याही क्षणी त्यात बदल करू शकत होता. दुष्मनावर मात करण्याची त्याची ही धक्कातंत्र पध्दत आजपर्यंत कधी वाया गेली नव्हती.

'तू जरा येथेच थांब. ' भानूला सांगून त्याने झाडावर चढायला सुरवात केली. हा शहरी जेंटलमन इतका सराईतपणे झाडावर चढतो याचे भानूला आश्चर्य वाटले. वीरभद्रने

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

झाडाच्या शेंडयावर जाऊन आश्रमाच्या परिसरात चौफेर नजर फिरवली. जुन्या आश्रमाचा परिसर आधीच उंचीवर असल्याने तो दूरवरचे पाहू शकत होता.

त्याने पंचकमळमहाला कडे नजर टाकली . महालासमोर माणसांचा घोळका जमलेला दिसत होता. त्यांच्या हातात बॅगा व सामान दिसत होते. काहीजण पायीच मुख्यदाराच्या दिशेने चालले होते तर काहीजण वाहनात दाटीवाटीने बसुन जाताना दिसत होते. 'काय गडबड चालू आहे?' तो स्वताःशी म्हणाला. त्याने आश्रमाच्या मुख्य दरवाजाकडे नजर फिरवली. तेथेही गोंधळ उडालेला दिसत होता. फाटकातून बाहेर जाण्यासाठी मोटारीची रांग दिसत होती.

त्राहीशंकर बाहेरच्या माणसांना घालवून देतो आणि आपल्या माणसांना गोळा करतो याचा अर्थ तो आपल्याला शोधण्याचे कठोर प्रयत्न करणार आहे. कदाचित् तो आपल्याला दिसता क्षणी ठार मारण्याचे आदेशही देईल. आपल्या शिकारीला कुणी साक्षीदार नसावा म्हणून तो बाहेरच्या लोकांना घालवून देत आहे.

वीरभद्र आनंदी झाला. हे बरं झालं. आता झुंज आपल्या दोघातच आहे त्राहीशंकर, स्वतःला सांभाळ. वीरभद्रला स्वतःची किंवा भैरवची काळजी नव्हती. त्याला भानूची चिंता वाटत होती. तिला हा सगळा प्रकार सवयीचा नव्हता.

'भानू, त्याने तर आपल्याला ठार मारण्याची तयारी सुरू केली. ' खाली उतरून तो तिला म्हणाला, 'आता आपण काय करायचं?'

'लढायचं. तुम्ही घाबरलात की काय?'

तिच्या बोलण्यावर तो मोठयाने हसला.

'मी तुझा विचार करत होतो भानू. बाहेरच्या मंडळीना आश्रम सोडण्यास सांगण्यात आलेलं दिसतं. बाहेर पडण्यासाठी झुंबड उडालेली दिसते. त्याच्या फायदा घेऊन तू निसटून जा.'

'आता मात्र तुम्ही काहीतरीच बोलता आहात हं वीरभद्र. मी तुम्हाला अजिबात सोडून जाणार नाही. त्याबद्दल तुम्ही मला पुन्हा विचारु नये हेच बरं. माझी तुम्हाला अडचण वाटत असेल तर मी माझी एकटी वेगळया मार्गाने जाते कशी. '

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

'जाऊ दे भानू. मला तुझी काळजी वाटते म्हणून म्हणालो. तू स्वखुशीने धोका पत्करणार असलीस तर मला तुझा अभिमान वाटेल. चल, आपण मिळून त्या त्राहीशंकरला त्राहीभगवान करू या. पण थांब. कुणाची तरी चाहूल येते. जरा आडोश्याला ये. '

झुडपाच्या मागे लपून त्यांना येणाऱ्याचा अंदाज घेतला. पण पुन्हा त्यांना चाहूल लागली नाही. वीरभद्रने कानोसा घेत शिळ घातली, तसा शेजारच्या झुडपातून भैरव कोकीळेचा आवाज काढत उभा राहीला. वीरभद्रला पाहून झालेला आनंद त्याच्या चेहऱ्यावर लपत नव्हता. तो धावत पुढे आला.

'शाब्बास भैरव. मी शिकवलेल्या युक्त्या तू बरोबर अंगिकारल्या. पण गडया, भाद्रपद उलटून गेल्यावर कोकीळा ओरडत नाही हे कुणाच्या लक्षात आले नाही म्हणून ठीक झाले. '

त्याचं बोलणं ऐकून तिघं हसले.

'आता मी काय सांगतो ते लक्षपुर्वक ऐका. त्राहीशंकरने आपल्या आश्रमातल्या पाहूण्यांना बाहेर पाठवून दिले. त्याच्या इतर कर्मचाऱ्यांना त्यांनी एकत्र बोलवले आहे. यावरून तो काही ठराविक, क्रुर, शिकारी वृत्तीच्या बदमाशांना आपल्या शोधासाठी पाठवणार असा माझा अंदाज आहे. ते आपल्याला कैद करतील किंवा दिसता क्षणी ठार मारतील. तेव्हा आपण सावध राहयला हवं. '

दोघांची प्रतिक्रिया पाहण्यासाठी तो क्षणभर थांबला. ते उत्साहाने त्याचं बोलणं ऐकत होते. समाधानाने तो पुढे बोलू लागला.

'दुसरी गोष्ट, त्यांच्या पासून जीव वाचवत असताना आपण येथला परिसर तपासणार आहोत. त्याच्या विरूध्द काही पुरावा मिळतो काय याचा शोघ घेणार आहोत. '

'भैरव, तू आणि भानू इकडचा भाग पिंजून काढा. सुरवात त्याच्या जुन्या आश्रमापासून करा. तेथे काही मिळेल असा माझा कयास आहे. भैरव, तू भानूने सांगितल्या शिवाय काही करायचे नाही. आणि भानू, तू कुठल्याही परिस्थितीत भैरवला सोडायचे नाही. ' दोघानी मान हालवली. 'काळजी घ्या. '

'आणि तुम्हा कुठं निघाला?' भानूने विचारले.

'मी? मी चाललो पुन्हा पंचकमळमहालात. '

'कशाला?'

'त्राहीशंकरला भेटायला. त्याला मी तसाच सोडेल असे वाटले काय तुला?'

II

भैरवला व भानूला सोडून वीरभद्र मोठया वेगाने पंचकमळमहालाकडे निघाला. आपण कुणाच्या नजरेस पडू याची त्याला चिंता वाटत नव्हती. कारण त्याला त्राहीशंकरच्या महालात जायचेच होते. तो पकडला गेला असता तरी त्याला त्याच्या महालातच नेले असते. पण धावपळीत त्याच्याकडे कुणाचे लक्ष नव्हते.

तो महालाच्या जवळ पोहचला तेव्हा त्याला नवल वाटले. आसपास कुणीच दिसत नव्हते. पंचकमळमहालाच्या परिसरात मोठी गडबड उडाली होती. बाहेरचे लोक निघून गेले होते. पहील्या मजल्यावर आश्रमाच्या व्यवस्थापनात भाग घेणारा कर्मचारी वर्ग जमा झाला होता. गोंधळात कुणाला काही समजत नव्हते.

इतक्यात त्याच्या कानावर भोंग्याचा आवाज आला. सकाळी त्याने तो आवाज ऐकला होता. त्याचा अर्थ कमळदल उचलले जाणार होते. वीरभद्रला समजेना येण्या जाण्याचा मार्ग बंद करण्यामागे त्यांचा काय हेतू असावा. पण दार बंद होण्या आधी पलिकडे जाणे आवश्यक होते.  गोंधळ इतका होता की त्याचा फायदा आपल्याला नक्की होईल याची वीरभद्रला खात्री होती.

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

त्याने पळायला सुरवात केली. पण उशीर झालाच होता. आपण इकडेच अडकतोय की काय? त्याला भीती वाटली. त्याने वेगाने पळायला सुरवात केली. एव्हाना कमळदळ बरेच उचलले गेले. झाले. आता आपण खंदकाच्या अलिकडेच अडकणार अशी भीती त्याला वाटली.

आपण जर इकडे अडकलो तर... . .

त्याने वेगाने धावायला सुरवात केली. पाया खालील जमिन संपताच त्याने सावकाश वर उचलल्या जाणाऱ्या आणि हळूहळू दूर होणाऱ्या पुलाला पकडण्यासाठी एखाद्या चित्त्याप्रमाणे उडी घेतली.

उडी चुकली किंवा पुलाचा भाग हाताला नाही लागला तर वीरभद्र सरळ भक्ष्याची वाट पहाणाऱ्या मगरींच्या जबडयात पडणार होता. त्याचा आत्मविश्वास इतका प्रबळ होता की आपली उडी चुकेल अशी जराही शंका त्याला आली नाही.

त्याने वर सरकणाऱ्या पुलाच्या दिशेने झेप घेतली. वीरभद्र कधीही हरला नाही. शेवटच्या क्षणी पुलाच्या रॉड त्याच्या हाताला लागला. आणि तो उचलल्या जाणाऱ्या पुलासोबत धिम्यागतीने पंचकमळमहालाच्या दिशेने सरकू लागला.

चारही पाकळया मिटून स्थिर झाल्या. पंचकमळमहालाचा जगाशी संपर्क तुटला. वीरभद्रने पलिकडे जाण्यासाठी पुलावरून सावकाश उतरायला सुरुवात केली.

III

‘फाटकाला कुलुप आहे. ’

भानू हलक्या आवाजात बोलली. खरंतर हलक्या आवाजात बोलवं असं त्यांना काही आढळलं नाही. भानूच्या मनावर पुर्वी घडलेल्या घटनाचा प्रभाव असल्याने तिच्या मनावर दडपण आलं होतं.

वीरभद्र त्यांना सोडून गेल्यावर त्याच्या सांगण्याप्रमाणे ते जुन्या आश्रमाच्या दिशेने निघाले. कदाचित् सिक्युरिटीचे सर्व लोक तिथून महालाकडे गेले असल्याने त्यांना अडवणारे कुणी भेटले नाही. तरीही गाफील न राहता ते फाटकापर्यंत येऊन पोहचले.

फाटकापासून एक कार जाईल एव्हढा मोठा रस्ता इमारतीच्या पोर्चपर्यंत जात होता. सभोवार दाट झाडी असल्याने इमारतीचा काही भाग झाकला गेला होता. भानूने सर्वत्र नजर फिरवली. कुणाचीही चाहूल लागली नाही. फक्त पाखरांची किलबील ऐकू येत होती. माणसाचा वावर दिसत नव्हता. त्यांनी दोन मिनिटे झुडूपाच्या आडोश्याला बसून कानोसा घेतला. तिने भैरवकडे पाहीले. तो कसल्याश्या विचारत गढून गेला होता. आपण सांगितल्या शिवाय तो पुढे सरकणार नाही. वीरभद्रने त्याला तशी सुचनाच दिलेली आहे.

‘चल कुंपणा वरून जावं लागेल. ’ दहा फूट उंचीच्या लोखंडी फाटकाकडे पाहत ती म्हणाली. ती नुसती बोलून थांबली नाही तर ती कुंपणाच्या दिशेने निघाली सुध्दा.

‘थांब. ’ त्याच्या आवाजात चेतावणी होती. तिचे पाय आपसूक थांबले.

‘का?’

‘आत बघितलंस, पाखरांनी तोडलेले किती फळ खाली पडलेले आहेत? पाखरांचा आवाज येतो पण जमिनीवर धावणारे प्राणी दिसत नाही. वाटेत मला सरडे, खार वगैरे प्राणी दिसले. इथे मात्र दिसत नाही. ’

‘मग त्याचे काय?’ तिला त्याचे म्हणणे कळाले नाही.

‘माहीत नाही. पण असे का?’

या प्रश्नाचे उत्तर तिला माहीत नव्हते. ती त्याच्याकडे पाहू लागली.

‘तू माझ्या मागे ये. ’ ती त्याच्या मागेच होती. तो कुंपणा जवळ जाऊन काहीतरी शोधू लागला. दहा पाऊले दोन्ही बाजूला फिरल्यावर हातात एक मेलेला प्राणी घेऊन तो भानू जवळ आला.

‘बघितलंस, हा रानउंदीर विजेचा धक्का लागून मेला. या कुंपणाच्या तारेत विजेचा प्रवाह वाहत असला पाहीजे. त्याने हातातला उंदीर हलकेच तारेवर सोडला. दुसऱ्या क्षणी तो

फेकला गेला. ' भानूचे अंग शहारले. भैरव नसता तर तिच्या उताविळेपणामुळे तिला शॉक लागला असता.

'आता काय करायचं?'

'माझ्या मागे चल. '

त्यांनी कुंपणाच्या भोवती फेरी मारायला सुरवात केली. शेवटी एका झाडाकडे समाधानाने पहात त्याने भानूला विचारले,

'तुला झाडावर चढता येईल की मला तुला उचलून घ्यावे लागेल?'

'आधी मी चढते. पडलेच तर तु सांभाळ' तिने पायताण  काढून फाटकातून आत फेकली, आणि  झाडावर चढायला सुरवात केली. तिला सवय नसल्याने थोडा त्रास झाला, एक-दोन ठिकाणी खरचटले पण ती हव्या त्या फांदी पर्यंत पोहचली.

'आता?' तिने मागून येणाऱ्या  भैरवला विचारले.

'आता हर हर महादेव! मार खाली उडी. ' एव्हढे बोलून त्याने फांदीला लोबकाळून फांदी सोडून दिली.

'शाब्बास!' त्याच्या पाठोपाठ उडी मारलेल्या भानूला तो कौतुकाने म्हणाला.

दबल्या पावलांनी ते दरवाजा जवळ गेले. आश्रमाच्या मुख्य दाराला लॅच होते.

'दाराला कुलूप आहे. ' भानू पुन्हा भैरवला म्हणाली. त्याने मानेने तिला बाजूला व्हायला सांगितले. खिशातून बोटभर लांबीची तार काढून लॅचमध्ये घुसवली. साधारण दोन मिनिटाच्या प्रयत्ना नंतर त्याने हॅंडल फिरवून दरवाजा उघडला.

दरवाजा उघडत असताना भानूचा श्वास रोखला गेला. दरवाजा उघडल्यावर आपल्याला त्या दिवसाचंदृष्य दिसेल अशी तिला भीती वाटली. दरवाजा शांतपणे उघडला पण काहीच घडले नाही. आतल्या थंड, अंधारलेल्या शांततेत त्यांनी प्रवेश केला व आपल्या मागे दार बंद करून घेतले.


©ई साहित्य प्रतिष्ठान

'आता आपण काही सापडते का याचा तपास घेऊ. ' ती म्हणाली. 'तू उजव्या बाजूला जा मी डावी कडून सुरवात करते. '

भैरव वीरभद्रच्या तालमीत तयार झालेला असल्याने त्याला ह्या कामाचा चांगलाच अनुभव होता. तो वेगाने कामाला लागला.

भानू मात्र नवशिक्याप्रमाणे काम करीत होती. तिला प्रत्येक गोष्टीत नाविन्य वाटत असल्याने ती प्रत्येक गोष्ट काळजीपुर्वक हातळून पाहत होती. तपास करत ती बळीवेदी जवळ आली. भक्ताच्या मनोकामना पुर्ण व्हाव्यात म्हणून जटाशंकर जिथे यज्ञ करीत असे, ते यज्ञकुंड त्याच्या समोरच होते. बळीवेदीवरील जनावराच्या रक्ताचे डाग आता काळपट झाले होते. जनावराच्याच रक्ताचे की... ... ? पुढच्या विचाराने तिचे अंग शहारले. तिने काळजीपुर्वक बळीवेदीचे निरीक्षण करायला सुरवात केली.

जर ह्याच्या वरील रक्ताचा नमुना तपासणीला पाठवला तर मानवी रक्ताचे अंश मिळतील? तिला त्याबद्दल काही माहीती नव्हती. टी व्ही सिरियलमध्ये अशा प्रकारे दाखवले जाते तेव्हढे तिला माहीत होते. बळीवेदीला दोन्ही बाजूने दोन जाडसर पितळेचे डरकाळी फोडणारे सिंहमुख बसवलेले होते. त्याच्या मुखात हात घालून पाहिले. त्याच्या तिक्ष्ण आणि टणक दातांचा स्पर्श झाला. तशाही परिस्थितीत तिने त्याच्या कारगीरीची प्रसंशा केली.

'भानू!' आवाजाने तिची तंद्री भंगली. ती काहीशी दचकली. तिचा हात सिंहाच्या मुखातून  काढताना सिंहमुखाला झटका बसला तेव्हा सिंहमुख हालल्या सारखे वाटले.

'भानू, येथे फार काही महत्वाचे  दिसत नाही. ' जवळ आलेला भैरव म्हणाला.

'हं' ती म्हणाली पण तिचे त्याच्याकडे लक्ष नव्हते. ती अजून सिंहमुखाशी खेळत होती. तिने ते हालवून पाहिले. पण ते घट्ट असल्याने जराही हालत नव्हते. त्याला धरून तिने वर उचलले. तरीही ते हालले नाही. तिला नवल वाटले. तोंडातून हात काढताना बसलेल्या झटक्याने सिंहमुख हालले होते. नक्की.

तिने पुन्हा सिंहमुख हालवले. ते डाव्या बाजूने जरा सरकले. ती काय करते याची भैरवला कल्पना आली. त्याने दुसऱ्या बाजूच्या सिंहमुखावर हात ठेऊन तिला फिरवायला मदत केली. तेव्हा वेदी चक्राकार फिरली. पण काहीच घडले नाही. त्याच्या काय परिणाम होतो?

विनकारण ही वेदी फिरणार नाही. त्यांनी पुन्हा एक चक्र पुर्ण केले तरीही त्यांच्या काही बदल आढळला नाही.

‘भैरव तू हे चक्र फिरव मी एकवार बारकाईने निरिक्षण करते. मी स्वतः चाक फिरविण्यात गुंतल्याने मला काही कळत नाही. ’ ती बाजूला ऊभी राहून संपूर्ण हॉलचे निरिक्षण करू लागली.

‘हं. आता हळूहळू चक्रकार फिरव. ’भैरवने बळीवेदी फिरवायला सुरवात केली. पण तिला त्याचा कसलाही परिणाम जाणवला नाही. ती नजर फिरवत हॉलभर फिरू लागली.

‘पडशील, खाली बघ. ’भैरव जागेवरून ओरडला. तिची फिरणारी पावलं जागीच थांबली. तिने खाली पाहीले. यज्ञवेदी जागेवरून सरकून फट तयार झाली होती.

‘येस!’ ती आनंदाने ओरडली. भैरव ते फिरव येथे फट तयार होते आहे.

भैरव जसा तो दांडा फिरवू लागला तशी फट मोठी होऊन यज्ञवेदी पूर्ण बाजूला सरकली.

‘खाली उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. ती म्हणाली. ’ काय करू? उतरू?’ तिने उत्तेजीत होऊन विचारले.

‘थांब. मी पुढे होणार. ’ तिला मागे सारून तो म्हणाला, ‘ तू सावकाश माझ्या मागे ये आणि हो, पुढे सरकत असताना मागचा कानोसा घेत रहायचा. ’

तिने भैरवच्या खांद्यावर हात ठेवला आणि त्यांनी सावधपणे पायऱ्या उतरायला सुरूवात केली.

IV

पंचकमळमहाल्याच्या पाचव्या मजल्यावर अंगरक्षकांचे प्रमुख, सिक्युरिटीचा संचालक व इतर विभाग प्रमुखाची बैठक संपत आली होती. बाबा जटाशंकरच्या सिंहासनावर त्राहीशंकर विराजमान झालेला होता. त्याच्या बाजूला उभं राहून समोरच्या खुर्चीवर बसलेल्यांना काशीने परिस्थितीची जाणिव करुन दिली. ज्याअर्थी आश्रमात तीन माणसं हत्यार घेऊन प्रवेश करतात. इथं दोरीने बांधलेली माणसे डोळयासमोर बंधमुक्त होऊन पळून जातात, त्या अर्थी तुमच्या सुरक्षारक्षकां पैकी कुणीतरी त्यांना मिळालेला आहे. ती म्हणाली.

त्राहीशंकरला वाटले, ‘आपल्याही ध्यानात हा मुद्दा आला नव्हता. ’ त्याने कौतुकाने काशीकडे पाहीले. आपल्या अडचणीच्या वेळी देवानेच हिला आपल्या मदतीला पाठवले.

‘त्यो कोण हाये, ते शोधत बसण्याची ही येळ नाही. ह्या प्रकरणातून बाहेर पडल्यावर आपण त्याला बी शोधुन काढू आन शिक्षा बी द्यु. त्यो आत्ताच स्वतः होऊन पुढे आला तर त्याचा निसुगाईन इचार केला जाईल. ’

‘ठीक हाय. ’ जरा वेळ थांबुन तिने बोलायला सुरवात केली. पुढची पाच मिनिटे ती एकटीच बोलत होती. बोलणं संपल्यावर तिने विचारले,

‘समजलं?’ उपस्थितांनी माना डोलावल्या. ‘ठीक हाय. महाराजाच्या सुरक्षेसाठी पायजे तेव्हढे माणसं ठेऊन बाकीचे समदी तपासाला घेऊन जा. आणि ध्यानात ठेवा, तुम्हाला त्यांना जिवंत पकडायचं. येकालाही इजा होता कामा नये. ’

तिचा हा आदेश त्राहीशंकरला पटला नाही. पण तो काही बोलला नाही. आपल्या संरक्षणासाठी वाटल्यास माणसे ठेवण्यास सांगणेही पटले नाही. जर पुल उचलले गेले तर खंदक पार करुन कोण येणार आपल्यावर हल्ला करायला? ह्या काशीला येथे अनोळखी असून तिला भीती वाटत नाही आणि आपण पुरूष असून... . ’

'माझ्या सुरक्षेसाठी कुणाला ठेवण्याची गरज नाही. ' त्यानी उजवी तर्जनी आभाळातल्या ईश्वराकडे निर्देश करून दाखवली. 'कळले?' त्यानी मुख्य अंगरक्षकाकडे पाहीले. त्याने मान हालवली. 'खंदका वरील पुल उचलून घ्या. या. '

त्राहीशंकरने हात उचलून आज्ञा दिली. मिटींग संपल्याचा इशारा समजून ते उठले.

'लिफ्टने खाली जा. ' महारांजानी त्यांना परवानगी दिली.

ते गेल्यावर हॉलमध्ये ते दोघेच उरले.

सिक्युरिटी गार्डचा प्रमुख स्वतः कॅप्टन म्हणवून घेत असे. त्याला सैन्यात कॅप्टन व्हायची फार इच्छा होती. त्याचे सिलेक्शनही झाले होते. पण त्याच्या ट्रेनिंगच्या काळातच गैरवर्तणूकीबद्दल त्याची सैन्यातून हाकलपट्टी झाली होती.

सैन्यातली कॅप्टनशिप गेली तरी त्याच्या मागे कॅप्टन ही उपाधी कायम राहीली. त्याला ती आवडतही असे. कॅप्टन बुध्दिने अतिशय चाणाक्ष होता. त्याची कल्पनाशक्ती चांगली होती. एखाद्या गोष्टीचा काय परिणाम होईल याचा त्याला लवकर अंदाज येई. त्याचे गुण हेरूनच जटाशंकरने त्याला आश्रमाचा सुरक्षा प्रमुख म्हणून नेमले होते.

मिटींगमध्ये जरी त्राहीशंकरने आपल्याला सुरक्षा रक्षक नको असे म्हटले असले तरी शोध कार्यात एका माणसाने फार काही फरक पडणार नव्हता. एका तगडया आणि चपळ गार्डला बोलावून सांगितले,


©ई साहित्य प्रतिष्ठान

‘महाराज काशी सोबत एकटेच आहेत. तेंव्हा तू आसपास आहेस हे महाराजांना कळले नाही तर चांगले. ’ सुचक नजरेनं त्याच्याकडे पाहात कॅप्टन म्हणाला. त्याचा अर्थ कळल्याप्रमाणे गार्डने मान डोलावली. ‘नुसती नजर ठेऊन रहा. तशी वेळ आल्या शिवाय अँक्शन घ्यायची गरज नाही. ’

हुकूमाप्रमाणे तो जीन्याच्या मार्गाने पाचव्या मजल्यावर गेला, पण आत न जाता जिन्यातच  कॅरिडॉवर पाळत ठेऊन सावधान उभा राहीला.

१४

।

हॉलमध्ये ते दोघेच उरले.

त्राहीशंकर थकून सिंहासनावर बसला. त्या तिघांना शोधायला गेलली माणसं परत येत नाही तो पर्यंत तरी काही करता येण्यासारखं नव्हतं. निःश्वास सोडून तो म्हणाला,

'काशी, तू खरी कोण आहेस? तू दिसतेस तशी गावरान नक्की नाही. ' त्याने कुतुहलाने तिच्याकडे पाहीले. त्याच्या आवाजात संशय होता.

'मी ? मी तुम्हाला खरं तेच सांगितलं. माझा नवरा एका तरूण मुली बरोबर मला एकटीला टाकून गेला. तुमच्या कुण्या भक्ताने मला सांगितलं, तो मला इथंच भेटल. त्याच्यावर विश्वास ठेऊन मोठया आशेने मी आले. पण हा काय प्रकार आहे? कोण आहेत ती तीन माणसं?'

'ते दोघं कोण आहेत ते मला माहीत नाही. त्याने आपले नाव मिश्किल माडीवाले सांगितले होते. पण तो तोतया निघाला. ती पोरगी बाबांच्या प्रकरणातली साक्षीदार आहे. एकमेव साक्षीदार आहे. भानू भारस्वाडकर. शेवटची साक्षीदार!'

'खरंच का बाबांच्या हातून असं काही घडल?'

'बाबांचं बाबांना माहीत. जरी घडलं असलं तरी काय झालं? काशी, ते देवाचे अवतार आहेत. त्यांना सामान्य माणसांचे नियम लाऊन कसे चालेल? ते जे करतात ते भक्ताच्या भल्यासाठी करतात. त्यात त्यांचा काही स्वार्थ नसतो. '

'ते झालं. पर गरीब दुबळयांवर अन्याय का? देवाला तर सगळे सारखेच ना?'

'काशी, या सगळया प्रश्नाचे उत्तर तू बाबांना विचार. मला त्यातले काही कळत नाही मी फक्त आश्रमाची व्यवस्था बघतो. '


©ई साहित्य प्रतिष्ठान

'अरे देवा! उगीच थांबले मी. मॅनेजर हाय म्हणा की तू हीथला. मी तर तुम्हाला बाबाच्या जागी समजत होते. तुम्हाला काहीच येत न्हाई म्हणाकी. उगी दोन दिस वाया घालवले. ' ती फणकाऱ्याने दाराकडे निघाली.

'काशी, थांब. अगं तुला काहीच मिळणार नाही असं होणार नाही. तू म्हणशील तितके धन तुला मिळेल. सोन्याचे दागिने पाहीजे? मिळतील. '

त्याचे बोलणे ऐकून काशीचे शरीर जागीच ताठ झाले. ती गर्कन वळाली आणि दोन्ही पंजे पुढे करून तिने त्राहीशंकरच्या अंगावर उडी मारली. तिच्या धक्काने तो सिंहासनासह जमिनीवर आपटला. ती त्याच्या छातीवर बसली.

त्याने दोन्ही हात धरून तिला बाजूला केले. त्याच्या गालावर नखाचे ओरखाडे उमटून त्याच्यातून रक्त निघू लागले. त्राहीशंकरच्या डोळयात आग पेटली. त्याने तिला झटका देऊन उठवले व तिचा हात पिरगाळून मागे धरला. काशीने मोकळया हाताचा कोपरा त्राहीशंकरच्या पोटात जोराने हाणला. त्याच्या पोटात कळ फिरली. पण त्याने तिचा हात सोडला नाही.

'शाब्बास त्राही ! तू स्त्रियांशीही झटापट करतोस तर!'

त्याने चमकून समोर पाहीले. दारात एक हसऱ्या चेहऱ्याचा, देखणा तरूण उभा होता. त्याच्या ओठात जळती सिगरेट होती. दोन्ही पायात अंतर ठेऊन तो बेदरकार उभा होता. त्याच्या अनपेक्षित आवाजाने दचकून त्राहीशंकरच्या हाताची पकड ढिली झाली. त्याचा फायदा घेऊन काशी हाताला झटका दिला. धावत जाऊन तिने त्या तरूणाच्या गळयाला मिठी मारली. त्राहीशंकर चकीत होऊन पाहत राहीला.

'कोण आहेस तू?' भानावर येऊन त्याने विचारले.

'मी? मी वीरभद्र! आणि ही माझी पत्नी विजया. तुझ्या बापाची आणि तुझी सारी संपत्ती देऊ केलीस तरीही तुला कधीही प्राप्त होणार नाही. '

'तुम्हाला सांगितलं व्हत ना माझा नवरा येका तरुण मुली संगट गेला. त्यो हथं गावल. हा महा नवरा आन् त्याच्या संगट व्हती ती तरुणी, भानू. ' विजया काशीची नक्कल करीत म्हणाली.

त्राहीशंकरच्या चेहऱ्यावरील भाव निरखण्यात त्यांना मजा येत होती. त्याच्याशी बोलण्यात ते इतके गुंतले होते की त्यांच्या आपल्या मागून दबल्या पावलांनी येणाऱ्या गार्डची चाहूल लागली, तेव्हा उशीर झाला होता.  मागेवळून पहाण्यापुर्वीच वीरभद्रच्या मस्तकावर पिस्तुलाच्या दस्त्याचा जोरदार फटका बसला.

जमिनीवर कोसळताना त्याला विजयाची किंकाळी ऐकू आली. ती त्याला दोन्ही हातनी सावरण्याचा प्रयत्न करीत होती.

‘शाब्बास!’ त्राहीशंकर आनंदाने ओरडला

आणि वीरभद्रची शुध्द हरपली!

II

वीरभद्रला शुध्द आली तेव्हा  आपण कुठे आहोत हे क्षणभर त्याच्यालक्षात आले नाही. जेव्हा त्याला आठवले की, आपण त्राहीशंकरशी बोलत असताना कुणीतरी आपल्या डोक्यावर फटका मारून आपल्याला बेशुध्द केले. आपण कोसळत असताना विजया आपल्याला सावरण्यासाठी पुढे धावली... . .

विजयेची आठवण येताच त्याने धडपडून उठण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याला आपले हात-पाय बांधल्याचे आढळून आले.


©ई साहित्य प्रतिष्ठान

‘हालचाल करण्याचा अजिबात प्रयत्न करू नकोस, वीरभद्र.  त्याचा काही उपयोग होणार नाही. ’

आवाजाच्या दिशेने त्याची नजर वळाली. त्याच्यासमोर त्राहीशंकर हातात पिस्तुल घेऊन उभा होता. त्याला शुध्दीवर आलेला पाहून विजयाने समाधानाचा सुस्कारा सोडला. तिला वीरभद्रची चिंता वाटत असली तरी तिच्या चेहऱ्यावर भीतीचा लवलेशही दिसत नव्हता. वीरभद्रच्या सोबत राहून तिला अश्याप्रसंगातून जाण्याची सवय होती.

काही न बोलता त्याने आजुबाजुला नजर फिरवली. आपण कुठे आहोत हे त्याला कळाले नाही. दगडमातीने बांधलेल्या एका चिंचोळया जागेत आपण आहोत एव्हढे त्याला समजले. जवळ एक बॅटरीवर चालणारा सफेद प्रकाशाचा दिवा जळत होता. त्याचा प्रकाश फार दूरवर पसरत नसल्याने प्रकाशच अंधाराची जाणिव करुन देत होता. डाव्या बाजूला बहुदा झरोका असावा. कारण तेथे पांढरट क्षीण प्रकाशाचा पट्टा दिसत होता. त्यावरून आपण जमिनीच्या खाली कुठेतरी आहोत असे वीरभद्रने अनुमान केले.

‘तू मला तळघरात आणलेस की भुयारात, त्राहीशंकर?’ त्राहीशंकरच्या हातातल्या पिस्तुलाकडे दुर्लक्ष करुन वीरभद्र म्हणाला.

‘वीरभद्र, आपण एका भुय़ारात आहोत. या दुष्ट त्राहीशंकरने तुम्हाला बेशुध्दावस्थेत हातपाय बांधून इथं आणलं. त्याला माझी भीती वाटत असल्याने माझेही हात बांधून तुमच्या मागे घेऊन आला. ’  त्राहीशंकर काही बोलण्याच्या आधी विजया म्हणाली.

‘तू काळजी करू नकोस विजू. तुझी अशी अवस्था करणाऱ्या त्राहीशंकरला मी चांगलाच धडा शिकविणार आहे. त्याच्या हातात हातकडी नाही पडली तर मी त्याचे हात छाटेल. ’

त्याचे बोलणे ऐकून त्राहीशंकर गमतीदार विनोद ऐकल्याप्रमाणे हसला.

‘शाब्बास वीरभद्र! फारच छान! तुझा दुर्दम्य आशावाद पाहून मला खरोखर वाईट वाटते. कारण मी तुम्हाला ठार मारून ह्या समोरच्या झरोक्यातून खाली खंदकात फेकून देणार आहे. तुझ्याबद्दल मला काही वाटत नसले तरी या काशीबद्दल. सॉरी विजयाबद्दल मात्र वाईट

 ©ई साहित्य प्रतिष्ठान

वाटते. तुझ्यासारख्या उपद्व्यापी माणसाच्या नादी लागून तिला अकाली मरणाला सामोरे जावे लागणार. '

त्याने नाटकी पध्दतीने खांदे उडविले.

'माझ्याबद्दल काही वाईट वाटायला नको त्राही. तू तुझा विचार कर. तू आम्हाला या भुयारात घेऊन आलास, पण मुर्खा, वर आता पर्यंत आश्रमात पोलीस शिरले असतील. मी तुझ्या कॉंपुटरवरुन पोलिसांना संदेश दिला. तुझ्यासमोर, लंपट माणसा, तुझ्या ते लक्षांत आले नाही कां?'

'खोटं बोलतेस तू. ' त्राहीशंकर अविश्वासाने म्हणाला. तशी विजया खदाखदा हसली. तिच्या हसण्या वरूनच तो समजून चुकला की ती खोटे बोलत नव्हती.

'मी खोटं बोलते? मग ऐक वर पोलिसांच्या भोंग्यातून आवाज येतो. तुला सुचना देत आहेत ते. ऐकलंस?'

खंदकाच्या वरून येणारा आवाज खोल व अस्पष्ट ऐकू येत असला तरी कुणीतरी माईक वरून बोलल्याचा आवाज येत होता. त्राहीशंकरचं नाव उच्चारून खबरदारीचा इशारा देण्यात येत होता.

'ठीक आहे. ' त्याचा चेहरा पांढऱ्या प्रकाशात क्रूर दिसू लागला. एखाद्या विषारी नागाने फुत्कार टाकावा तश्या आवाजात तो म्हणाला,

'माझे पुढे जे व्हायचे ते होईल. वीरभद्र, तू मरणाला तयार हो. घाबरू नकोस तुझ्या पाठोपाठ तुझी पत्नी येईल याची खात्री बाळग. ' त्याने हातातले पिस्तूल वीरभद्रच्या छातीवर ताणले. त्याची नजर आणि हात अगदी स्थिर होता.

त्याला बोलण्यात गुंतवले पाहीजे. वीरभद्रने विचार केला. मागे बांधलेला हात सोडविण्याची त्याची धडपड चालू होती. त्याला संशय न येऊ देता हे काम व्हायला हवे होते म्हणून वेळ लागत होता. त्याने विजयाकडे पाहीले. तिच्या बाजूला रक्षक उभा असल्याने आणि तिचे हात बांधलेले असल्याने ती काही हालचाल करू शकत नव्हती.

जोरात ओरडून पोलिसांचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करूनही उपयोग नव्हता. त्यांचा आवाज एव्हढया उंचीवर पोचला नसता. जरी पोलिसांच्या कानावर गेला तरी तो कुठून येतो याचा पोलिसांना अंदाज येण्याआधी त्राहीशंकर गोळी चालवेल यात शंका नव्हती.

निराशेने वीरभद्रने डोळे मिटले. आता काही चमत्कार झाला तरच त्याचा जीव वाचू शकणार होता.

‘हर हर महादेव’ वीरभद्र मोठयाने म्हणाला.

आणि दुसऱ्याक्षणी पिस्तुलाचा आवाज भुयारात घुमला.

वीरभद्रने डोळे उघडले. त्याला अजिबात वेदना होत नव्हती. आश्चर्याने त्याने समोर पाहीले. त्राहीशंकरच्या हाताला गोळी लागून त्याचे पिस्तुल दूर उडाले होते. त्याच्या हातातून रक्ताची धार लागली होती. त्या एका क्षणाचा फायदा घेऊन विजयाने रक्षकाच्या कंबरडयात एक सणसणीत लाथ घातली. तसा तो पुढे जाऊन पालथा पडला. त्याच्या अंगावर कुणीतरी उडी घेऊन त्याच्यावर ठोशांची सरबत्ती सुरू केली.

‘शाब्बास भैरव!’

वीरभद्रने त्याला उत्तेजन दिले तसे त्याने अजून दोन ठोसे लगावले. खालच्या माणसाचा प्रतिकार थंडावल्यावर त्याला समजले, तो बेशुध्द झाला.

दरम्यान विजयाने चपळाईने रक्षकाचे पिस्तूलपायाने भानूच्या दिशेने उडविले. पिस्तूल हातात येताच ती त्राहीशंकरच्या छातीवर नेम धरुन उभी राहीली.

भैरवने धावत येऊन वीरभद्रला बंधमुक्त केले.

‘बाजी पलटली, त्राहीशंकर. आता मुकाट आमच्यासोबत चल. वर पोलिस तुझी वाट पहात आहेत. ’

‘दूर हो वीरभद्र... कुणी माझ्या जवळ येऊ नका. ’

त्राहीशंकर अतिशय उत्तेजीत होऊन, डोळे गरागरा फिरवत तो बोलत होता. आपला पराभव पाहून तो बेभान झाला. तुरुंगात असलेल्या आपल्या वडीलांना सोडवायचे तर

दूर आपणच पोलिसांच्या जाळयात अडकणार या आघाताने वेड लागल्याप्रमाणे तो बरळू लागला.

'बाबा... बाबा, मला माफ करा. तुम्हाला वांचविण्याचा मी खूप प्रयत्न केला. एकच साक्षीदार उरला होता... . . शेवटचा साक्षीदार... त्याला नाही संपवता आले... . मला माफ करा... . '

बोलता बोलता तो उघडया गवाक्षा कडे सरकत होता. तो काय करणार आहे याचा अंदाज येऊन वीरभद्र त्याला पकडण्यासाठी धांवला. पण उशीर झाला. वीरभद्र त्याच्या जवळ पोह्चण्याआधी त्याने गवाक्षातून खाली, पाण्याने भरलेल्या खंदकात, उडी घेतली. त्याला पकडण्याचा प्रयत्न करणाऱ्या वीरभद्रच्या हातात फक्त त्याच्या अंगवरीलशालीचे टोक आले.

पाण्यात पडल्याचा मोठा आवाज आला. थोडावेळ पाण्याचा चुळूक चुबळूक आवाज आला नंतर सर्व शांत झाले.

सवयीप्रमाणे मगरी भक्ष्या कडे सरकू लागल्या.

III

यानंतर सांगण्या सारखे फार थोडे शिल्लक आहे.


©ई साहित्य प्रतिष्ठान

जुन्या आश्रमातून निघणारे भुयार पंचकमळमहालाच्या देठाशी जाऊन मिळत होते. पाचव्या मजल्यावर असणारे महाराज मधूनच जुन्या आश्रमात वावरताना कसे दिसत होते याचा उलगडा झाला. त्या मार्गावरून येत असताना भैरवला भुयारातून त्राहीशंकरच्या बोलण्याचा आवाज ऐकू आला. त्या आवाजाने सावध होऊन आपली चाहूल लागणार नाही याची काळजी घेत पुढे सरकला. त्याला हात पाय बांधलेल्या अवस्थेतला वीरभद्र आणि विजया दिसली. प्रसंगावधान राखून  ऐनवेळी त्याने एकाच गोळीत त्राहीशंकरच्या हातातले पिस्तुल उडवले.

भुयारातून येताना वाटेत त्यांना असंख्य प्रेताचे सांगाडे भिंतीत चिणलेल्या अवस्थेत सापडले. त्यावरून तेथे काय प्रकार चालत असावेत याचा अंदाज येत होता.

आपल्या मुलाच्या भयंकर मृत्युची बातमी ऐकुन जटाशंकरच्या डोक्यावर वीज कोसळल्या सारखे झाले. ज्या मगरींना तो आज पर्यंत बळींचे देह पुरवत आला त्या मगरींचा भक्ष्य आज त्याचा मुलगाच झाला होता.

पश्चातापाने त्याची अवस्था वेडयासारखी झाली. मुलाच्या मृत्युने त्याचा जीवनातील रस संपला. त्याला वैराग्य आले. त्या भरात त्यांनी आपल्या सगळया गुन्ह्याचा कबुलीजबाब दिला व  कोर्ट देईल ती शिक्षा भोगण्याची त्याने तयारी दाखविली.

आपल्या वकिलांना  बोलावून त्यानी आपल्या संपत्तीचा ट्रस्ट नेमून ती लोककल्याणासाठी वापरली जाईल याची व्यवस्था केली.

या प्रकरणाचे सर्व श्रेय नेहमीप्रमाणे सुप्रिटेण्डेट विनोदरावांना मिळाले. गेल्या काही दिवसांपासून रोज त्यांचे नाव वर्तमानपत्रातून आणि टीव्हीच्या प्रत्येक चॅनल वरून झळकत होतं. त्यामुळे ते अत्यंत खुश होते. त्यांनी वीरभद्रचे सगळे अपराध माफ केले. या सगळया गडबडीत वीरभद्रने या प्रकरणातून  कमिशन कमावले याचा त्यांना विसर पडला होता.

विनोदरावच्या खालोखाल भानू भारस्वाडकरची तारीफ ऐकू येत होती. तिने दाखविलेल्या असामान्य धैर्याबद्दल अख्खा महाराष्ट्र तिची तारिफ करीत होता. अनेक ठिकाणी तिचे सत्कार समारंभ आयोजित करण्यात येत होते. पुढच्या वर्षीच्या राष्टपती पारितोषकासाठी तिची जोरदार शिफारस करण्यात आली होती.


©ई साहित्य प्रतिष्ठान

तिला एव्हढा सन्मान मिळाल्यावर कॉलेजनेही तिचा सत्कार केला. प्रिन्सिपलने तर तिची तारीफ केलीच पण नंदीता सुरीनेही तिने कॉलेजचे नाव मोठे केल्याचे मान्य करुन, तिचा आपल्याला अभिमान वाटतो असं म्हणून सगळयांसमोर तिला मिठीत घेतले.

नयनाची भेट झाल्यावर भानूला समजले की, ज्याला शोधण्यासाठी आपण आश्रमात जाऊन आपला जीव धोक्यात टाकला, तो सुमीत आपल्या मैत्रिणीचे अश्रू पाहून पाघळला आणि घरी जाताच त्याने आश्रमात जाण्याचा बेत रद्द केला.

भानूने आपल्या ह्या धाडसी प्रसंगाच्या आठवणी लिहून काढल्या. पुढे ते पुस्तक एका नामांकित प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले. ते पुस्तक तिने वीरभद्र, विजया आणि भैरवला अर्पण केले.

वीरभद्रला आपण एका मुलीचा जीव वाचवण्यात यशस्वी झालो याचा आनंद तर होताच पण या प्रकरणात चांगली कमाई झाल्याने त्याचा आनंद व्दिगुणीत झाला हे वेगळे सांगायला नको.

समाप्त


©ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवाesahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य